# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार १५ जून २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## मध्य प्रदेशात अफवा पसरल्याने प्रवाशांची ट्रेनमधून उडी

## दुस-या ट्रेनच्या धडकेत ४ जण जागीच ठार



**मोरेना/वृत्तसंस्था-** मध्य प्रदेशातील मोरेना येथे एक भीषण रेल्वे अपघात झाल्याची एक घटना समोर आली. उदयपूर इंटरसिटी एक्सप्रेसला आग लागल्याच्या अफवांमुळे अनेक प्रवासी खाली उतरून रेल्वे रुळांवर पडले. त्याचवेळी, विरुद्ध दिशेने येणाऱ्या पाताळकोट ट्रेनने अनेक लोकांना धडक दिली. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

उदयपूर इंटरसिटी एक्सप्रेस ट्रेन मोरेना जिल्ह्यातून धावत होती. ट्रेन हेतमपूर स्टेशनजवळ पोहोचत असताना, ट्रेनला आग लागल्याची अफवा पसरली. हे ऐकताच प्रवासी घाबरले, घाबरलेल्या लोकांनी आपला जीव वाचवण्यासाठी ट्रेनमधून रेल्वे रुळांवर उड्या मारल्या.

**बाजूने जाणाऱ्या दुसऱ्या ट्रेनने धडक दिली**

जे लोक रुळांवर आले होते, त्या लोकांना बाजूच्या रुळावरुन जाणाऱ्या पातालकोट एक्सप्रेस गाडी धडक दिली. या धडकेत चार जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून आणखी काही प्रवासी जखमी असल्याचे समोर आले आहे.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. रेल्वे अधिकारी आणि जिल्हा प्रशासनाला माहिती देण्यात आली असून, बचाव आणि मदतकार्य सुरू करण्यात ☞(पान २ वर)

## देवदर्शनावरून परतणा-या भाविकांवर काळाची झडप

# गाडी विहिरीत कोसळली; ९ जणांचा मृत्यू

**सोलापूर/वृत्तसंस्था-** जिल्ह्यात भाविकांच्या गाडीचा भीषण अपघात होऊन ९ जणांचा मृत्यू झाला आहे. देवदर्शनावरुन परतत असताना गाडीच विहिरीत कोसळली. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

देवदर्शन घेऊन माघारी परतणाऱ्या भाविकांवर काळाने वाटेतच झडप घातली. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात ही घटना घडली आहे. पिकअप गाडी थेट विहिरीत कोसळली. या भयंकर अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला आहे. तर काही जखमी असून, मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. रविवारी






सायंकाळी ही घटना घडली असून, बचाव कार्य वेगाने सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावातील भाविक म्हसवड येथील सिद्धनाथांच्या दर्शनासाठी गेले होते. देवदर्शन झाल्यानंतर सगळे पीकअप वाहनाने परत निघाले. म्हसवड-तांदुळवाडी रस्त्यावरून माघारी येत असताना गाडी अनियंत्रित झाली आणि थेट विहिरीत कोसळली.

म्हसवडवरून निघाल्यानंतर भाविकांचे वाहन माळशिरस तालुक्यातील तांदळवाडी गावाजवळ आले होते. त्याचवेळी हा अपघात घडला. यात ९ भाविकांचा मृत्यू झाला आहे. विहिरीत भरपूर पाणी असल्याने अनेकांचा बुडून मृत्यू झाल्याचे समजते. काही जखमींना तातडीने बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काहींची प्रकृती गंभीर असून, मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

**रस्त्याच्या कडेलाच विहीर, पाण्यात बुडून मृत्यू**

माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी घटनेबद्दल सांगितले की, 'या घटनेबद्दल मला माहिती मिळाली आहे. अपघातातील मृतांमध्ये चार महिला आणि चार लहान मुलांचाही समावेश आहे. दोन जणांना बाहेर काढण्यात आले असून, त्यांना रुग्णालयात नेण्यात आले आहे.'

'विहीर रस्त्याच्या कडेलाच आहे. नेमका अपघात कशामुळे झाला, याबद्दल मी माहिती घेऊन कळतो. ☞(पान २ वर)

## देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांना मृत्युने रस्त्यातच गाठले

# कार-जीप अपघातात तीन महिला जागीच ठार

**औसा (जि. लातूर )-** धाराशिव जिल्ह्यातील उमरगा येथील भाविक देवदर्शनासाठी जात असताना औसा-लातूर महामार्गावर भीषण अपघात झाला. बुधोडा गावाजवळ मध्यरात्री भरधाव क्रेटा कारने भाविकांच्या क्रूझर जीपला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने जीप खड्ड्यात जाऊन पलटी झाली. या अपघातात तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला असून, १० जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये जीपमधील नऊ प्रवासी आणि कारचालकाचा समावेश आहे.

उमरगा येथील जुनीपेठ परिसरातील पाटील कुटुंबातील सदस्य व नातेवाईक क्रूझर जीप (एमएच-१२ सीआर ८०७७) मधून बीड जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी येथे देवदर्शनासाठी निघाले होते.

**पाठीमागून कारने दिली जोरात धडक**

रविवारी (१४ जून) पहाटे १.४० वाजण्याच्या सुमारास औसा-लातूर महामार्गावरील बुधोडा गावाजवळील द्वारका हॉटेलसमोर पाठीमागून येणाऱ्या क्रेटा कारने (एमएच २४ एडब्ल्यू ३६९१) जीपला जोरदार धडक



दिली. धडक इतकी भीषण होती की जीप रस्त्यालगतच्या खोल खड्ड्यात जाऊन दोन ते तीन पलट्या घेतल्या. यात जीपचा चक्काचूर झाला. अपघातानंतर परिसरात किंचाळ्या आणि आक्रोशामुळे एकच गोंधळ उडाला.

अपघातात क्रूझर जीपमधील निलावती आनंद पाटील (वय ५३), रेश्मा गंगाधर पाटील (वय ३३), सरोजा सुरेश पतंगे (वय ४२, सर्व रा. उमरगा) यांचा जागीच मृत्यू झाला.

जीपमधील शीतल कोळगे (वय ३५), विरेश पाटील (वय ३४), सुचिता देशमुख (वय ३५), कन्याकुमारी होडपळ (वय ४०), भक्ती देशमुख (वय १२), लक्ष्मण मांजरे (वय ५०), विग्नेश पाटील (वय ६४), तम्मा स्वामी (३५), कल्पना देशमुख (वय ४०), कमल पोटगे (वय २०), सूरज ☞(पान २ वर)

## पुण्यात शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

## २८ ते ३१ जानेवारी २०२७ दरम्यान रंगणार

**पुणे/प्रतिनिधी :** अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ऐतिहासिक शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात दि. २८ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत होणार आहे.




विशेष म्हणजे, 'नांदी शंभराव्या साहित्य संमेलनाची' या उपक्रमाद्वारे पुणे, मुंबई वगळता ज्या ठिकाणी संमेलने झाली नाहीत, अशा महाराष्ट्रातील ४८ ठिकाणांसह महाराष्ट्राच्या विविध भागात संमेलनपूर्व ९९ साहित्यिक उपक्रमांच्या माध्यमातून शंभराव्या साहित्य संमेलनाची नांदी होणार आहे. दि. १५ ऑगस्ट ते १५ जानेवारी या कालावधीत हे साहित्यिक उपक्रम राबविले जाणार आहेत, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी रविवारी (दि. १४) पत्रकार परिषदेत दिली. हे संमेलन चार दिवसांचे होणार असून, ते ऐतिहासिक आणि भव्य स्वरूपात पार पडेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

संमेलनाचे संयोजक, समर्थ युवा फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, मसापाच्या प्रमुख कार्यवाड डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर उपस्थित होते. महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक रविवारी पुण्यात आयोजित करण्यात आली ☞(पान २ वर)

## AI ते स्टार्टअप्स...इनोव्हेशन आमच्या रक्तात

# भारत बनतोय जगाचा प्रॉब्लेम सॉल्वर!

### फ्रान्समध्ये PM मोदींचे मोठे वक्तव्य

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** 'गेल्या १२ वर्षांत भारताने एक मजबूत इनोव्हेशन सिस्टीम तयार केली आहे. आज भारत जगातील तिसरी सर्वात मोठी 'स्टार्टअप इकोसिस्टिम' बनला आहे. २१ व्या शतकात भारत वेगाने बदलत असून माहिती क्रांतीच्या जोरावर देश आता स्टार्टअप क्रांतीकडे वाटचाल करत आहे,' असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. फ्रान्समधील नीस शहरात आयोजित 'भारत इनोव्हेट्स २०२६' या भव्य कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. तत्पूर्वी, पंतप्रधान मोदी यांनी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची भेट घेतली आणि त्यानंतर दोन्ही नेत्यांनी मिळून या ३ दिवसीय कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन केले.



**इनोव्हेशन भारताच्या रक्तात-** कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, 'नवोपक्रम हा भारताच्या डीएनएमध्येच आहे. मानवताच्या कल्याणासाठी आणि लोकांचे जीवन अधिक सुलभ करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित करणे ही भारताची प्राथमिकता आहे. AI क्षेत्रात भारताकडे मोठ्या संधी आहेत आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देश लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणत आहे.'

### 'रिफॉर्म एक्सप्रेस आता थांबणार नाही; भारतात या, एकत्र काम करू!'

**'रिफॉर्म एक्सप्रेस' थांबणार नाही-** पंतप्रधानांनी देशात सुरू असलेल्या आर्थिक आणि धोरणात्मक सुधारणांचा उल्लेख करत स्पष्ट केले की, 'एकविसाव्या शतकात भारत वेगाने बदलत आहे. माहिती क्रांतीच्या बळावर देश आता स्टार्टअप क्रांतीकडे वाटचाल करत आहे. आमची रिफॉर्म एक्सप्रेस ☞(पान २ वर)

# टीएमसीचे २२ खासदार फुटले?

### खासदार काकोली यांच्या दाव्याने दिल्लीसह बंगालच्या राजकारणात खळबळ

**कोलकात्ता,/वृत्तसंस्था-** माझ्या नेतृत्वाखालील बंडखोर गटात आता २२ खासदार आहेत. स्वतंत्र संसदीय गट म्हणून मान्यता मिळवण्यासाठी हा गट लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांची भेट घेणार असल्याचा दावा टीएमसी खासदार काकोली घोष दस्तीदार यांनी केला.



तृणमूल काँग्रेसचे २० हून अधिक खासदार पक्ष सोडण्याच्या तयारीत आहेत. या खासदारांना आता एक वेगळा गट स्थापन करायचा असून ते एनडीएला पाठिंबा देणार असल्याची चर्चा आहे. काकोली घोष यांच्या नेतृत्वाखाली हा गट लोकसभा अध्यक्षांना भेटण्यासाठी सोमवारी दिल्लीला जात आहेत. ममता बॅनर्जी यांच्या टीएमसी पक्षात सध्या मोठी उलथापालथ सुरू आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांपासून पक्षांतर्गत तणाव वाढत आहे. खासदार काकोली घोष म्हणाल्या की, आता आमच्यासोबत २२ खासदार आहेत. यापूर्वी त्यांनी २० खासदार असल्याचा दावा केला होता. सामील झाले आहेत, पण त्यांची नावे अद्याप जाहीर करण्यात आलेली नाहीत. काकोली म्हणाल्या की, ते औपचारिक ☞(पान २ वर)






## नागपुरात कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाची तयारी

## १६ जूनला पोलिसांकडे मागितली परवानगी



**नागपूर/प्रतिनिधी :** नीट पेपर लीक, बेरोजगारी आणि शिक्षण व्यवस्थेशी संबंधित विविध प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीने आता नागपुरात मोठे आंदोलन करण्याची तयारी सुरू केली आहे. येत्या १६ जून रोजी संविधान चौक येथे आंदोलन करण्यासाठी पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी पोलिसांकडे परवानगी मागितली असून, या प्रस्तावित आंदोलनाबाबत युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सीताबर्डी पोलीस ठाण्यात जाऊन आंदोलनासाठी परवानगी अर्ज सादर केला. यावेळी अनेक युवकांच्या हातात गुलाबाची फुले होती. पक्षाचे स्थानिक पदाधिकारी दुर्गेश कुडके यांनी सांगितले की, आंदोलनाची प्राथमिक तयारी सुरू करण्यात आली असून मोठ्या संख्येने युवक सहभागी होण्याची शक्यता आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांच्याशी या संदर्भात चर्चा झाली असून ते सुद्धा सहभागी होणार आहेत. आयोजकांच्या दाव्यानुसार, संविधान चौक येथे सुमारे दोन हजार नागरिक आणि युवक आंदोलनात सहभागी होऊ शकतात. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही युवकांना आंदोलनात सहभागी होण्याचे ☞(पान २ वर)

## उद्धवसेनेच्या खासदाराच्या कारला अपघात

### मातोश्रीवरील बैठकीला येत असताना घडली घटना

**मुंबई/प्रतिनिधी :** आज उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या खासदारांची एक महत्त्वपूर्ण बैठक मातोश्री निवासस्थानी बोलावली होती. या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी येत असताना उद्धवसेनेचे खासदार संजय दिना पाटील यांच्या कारला अपघात झाला.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात ऑपरेशन टायगर सुरू असून, त्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील उद्धवसेनेत फूट पडून काही खासदार हे शिंदेसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर आज उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या खासदारांची एक महत्त्वपूर्ण बैठक




मातोश्री निवासस्थानी बोलावली होती. या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी येत असताना उद्धवसेनेचे खासदार संजय दिना पाटील यांच्या कारला अपघात झाला.

ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील हे मातोश्रीवरील ☞(पान २ वर)

# बिबट्याच्या कातडी तस्करीचे धागेदोरे मध्यप्रदेशापर्यंत

## -चौथा संशयित वनविभागाच्या ताब्यात

### -आरोपीकडून बिबट्याच्या कातडीचा उर्वरित भाग व अवशेष जप्त



**धारणी/प्रतिनिधीः-**
मेळघाटातील हरीसाल येथे उघडकीस आलेल्या बिबट्या कातडी तस्करी प्रकरणाचा तपास दिवसेंदिवस अधिक गडद होत असून वनविभागाने या प्रकरणात आणखी एका संशयिताला ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे या संशयिताकडून बिबट्याच्या कातडीचा उर्वरित भाग आणि काही महत्त्वाचे अवशेष जप्त करण्यात आले असून, वन्यजीव तस्करीच्या मोठ्या साखळीचा तपास आता मध्यप्रदेशापर्यंत पोहोचला आहे.

काही दिवसांपूर्वी हरीसाल येथील वनविभागाच्या तपासणी नाक्यावर सापळा रचून अधिकाऱ्यांनी मध्यप्रदेशातील मांगीलाल युवने, दीपक उईके आणि कमल ठाकूर या तिघांना बिबट्याची कातडी तस्करी करताना रंगेहात पकडले होते. या कारवाईनंतर संपूर्ण मेळघाटात खळबळ उडाली होती. न्यायालयाने तिन्ही आरोपींना १५ जूनपर्यंत वनकोठडी सुनावल्याने तपास यंत्रणांना चौकशीसाठी महत्त्वाची संधी मिळाली. वनकोठडीत सुरू असलेल्या चौकशीतून अनेक महत्त्वाचे धागेदोरे समोर आले. आरोपींकडून मिळालेल्या माहितीनुसार हरिसाल वनपरिक्षेत्र, वन्यजीव विभाग, क्राइम सेल आणि पोलिस प्रशासनाच्या संयुक्त पथकांनी मध्यप्रदेशातील विविध भागांत शोधमोहीम राबविली. या कारवाईदरम्यान झिरपा (मध्यप्रदेश) येथील महेंद्रसिंग मंडलोई (वय ३०) याला ताब्यात घेण्यात आले. महेंद्रसिंग मंडलोई याच्याकडून बिबट्याच्या कातडीचा उर्वरित भाग तसेच काही अवशेष हस्तगत करण्यात वनविभागाला यश आले. जप्त करण्यात आलेल्या अवशेषांची तपासणी करण्यात येत असून ते वन्यजीव गुन्ह्याशी संबंधित महत्त्वाचे पुरावे ठरण्याची शक्यता आहे. दरम्यान, या प्रकरणात केवळ काही व्यक्तींचा सहभाग नसून वन्यजीव अवयवांच्या बेकायदेशीर व्यापाराशी संबंधित मोठे रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे. आरोपींमधील परस्पर संबंध, आर्थिक व्यवहार, संपर्क साखळी आणि कातडीच्या विक्रीसाठी वापरले जाणारे मार्ग याबाबतही तपास सुरू आहे. वनविभागाची विशेष पथके सध्या मध्यप्रदेशातील विविध ठिकाणी कार्यरत असून आणखी काही संशयितांच्या शोधासाठी मोहीम तीव्र करण्यात आली आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा गुन्हा मानला जात असल्याने या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

सुरुवातीला केवळ बिबट्याची कातडी जप्त झालेल्या या प्रकरणात आता उर्वरित कातडी, अवशेष आणि नव्या संशयिताचा सहभाग समोर आल्याने तपासाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वनविभागाच्या मते, आगामी चौकशीत वन्यजीव तस्करीच्या संघटित जाळ्याबाबत आणखी महत्त्वपूर्ण माहिती समोर येऊ शकते.

# जिजाऊ बँक लखनऊ बँकिंग समिट २०२६ मध्ये बेस्ट अर्बन कॉपरेटिव्ह बँक पुरस्काराने सन्मानित



**अमरावती/प्रतिनिधीः-** नवी दिल्ली भारत नेटवर्क व राष्ट्रिय स्तरावरील नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन कोऑपरेटिव्ह बँक्स आणि पूणे अर्बन कोऑपरेटीव्ह बँक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने लखनऊ उत्तर प्रदेश येथे जून२०२६मधे संपन्न झालेल्या डिजिटल बँकिंग, कोअर बँकिंग आधुनुकिकरण प्रशिक्षण व पुरस्कार या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र अर्बन बँक फेडरेशन असोसिएशन महाराष्ट्र चे अध्यक्ष अजय ब्रम्हेच्या पुणे डिस्ट्रिक्ट व असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. सुभाष मोहिते आणि आसाम शिखर बँकेचे अध्यक्ष बिश्वजीत फुकण आमदार तथा उत्तर प्रदेश अर्बन बँक असोसिएशनचे अध्यक्ष आर सी वर्मा यांच्या शुभहस्ते एम्पॉवरिंग को-ऑपरेटिव्ह बँक फॉर ए आय ड्रीव्हन फ्युचर या विषयावरील प्राथमिक सत्राचे उद्घाटन मान्यवरांच्या शुभहस्ते रामदा हॉटेल ऑडीटोरीयम लखनऊ येथे दीप प्रज्वलनाने करण्यात आले.

आधुनिक काळात बँकिंग स्पर्धेमध्ये डिजिटलायझेशन चे अत्यंत महत्व असून सहकारी बँकांना आधुनिकीकरणाच्या बँकिंग प्रवासात युवा वर्गाला सुविधा देण्यासाठी डिजिटल बँकिंग मोबाईल बँकिंग यासारख्या सेवा कार्यान्वित करणे गरजेचे असल्याचे प्रातिपादना महाराष्ट्र अर्बन बँक फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा यांनी विशद केले . डिजिटल बँकिंग फॉर ऑल , एक्सपांडिंग फायनान्शियल इंटेलिजन अँड ऑपर्च्युनिटीज या विषयावरील चर्चासत्रात विविध बँकांचे व्यवस्थापकीय प्रबंधक विठ्ठल धनानी, नरेंद्र सिंग डाबी, शशांक शर्मा स्कोरेम सोल्युशन, पराग सामंत एसआयेल इन्फोटेक, डॉ.संजय घोडके एमडी पुणे पीपल्स यांनी बँक ग्राहकांच्या संरक्षणार्थ कर्ज वाटपाच्या आधुनिक धोरणामध्ये एआयड्रीव्हन मॉडेलचा अंतर्भाव करण्याची गरज असल्याचे नमूद केले. डिजिटल पेमेंट चे संगणकीकरण धोरण तसेच अद्यावत संगणक सेवा नागरी बँकांनी प्राप्त करण्याची भुमिका प्रतिपादन केली.

बँकिंग टेक्नॉलॉजी सोल्युशनस फोर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक याची विस्तृत माहिती सील इन्फो सोल्युशनचे पराग सामंत एमडी यांनी दिली.

अ‍ॅड .जयंत शालिग्राम व अ‍ॅड. सुभाष मोहिते यांनी अर्बन बँकेमधील सेवेतील कर्मचाऱ्यांना नवीन लेबर कोड अंतर्गत कीमान वेतन, कामाच्या अटी व कंत्राट कालवधी निर्धारित केले असल्याचे सांगितले.

मॉडर्न सायबर अंड रिस्क स्ट्रटेजिज अंतर्गत डीपीडीपी अ‍ॅक्ट, या चर्चासत्रात ग्राहक अवेअरनेस, फ्रॉड रिस्क ईन डिजिटल पेमेंट यावर तज्ञांनी मार्गदर्शन केले. या परिषदेत भारत रत्न सहकारीता सन्मान २०२६ समारंभात जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँक अमरावतीला बेस्ट अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक हा सन्मान बँकेचे संस्थापक अध्यक्ष ईजी.अविनाश कोठाळे,व बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे संगणक तज्ञ संचालक डॉ. सुरेंद्र दाळु यांना बँकेकरीता प्रदान करण्यात आला. आर्थिक दृष्ट्या मागास क्षेत्रात अमरावती मुख्यालयी जिजाऊ बँक२०००मधे २५वर्षापुर्वी सुरू झाली असून बँकेच्या ११शाखांमधून २०२५-२६ या आर्थिक वर्षात बँकेने ४९७ कोटी ठेवी, ३२६ कोटी कर्ज, भागभांडवल पर्यप्तता१५.८२%, २३२ कोटी गुंतवणूक ,नेट एनपीए १.८३% आहे. बँकेचा एकत्रित बिजनेस १०००कोटी पर्यंत आहे.रिझर्व बँकेच्या मापदंडानुसार फायनान्शिअल साऊंड अ‍ॅन्ड वेल मॅनेज बँकेच्या अटी पूर्ण केल्या आहे. बँकेचे दहा हजारापेक्षा जास्त सभासद असून,४५००कर्जदारांनी विविध कामासाठी कर्ज घेऊन नियमित परतफेड केली आहे. भारतामधील १०५ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांनी सदर समीटमधे सहभाग नोंदविला.तसेच ४२ बँकिंग क्षेत्राशी संबंधित विविध संगणक कंपन्यांनी सहभाग घेतला. या परिषदेमध्ये विविध राज्यातील देशातील एकूण ४१५ प्रतिनिधी तर महाराष्ट्रातील १५० प्रतिनिधी सहभागी झाले. सन्मान समारंभामध्ये भारत नेटवर्क ग्रुपचे संचालक डॉ. अनुपम गुप्ता, बिश्वजीत फुकन आमदार तथा अध्यक्ष शिखर बँक आसाम मान्यवरांच्या हस्ते विविध राज्यातील उत्कृष्ट बँका व संगणक कंपनींना बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन अनुपम गुप्ता यांनी केले.

# प्रत्येकाला मतदानाचा अधिकार मिळवून देणे, हे राष्ट्रीय कार्य - किशोर बोरकर

**अमरावती/प्रतिनिधीः-** देशाच्या संविधानाने देशात लोकशाहीच्या माध्यमातून देशातल्या प्रत्येक नागरीकांस सर्वोच्च अधिकार प्राप्त करून दिले आहेत.आरोग्य,शिक्षण व रोजगाराच्या संधी सुध्दा प्रत्येक नागरिकांना उपलब्ध झाल्या आहेत.संपुर्ण जगात भारतीय लोकशाहीची एक स्वतंत्र ओळख आहे.जे संविधानाला विरोध करतात,त्यांचे ही संरक्षण देशाचे संविधान करीत असते.

गुन्हायामधील आरोपी तुरूंगात असला तरी तो तुरुंगातुन निवडणूक लढवितो,व निवडणुकीत असे आरोपी विजयी सुध्दा झालेले आहेत.असा दिलदारपणा आपल्या लोकशाहीत असुन प्रत्येक भारतीय नागरिकांना मतदानाचा हक्क मिळवून देणे हे राष्ट्रीय कार्य आहे.असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे (SIR) , मतदार याद्यांचे सखोल पुर्नरीक्षण अभियानाचे ,समन्वयक किशोर बोरकर यांनी भातुकली येथे, शहर काँग्रेस कमेटिचे अध्यक्ष नरेंद्र सिंह ठाकुर यांनी आयोजित केलेल्या बैठकीत व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, प्रत्येक बुथवर BLA-2 यांची नियुक्ती करण्यात येणार असून यासाठी मतदार पडताळणी मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रत्येकांनी भर दिला पाहिजे.

बडनेरा विधानसभा क्षेत्रातील भातकुली येथे आज विशेष गहन पुनरिक्षण अभियानाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण आढावा बैठक संपन्न झाली. आगामी काळात मतदार यादी शुद्धीकरण, मतदार पडताळणी व बूथस्तरावरील संघटनात्मक कामकाज अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



बैठकीमध्ये प्रत्येक मतदान केंद्रावर BLA-2 (Booth Level Agent-2) यांची नियुक्ती तातडीने पूर्ण करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक बूथवर सक्षम व सक्रिय कार्यकर्त्यांची नियुक्ती करून मतदार यादीतील नावांची पडताळणी, नवीन मतदारांची नोंदणी, तसेच वगळण्यात आलेल्या अथवा त्रुटी असलेल्या नावांबाबत आवश्यक पाठपुरावा करण्याच्या सूचना किशोर बोरकर यांनी बैठकीत दिल्या आहेत.

बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे समन्वयक तथा अमरावती जिल्हा काँग्रेस औद्योगिक विभागाचे अध्यक्ष,समीर जवंजाळ यांनी यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना SIR अभियानाचे महत्त्व, उद्दिष्टे, कार्यपद्धती तसेच प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले, . मतदार यादीतील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग अधिकाधिक वाढविण्यासाठी बूथस्तरावरील यंत्रणा मजबूत करणे आवश्यक असल्याचे मत समीर जवंजाळ यांनी व्यक्त केले.

भातुकली शहरामधील प्रत्येक बुथवर बुथ प्रमुखाची नियुक्ती करून प्रत्येक नागरीकांची मतदार यादीत नोंदणी करण्यासाठी आम्ही सर्वजण कार्य करण्याचे मनोगत भातुकली शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नरेंद्रसिंह ठाकुर यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

याप्रसंगी डॉ.रमेश बोरा, भातुकली शहर काँग्रेस मिडियाचे अध्यक्ष मयुर देशमुख,शंकर वाघमारे,धीरज देशमुख, नामदेवराव डगवाळे,तमिज खान ,वारीस खान,शेख बब्बू खालील खान,शेख अजित , अविनाश लकडे,व काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.

## १ व १० वरील उर्वरित

### मध्य प्रदेशात अफवा पसरल्याने

आले आहे.

रेल्वेमध्ये नेमकी अफवा कोणी पसरवली याचा तपास सुरू आहे. अचानक कोणीतरी चेन ओढली आणि आग लागल्याच्या चर्चा सुरू झाल्या, या अपवेनंतर रेल्वेतून लोकांनी उड्या मारण्यास सुरुवात केली. तेवढ्यात दुसऱ्या पटरीवरून एक खूप वेगाने रेल्वे गेली, यामध्ये अनेकजण चिरडले आहेत, अशी माहिती एका महिलेने दिली.

### देवदर्शनावरून परतणा-या

तिथे जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासन दाखल झाले आहे. सर्व आपात्कालीन सेवा तिथे दाखल झालेल्या आहेत. विहिरीत पाणी असल्यामुळे बुडून मृत्यू झाले आहेत', अशी माहिती आमदार उत्तम जानकर यांनी दिली.

आमदार रोहित पवार यांनीही घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. 'म्हसवड-पंढरपूर मार्गावर (ता. माळशिरस, जि. सोलापूर) पिकअप गाडी विहिरीत कोसळून ९ जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त अत्यंत वेदनादायी, दुर्दैवी आणि मन सुन्न करणारं आहे. यातील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली आणि जखमी लवकर बरे व्हावेत, ही प्रार्थना! मृतांच्या कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. या अपघातामागील कारणाचा शोध घेण्यासोबतच शासकीय यंत्रणेने तातडीने बचाव कार्यात मदत करावी, ही विनंती!', अशा भावना रोहित पवारांनी व्यक्त केल्या आहेत.

### देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांना

शेंडगे (वय ३४) हे जखमी झाले आहेत.

त्यांच्यावर लातूर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तसेच कारचालक आदित्य भूताने हा गंभीर जखमी असून, त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांची घटनास्थळी तातडीने धाव

अपघाताची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी कुमार चौधरी, पोलिस निरीक्षक रेवन डमाले, फौजदार भाऊसाहेब माळवदकर, बिट अंमलदार मारुती घुले, योगेश भंडे आदींनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

### पुण्यात शंभरावे अखिल

होती. या बैठकीत संमेलनाचे स्थळ आणि तारखा याबाबत सर्व सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. बैठकीत विविध पैलूंवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संमेलनासाठी आवश्यक असलेले भव्य प्रांगण, प्रशस्त पार्किंग व्यवस्था तसेच विद्यापीठातील सुमारे दीड हजार प्राध्यापक व कर्मचारी संमेलनाच्या यशासाठी सहकार्य करतील, अशी ग्वाही कुलगुरू सुरेश गोसावी यांनी दिल्याचे अध्यक्षांनी सांगितले. या सर्व बाबींचा विचार करून शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात घेण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. रविवारी झालेल्या बैठकीस ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्यासह महामंडळाचे सर्व सभासद उपस्थित होते.

**पुणे विद्यापीठच का निवडले?** २०१० मध्ये ८३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे स. प. महाविद्यालयात झाले होते. या पर्यायाविषयी विचारले असता योगेश सोमण म्हणाले, स. प. महाविद्यालयाच्या परिसरात एखादी बस जरी बंद पडली तरी मसापपर्यंत वाहतूक कोंडी होते. त्यामुळे हा पर्याय बाद करण्यात आला.

### AI ते स्टार्टअप्स...इनोव्हेशन आमच्या

आता थांबणार नाही. सुधारणांचा हा वेग असाच पुढे सुरू राहील, ज्यामुळे स्टार्टअप्स आणि इनोव्हेशनला आणखी बळ मिळेल.'

भारतात या, एकत्र काम करूया!

जगभरातील गुंतवणूकदार आणि उद्योजकांना आमंत्रित करताना पंतप्रधान म्हणाले, 'आम्हाला दीर्घकालीन भागीदारी आणि संयुक्त संशोधन हवे आहे. मी सर्व गुंतवणूकदारांना आवाहन करतो की, तुम्ही भारतात या, आमच्यासोबत काम करा. भारतात डिझाइन करा, भारतात डेव्हलप करा आणि जगासाठी सोल्यूशन्स तयार करा.'

भारत-फ्रान्स संबंधांचा नवा अध्याय

भारत आणि फ्रान्समधील मैत्रीचा उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले की, 'हे नाते केवळ व्यापार किंवा धोरणात्मक सहकार्यापुरते मर्यादित नाही, तर ते सामायिक मूल्ये आणि विचारांवर आधारित आहे. या भागीदारीत विश्वास, नवकल्पना आणि प्रेरणा आहे. याच बळावर दोन्ही देश शिक्षण, संशोधन आणि भविष्यातील नवीन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एकत्र पुढे जात आहेत.'

**१४ ते १६ जूनदरम्यान आयोजन**

'भारत इनोव्हेट्स २०२६' हा कार्यक्रम १४ जून ते १६ जून या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. भारत, फ्रान्स आणि इतर देशांतील स्टार्टअप्स, गुंतवणूकदार आणि व्हेंचर कॅपिटल फंड्सना एकत्र आणण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'भारत-फ्रान्स इयर ऑफ इनोव्हेशन' अंतर्गत हा एक महत्त्वाचा उपक्रम मानला जात असून, नवीन तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि व्यावसायिक भागीदारीला चालना देणे हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे.

### टीएमसीचे २२ खासदार फुटले?

पणे सामील झाल्यावरच त्यांची नावे जाहीर केली जातील.

लोकसभा अध्यक्षांची घेणार भेट

टीएमसीमधील बंडखोर खासदार लोकसभा अध्यक्षांची भेट घेणार आहेत. स्वतंत्र संसदीय गट म्हणून मान्यता मिळवण्याची त्यांची मागणी आहे. ही माहिती स्वतः काकोली यांनी कोलकाता विमानतळावर माध्यमांना दिली.

शुक्रवारी १९ टीएमसी खासदारांच्या सह्या असलेले एक कागदपत्र समोर आले. या नावांमध्ये काकोली घोष दस्तीदार, शताब्दी रॉय, बापी हलदर, शर्मिला सरकार, प्रसून बॅनर्जी, जगदीश चंद्र बर्मा बसुनिया, असित मल, अरुप चक्रवर्ती, कालीपद सोरेन, दीपक अधिकारी उर्फ ??देव, जून मालिया, पार्थ भौमिक, खलीलुर रहमान, अबू खान, अबू खान, अबू रहमान, पार्थ खान, ता. रॉय. यांची नावे आहेत.

रचना बॅनर्जी आणि सायनी घोष यांच्या सह्याही स्वतंत्र आढळल्या. त्यांनी अध्यक्षांना पत्र लिहून काकोली यांच्या नेतृत्वाखालील एक स्वतंत्र गट म्हणून मान्यता देण्याची विनंती केली होती. मात्र, अध्यक्षांच्या कार्यालयाला ही पत्रे मिळाली की नाही, हे अस्पष्ट आहे. सह्यांची सत्यताही अद्याप निश्चित झालेली नाही.

### नागपुरात कॉकरोच जनता पार्टीच्या

आवाहन करण्यात येत आहे. परवानगी मिळाल्यास नागपुरातील हे कॉकरोच जनता पार्टीचे दुसरे आंदोलन ठरणार आहे. यापूर्वी ६ जून रोजी पक्षाने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी नागपुरात आंदोलन केले होते.

परवानगीबाबत निर्णय अद्याप प्रलंबित

दरम्यान, सीताबर्डी पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुहास राऊत यांनी सांगितले की, आंदोलनासाठीचा अर्ज प्राप्त झाला आहे. यासंदर्भात पोलिस उपायुक्त अन्नपूर्णा सिंह तसेच अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा सुरू आहे. आयोजकांकडून आवश्यक माहितीही मागविण्यात आली असून, सर्व बाबींची पडताळणी केल्यानंतर नियम व अटींनुसार आंदोलनाला परवानगी द्यायची की नाही, याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

### उद्धवसेनेच्या खासदाराच्या

बैठकीसाठी येत असताना त्यांच्या ताफ्यामधील कार एकमेकांवर धडकून हा अपघात झाला. विक्रोळीजवळील महामार्गावर झालेल्या या अपघातात संजय दिना पाटील यांच्या ताफ्यामधील काही वाहनांचं किरकोळ नुकसान झालं. मात्र सुदैवाने या अपघातात कुणालाही दुखापत झाली नाही.

दरम्यान, महत्त्वपूर्ण बैठकीला येत असताना वाटेतच अपघात झाल्याने संजय दिना पाटील यांना मातोश्रीवरील बैठकीस पोहोचण्यास थोडा उशीर झाला. मात्र ते बैठकीला उपस्थित राहिले.

### वृद्ध शेतकऱ्याचे हातपाय बांधून

असल्याचे बोलले जात आहे. गंभीर अवस्थेत वृद्धाला उपचारासाठी अमरावती येथिल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेचा तपास पोलिसांनी सुरु केला असून संबंधित आरोपींची चौकशी, घटनास्थळाचा पंचनामा तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदविण्याचे काम सुरू असल्याची माहिती रहीमापूर पोलिसांकडून मिळाली आहे.

दरम्यान, एका वृद्ध व्यक्तीवर अशा प्रकारे कथित अत्याचार झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गावातील अनेकांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून अशा घटनांमुळे ग्रामिण भागातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

पोलीस तपासानंतरच घटनेमागील सत्य परिस्थिती स्पष्ट होणार असली तरी, वृद्ध व्यक्तीवर झालेल्या या कथित अमानुष प्रकाराने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. तपास निष्पक्षपणे होऊन संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### मध्यप्रदेशातून दुचाकीवर गुटख्याची

मिळाली होती. त्यानुसार पथकाने १३ जून रोजी पहाटे बुरडघाट येथील आरटीओ चेक पॉइंट परिसरात सापळा रचला. पहाटे संशयास्पदरीत्या येणाऱ्या एका दुचाकीला अडवून तपासणी करण्यात आली. झडतीदरम्यान दुचाकीस्वार शेख जमील शेख मुनीर (वय ३८, रा. परतवाडा) याच्याकडे प्रतिबंधित गुटखा आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेत गुटखा व दुचाकी असा ९२ हजार ६४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात शेख जमील याच्यासह मध्यप्रदेशातील खामला येथील रोशन किराणा दुकानाच्या मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पहिल्या कारवाईनंतर काही वेळातच त्याच मार्गावरून येणाऱ्या आणखी एका दुचाकीची तपासणी करण्यात आली. यावेळी इमरान शहा इब्राहीम शहा (वय २५, रा. धामणगाव गढी) याच्याकडेही मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आढळून आला. पोलिसांनी त्याला अटक करून गुटखा व दुचाकी असा १ लाख ३३ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात इमरान शहा याच्यासह यश डांगे आणि मध्यप्रदेशातील खामला येथील रौनक किराणा दुकानाच्या मालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास सुरू असून गुटखा पुरवठा साखळीतील इतर संबंधितांचा शोध घेण्यात येत आहे.

**बुरडघाट चेक पॉइंटवर एलसीबीचा 'वॉच'**- मध्यप्रदेश सीमेलगतच्या भागातून अमरावती जिल्ह्यात प्रतिबंधित गुटख्याची तस्करी वाढल्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. बुरडघाट आरटीओ तपासणी नाका हा तस्करांचा प्रमुख मार्ग बनत असल्याने या परिसरात सातत्याने गस्त व तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गतच अवघ्या तासाभरात दोन वेगवेगळ्या कारवाया करून गुटखा तस्करीचे प्रयत्न उधळून लावण्यात आले.

### बालाजी प्लॉट परिसरातील

मदतकार्य सुरू केले.

झाडाचा आकार मोठा असल्याने तसेच परिसरात वीजवाहिन्या व नागरिकांची वर्दळ असल्यामुळे हे काम अत्यंत जोखमीचे व आव्हानात्मक होते. मात्र उद्यान विभागाने हायड्राच्या सहाय्याने उत्कृष्ट नियोजन, तत्परता व समन्वय राखत झाड सुरक्षितपणे हटविले. या कार्यवाहीमुळे कोणतीही जीवितहानी अथवा वित्तहानी झाली नाही.

या मदतकार्यात एमएसईबीच्या कर्मचाऱ्यांनीही मोलाचे सहकार्य केले. वीजपुरवठ्याशी संबंधित आवश्यक खबरदारी घेऊन त्यांनी उद्यान विभागाशी समन्वय साधला, त्यामुळे संपूर्ण कार्यवाही अधिक सुरक्षित आणि सुरळीतपणे पार पडली. महानगरपालिकेच्या आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेने वेगाने कार्य करत परिसरातील नागरिकांना दिलासा दिला. संबंधित विभागांच्या दक्षतेमुळे वाहतूक व जनजीवन पूर्ववत करण्यात यश आले. या उल्लेखनीय कार्यासाठी उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, श्रीकांत गिरी, एमएसईबीचे संबंधित कर्मचारी तसेच उद्यान विभागाच्या संपूर्ण चमूचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या कर्तव्यदक्षतेमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत ही कार्यवाही यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली.

### नागरवाडी परिसरात गोवंश

आत विक्रीसाठी ठेवलेले गोवंश जातीच्या जनावराचे मांस आढळून आले. कारवाईदरम्यान पोलिसांनी १९० किलो गोमांस (किंमत ३८ हजार रुपये), लोखंडी तराजू, वजनाचे बाट, लाकडी ढोकळा, कुऱ्हाड, दोन सुऱ्या, मांस विक्रीतून मिळालेली रोकड तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी एमपी-१२ बीबी-३३६३ क्रमांकाची मोटारसायकल जप्त केली. चौकशीदरम्यान संशयितांना कत्तल करण्यात आलेल्या जनावराच्या मालकीबाबत कोणतेही कागदपत्र अथवा पुरावा सादर करता आला नाही. त्यामुळे पोलिसांनी शेख नसीम शेख सुलतान व शेख समीर शेख कबीर यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणिरक्षण अधिनियम १९९५ (सुधारणा २०१५) मधील कलम ५, ५(ब), ५(क), ९(अ) तसेच भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सतीश झाल्टे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरूड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार अवतारसिंग चव्हाण, पोउपनि सतीश झाल्टे तसेच धारणी पोलीस ठाण्याच्या पथकाने आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अविनाश कांबळे यांच्या सहकार्याने पार पाडली.

### सरसकट वीज पुरवठा बंद न

लागतात. या अशा प्रकारामुळे अमरावतीकर नागरिक वैतागून गेले आहेत. वीज तारा किंवा इतर काही कारणांसाठी सरसकट वीज पुरवठा बंद न करता, पथदिव्यांच पुरवठा बंद करावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### 'तक्रार निवारण दिनाला' नागरिकांचा

आढावा घेतला. याशिवाय संबंधित विभागांचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी आपल्या अधिपत्याखालील पोलीस ठाण्यांमध्ये उपस्थित राहून नागरिकांशी संवाद साधला. या उपक्रमादरम्यान जमीन व मालमत्ता वाद, कौटुंबिक तक्रारी, शेजारील वाद, फसवणूक, वाहतूक तसेच इतर नागरी स्वरूपाच्या विविध तक्रारी नागरिकांनी मांडल्या. अनेक तक्रारींचे जागेवरच समुपदेशन व चर्चेद्वारे निराकरण करण्यात आले, तर काही प्रकरणांमध्ये आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात आली. अमरावती ग्रामीण पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या परिसरातील समस्या, तक्रारी व अडचणी मांडण्यासाठी प्रत्येक शनिवारी आयोजित करण्यात येणाऱ्या तक्रार निवारण दिनाचा लाभ घ्यावा. नागरिकांनी मोठ्या संख्येने संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहनही करण्यात आले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ सोमवार, १५ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# तिवळी येथे एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

## दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यातील तिवळी येथे शनिवारी (१३ जून) दुपारी घडलेल्या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. संतोष तुकाराम बकाल (वय ४०) यांनी शेजारी शेतकरी दगडूजी ज्ञानबा बोरकर यांच्या शेतातील विद्युत टॉवरला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. त्यानंतर त्यांच्या पत्नी व दोन लहान मुलांचे मृतदेह स्वतःच्या शेतातील विहिरीत आढळून आल्याने गाव शोकसागरात बुडाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, संतोष बकाल यांनी शनिवारी सायंकाळी सुमारे ४.३० वाजताच्या सुमारास विद्युत टॉवरला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांची पत्नी इंद्रायणी संतोष बकाल (वय ३५), मुलगी जान्हवी संतोष बकाल (वय ८) आणि मुलगा सोहम संतोष बकाल (वय ५) यांचे मृतदेह त्यांच्या मालकीच्या शेतातील विहिरीत आढळून आले.

घटनेची माहिती मिळताच मालेगाव पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक धनराज तायडे हे आपल्या सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. गावकऱ्यांच्या मदतीने विहिरीतील मृतदेह बाहेर काढण्यात आले. तसेच विद्युत टॉवरवरून संतोष बकाल यांचा मृतदेह खाली उतरवून पंचनामा करण्यात आला.

यानंतर सर्व मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मालेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे तिवळी गावासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# इंझोरीच्या अडाण नदीत २४ तासांत तीन बळी

## आत्महत्या व बुडून मृत्यूच्या घटनांनी परिसर हादरला

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा- मानोरा तालुक्यातील इंझोरी येथील अडाण नदी परिसरात अवघ्या चोवीस तासांच्या अंतराने घडलेल्या दोन दुर्दैवी घटनांमध्ये एकूण तीन जणांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. एका घटनेत २२ वर्षीय युवकाने पुलावरून नदीत उडी घेऊन आत्महत्या केली, तर दुसऱ्या घटनेत पोहण्यासाठी गेलेल्या दोन मुलांचा नदीत बुडून मृत्यू झाला.

शनिवारी दुपारी कारंजा तालुक्यातील कुपटी (वापटी) येथील संचित सुभाष मुंदे (वय २२) या युवकाने इंझोरी गावाजवळील अडाण नदीच्या पुलावरून पाण्यात उडी घेत आत्महत्या केली. अकोला येथे शिक्षण घेत असलेला संचित हा मानोरा येथे गेला होता. त्याला परत आणण्यासाठी त्याचे वडील सुभाष मुंदे दुचाकीने गेले होते. कारंजाकडे परत येत असताना पुलाजवळ संचितने अचानक दुचाकी थांबवून नदीत उडी घेतली. मुलाला वाचविण्याच्या प्रयत्नात वडीलही पडून जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच अजय ढोक यांनी दादाजी रुग्णवाहिकेला कळविले. त्यानंतर संत गाडगे बाबा बचाव पथकाने शोधमोहीम राबवून संचितचा मृतदेह नदीतून बाहेर काढला. पुढील वैद्यकीय व कायदेशीर कार्यवाहीसाठी मृतदेह उपजिल्हा रुग्णालय, कारंजा येथे हलविण्यात आला. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. वैभव खडसे यांनी त्याला मृत घोषित केले. या बचावकार्यात शिवम खोंड, रोशन डाबेराव, छोटू बेलखेडे, संदेश मेश्राम, मयूर शेंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

याच अडाण नदीत रविवारी सकाळी आणखी एक हृदयद्रावक घटना घडली. श्री गोमुखेश्वर संस्थानसमोरील नदीत पोहण्यासाठी गेलेल्या दर्शन सुनील वावगे (वय १८, रा. भातकुली, जि. अमरावती) आणि शुभम अमोल धोंडे (वय १३, रा. इंझोरी) या दोघांचा बुडून मृत्यू झाला. दर्शन नदीत बुडू लागल्याचे पाहून त्याला वाचविण्यासाठी शुभमने पाण्यात उडी घेतली; मात्र दोघेही पाण्याच्या खोल भागात अडकून बुडाले. ग्रामस्थांनी तातडीने शोधमोहीम राबवून दोघांना बाहेर काढले आणि उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले.

अवघ्या एका दिवसात अडाण नदी परिसरात घडलेल्या या दोन वेगवेगळ्या घटनांमुळे इंझोरी व आसपासच्या परिसरात हळहळ व्यक्त होत असून नागरिकांमध्ये शोकाचे वातावरण पसरले आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे. तसेच नदी परिसरात सुरक्षिततेच्या उपाययोजना अधिक प्रभावी करण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे.

# वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेने चोरीचा ऑटो जेरबंद




■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव पोलीस ठाण्याच्या वाहतूक शाखेच्या सतर्कतेमुळे अनेक वर्षांपासून चोरीच्या गुन्ह्यात शोधात असलेला एक तिनचाकी ऑटो रिक्षा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई रविवारी (दि. १४ जून) मालेगाव-मेहकर मार्गावरील मेहकर बायपास येथे करण्यात आली.

मालेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार महेश यलगया जाधव व उमेश म्हस्के हे अवैध वाहतुकीवर कारवाई करीत असताना त्यांना एमएच २८ टी ३८८४ क्रमांकाचा एक संशयास्पद ऑटो मेहकरकडून येताना आढळला. संशय आल्याने त्यांनी वाहन थांबवून चालान मशीनद्वारे वाहनाची माहिती तपासली. तपासणीदरम्यान प्रत्यक्ष वाहनाची माहिती आणि ऑनलाइन नोंदीतील तपशीलामध्ये तफावत आढळून आली.

यानंतर वाहनचालक शेख सोहेल शेख शकील (वय २४ वर्षे, रा. मेहकर, ता. मेहकर, जि. बुलढाणा) यास वाहनासह ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले. पुढील चौकशीत संबंधित वाहनाविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून वाहन जप्त करण्यात आले आहे.

दरम्यान, पोलिसांच्या चालान मशीनवर प्राप्त झालेल्या रेड अलर्टच्या आधारे अधिक तपास केला असता सदर वाहन हे चोरीचे असल्याचे निष्पन्न झाले. या वाहनासंदर्भात पोलीस ठाणे एमआयडीसी भोसरी, जिल्हा पिंपरी-चिंचवड येथे गुन्हा क्रमांक २१/२०१७ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३७९ अंतर्गत चोरीचा गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली.

सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार किशोर चिंचोळकर करीत आहेत.

# ग्रामपंचायत आरक्षण बौद्ध समाजावर अन्याय करणारे - राजकुमार पडघान

■ प्रतिनिधी | वाशिम ■

संपूर्ण महाराष्ट्रात ज्या ज्या ग्रामपंचायतीच्या मुदती संपल्या आहेत, अशा सर्व ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत दि.१२ जून रोजी वाशीम जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायत चे आरक्षण सोडत त्या त्या ग्रामपंचायत मध्ये तहसील चे अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी, महसूल अधिकारी यांच्या नेमणुका करून विशेष ग्रामसभा घेऊन आरक्षण सोडत लहान मुलांच्या हाताने चिठ्ठी द्वारे काढून जाहीर केले.

पण हे आरक्षण या अगोदरच निवडणूक आयोगाने ठरविले होते.फक्त त्याची औपचारिकता म्हणून ते चिठ्ठी द्वारे काढून प्रभागातील वार्ड निहाय काढण्यात आले.हे ग्रामपंचायत आरक्षण सोडत म्हणजे केवळ बौद्ध समाजावर राजकीय अन्याय करणारे होय.असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे म्हटले आहे.शिवाय शासनाचा बौद्ध समाजाला राजकारणापासून वंचीत ठेवण्याचा कुटील डाव उघडपणे दिसत आहे.



पुढे राजकुमार पडघान यांनी म्हटले की, पूर्वी हे आरक्षण लोकसंख्येच्या प्रमाणात जातीनिहाय म्हणजे ज्या वार्डात ज्या समाजाची लोकसंख्या जास्त असेल त्या ठिकाणी त्याच समाजाचे लोकसंख्येनुसार आरक्षण होते.परंतु आता मात्र निवडणूक आयोगाने तसे न करता अनु.जातीचे आरक्षण हे वार्डात नसतांनाही त्या ठिकाणी ठेवले आहे.म्हणजे जेथे बौद्धांची संख्या नसतांनाही तेथे आरक्षण म्हणजे तेथील वार्डातून बौद्ध समाजाचे वैतीरिक्त उमेदवार निवडून आणायचा व बौद्ध समाज जास्त प्रमाणात असून त्यांना वंचीत ठेवायचे हे उघडपणे शासनाचा कुटील डाव दिसत आहे.

यासाठी शासनाने संबंधितांकडे यावर १९ जून ते २५ जून पर्यंत हरकत घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.यासंदर्भात वाशीम तालुक्यातील अडोळी येथे एक बैठक घेऊन या आरक्षण सोडतीवर हरकत घेण्याचे ठरविण्यात आले आहे.यावेळी एड.प्रमोद पट्टेबहादूर, पंकज पडघान,गोलू पडघान, संतोष पडघान, देवेंद्र खंडारे,मदन पडघान, अशोक खंडारे, रोहीत पडघान, शुक्लोधन पडघान,एन.के.कांबळे, आनंद खंडारे, संघर्ष खंडारे संजय खंडारे, प्रल्हाद खंडारे,राजू खंडारे यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत जिल्ह्याला मिळाला वाढीव इष्टांक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्याला शासनाकडून वाढीव इष्टांक मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये अंत्योदय अन्न योजनेसाठी ५१ हजार २९८ तर प्राधान्य कुटुंब योजनेसाठी ८ लाख ५३ हजार ९०१ इतका वाढीव इष्टांक प्राप्त झाला आहे.

प्राप्त झालेला वाढीव इष्टांक जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना त्यांच्या गरजेनुसार विभागून देण्यात आला असून, त्यानुसार पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

त्यामुळे अनेक प्रतीक्षाधीन कुटुंबांना आता राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत विशेषतः दिव्यांग व्यक्ती, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा महिला तसेच अत्यंत गरजू घटकांना प्राधान्याने लाभ देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे पात्र लाभार्थ्यांना दिलासा मिळणार असून अन्नसुरक्षा अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.असे जिल्हा पुरवठा अधिकारी दीपक बाजड यांनी कळविले आहे.

# विश्वमांगल्य सभेचा अधिकमास जप अनुष्ठान व यज्ञ संपन्न




■ प्रतिनिधी | कारंजा ■

धर्म संस्कृती परंपरांवरील आस्था पिढ्यान पिढ्या आमच्या घरात टिकून राहावी यासाठी अबालवृद्ध स्त्री जीवनाला धर्म संस्कृतीची शिक्षा देणे हे मुख्य कार्य विश्वमांगल्य सभेचा धर्म संस्कृती शिक्षा विभाग करतो आहे. आज पर्यंत आईच्या माध्यमातून घरातील धर्म संस्कृती परंपरांच श्रद्धास्थान भारताच्या प्रत्येक घरात टिकलेले आहे, त्यामुळे आईच्या माध्यमातून त्या धर्म संस्कृती परंपरांवरची आस्था कायम रहावी यासाठी, स्त्री जीवनातील धर्माधिष्ठान पक्के व्हावे यासाठीचे अनेक कार्यक्रम या विभागाद्वारे घेण्यात येतात.

त्या अंतर्गतच कारंजा शहरात अधिक मासाचे औचित्य साधुन मातृशक्तीने महिनाभर 'ओम नमो भगवते वासुदेवाय' या दिव्य मंत्राच्या जपाचे अनुष्ठान केले होते. महिन्याभरात ६९ लाख ५९५२ एवढा नामजप पूर्ण झाला. या अनुष्ठानाचा पूर्णाहुती सोहळा यज्ञ श्री कामाक्षा माता मंदिरात शनिवार, दि.१३ जुन २०२६ रोजी अतिशय उत्साहात संपन्न झाला.

यज्ञाला यजमान म्हणून एडवोकेट श्री. अविनाश देशपांडे व सौ.अनघा देशपांडे हे दांपत्य बसले होते.

उपस्थित सर्व साधक मातृशक्तीने देखील यज्ञात स्वहस्ते आहुत्या दिल्या व या यज्ञाचा आनंद लुटला. पूर्णाहुती नंतर आरती व श्री व्यंकटेश विजय स्तोत्रा चे सामुहिक पठण झाले. या नामजपाच्या अनुष्ठानाचा संकल्प अधिक मासाच्या पहिल्या दिवशी श्री मुरलीधर मंदिर येथे सोडण्यात आला होता व तिथून नामजपाला सुरुवात झाली. या अधिक महिन्यात मातृशक्तीने घरातील सर्व सदस्यांना भक्तिमार्गाला लावले.

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत वाढीव इष्टांक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्याला शासनाकडून वाढीव इष्टांक मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये अंत्योदय अन्न योजनेसाठी ५१ हजार २९८ तर प्राधान्य कुटुंब योजनेसाठी ८ लाख ५३ हजार ९०१ इतका वाढीव इष्टांक प्राप्त झाला आहे. प्राप्त झालेला वाढीव इष्टांक जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना त्यांच्या गरजेनुसार विभागून देण्यात आला. पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक प्रतीक्षाधीन कुटुंबांना आता राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# सोया मिल्क - टोफू निर्मिती प्रात्यक्षिक, वृक्षारोपण उत्साहात

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

ग्रामीण विकास, पर्यावरण संवर्धन व शेतकरी सक्षमीकरणाच्या उद्देशाने एचडीएफसी बँक पुरस्कृत वैंघ्इ द्वारा संचालित सर्वांगीण ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत जामखेड येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास सोयाश्री शेतकरी उत्पादक कंपनी, जामखेड यांचे विशेष सहकार्य लाभले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोयाश्री शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक नामदेव आखंड होते. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार अरविंद करांगळे, आत्मा विभागाच्या संचालक अनिशा महाबळे, तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर, एचडीएफसी बँक रिसोडचे शाखा व्यवस्थापक श्रीकांत अढीचवाल, मालेगाव शाखेचे व्यवस्थापक प्रदीप तायडे तसेच बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधत कृषी विकास, शासकीय योजना, बँकिंग सुविधा व आर्थिक नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. ंिंअइ प्रकल्प वाशिमचे प्रकल्प व्यवस्थापक सुमेध ठमके यांनी खरीप हंगामपूर्व तयारी व विविध उपक्रमांची माहिती दिली. ंिघ्इ चे अधिकारी आकाश सनिसे यांनी ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत झालेल्या कामांचा आढावा घेत शेतकरी हिताच्या उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे सोयाश्री शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत आयोजित करण्यात आलेले सोया मिल्क व सोया पनीर (टोफू) निर्मितीचे प्रात्यक्षिक. सोयाबीनपासून मूल्यवर्धित उत्पादनांची निर्मिती व त्यातील व्यवसाय संधी याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांना तयार केलेल्या सोया पनीरचे चव परीक्षणही देण्यात आले.जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मान्यवर व शेतकरी बांधवांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

हा कार्यक्रम शैलेश भगत (मुख्य कार्यक्रम व्यवस्थापक) व पवन डोंगरे (एचडीएफसी बँक एऐं व्यवस्थापक) यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तावडे सर, १२ गावांतील सीआरपी ताई, गाव विकास समितीचे पदाधिकारी, सोयाश्री शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष संदीप पोफळे, संचालक मंडळ व सदस्यांनी योगदान दिले.

# सवड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया सुरू

■ प्रतिनिधी | रिसोड ■

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, सवड (ता. रिसोड, जि. वाशिम) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन प्रवेश अर्ज सादर करावेत, असे आवाहन वसतिगृह प्रशासनाने केले आहे.

वसतिगृहामध्ये मागासवर्गीय प्रवर्गनिहाय आरक्षित जागांनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, दिव्यांग तसेच अनाथ प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी उपलब्ध आहे.

**इयत्ता ८ वी, ११ वी तसेच प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्जाचे आवाहन**

शालेय विभागातील इयत्ता ८ वी, कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी तसेच बिगर व्यावसायिक व व्यावसायिक महाविद्यालयांच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी ऑनलाइन अर्ज करण्यास पात्र आहेत.

शासनामार्फत विद्यार्थ्यांना निवास, भोजन व इतर विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्याने पात्र विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने ऑनलाइन अर्ज करून या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गोआधारित नैसर्गिक शेती ही हवामान बदलाच्या आव्हानांवर प्रभावी उपाययोजना

## माजी खासदार अनंतराव देशमुख यांचे प्रतिपादन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

बदलते हवामान, मृदेचे खालावत चाललेले आरोग्य, वाढता उत्पादन खर्च आणि पिकांच्या उत्पादकतेत होत असलेली घट या पार्श्वभूमीवर गोआधारित नैसर्गिक शेती ही काळाची गरज बनली असल्याचे प्रतिपादन सुविदे फाउंडेशन संचलित कृषी विज्ञान केंद्र वाशिमचे अध्यक्ष तथा माजी खासदार अनंतराव देशमुख यांनी केले. रासायनिक निविष्ठांवरील वाढते अवलंबित्व, मृदेतील सेंद्रिय कर्बाचे घटते प्रमाण आणि हवामानातील अनिश्चितता यामुळे शेती व्यवसाय आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक होत आहे. या परिस्थितीत मातीचे जैविक, भौतिक आणि रासायनिक गुणधर्म सुधारून तिची अन्नद्रव्य पुरविण्याची क्षमता तसेच दुष्काळ, अतिवृष्टी व तापमानातील चढ-उतार यांसारख्या हवामानजन्य ताणांना सामोरे जाण्याची क्षमता वाढविणे आवश्यक आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी गोआधारित नैसर्गिक शेती हा प्रभावी, शाश्वत आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरत आहे.

कृषी विज्ञान केंद्र वाशिम यांच्या माध्यमातून मागील सात वर्षांपासून गोआधारित नैसर्गिक शेती, विशेषतः 'गोकृपा अमृत' शेती पद्धतीचा प्रचार व प्रसार विविध प्रात्यक्षिके, प्रशिक्षणे आणि शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमांद्वारे करण्यात येत आहे. उद्यानविद्या विभागाच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली विविध पिकांमध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या प्रयोगांमधून उत्पादन खर्चात सुमारे ५० ते ५५ टक्के बचत तसेच १२ ते ३० टक्क्यांपर्यंत उत्पादनवाढ झाल्याचे सकारात्मक निष्कर्ष समोर आले आहेत.



आज वाशिम जिल्ह्यातील शेकडो शेतकरी या तंत्रज्ञानाचा यशस्वी अवलंब करून आत्मनिर्भर आणि शाश्वत शेतीच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. केंद्र शासनाच्या 'आत्मनिर्भर शेती – आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला बळकटी देणारे हे कार्य जिल्ह्यात प्रभावीपणे पुढे जात आहे. गोपालभाई सुतारिया, बन्सी गीर गोशाळा, अहमदाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राज्य व केंद्र शासनाच्या प्रोत्साहनामुळे या उपक्रमाने चळवळीचे स्वरूप धारण केले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या बैठकीमध्ये गोपालभाई सुतारिया यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर कृषी विज्ञान केंद्र, वाशिमच्या नैसर्गिक शेतीविषयक कार्याची माहिती सादर केली असता त्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय गुजरात राज्याचे कृषी व पशुसंवर्धन मंत्रीजितुभाई वाघाणी यांच्या हस्ते गोआधारित नैसर्गिक शेती यशस्वीपणे राबविणाऱ्या वाशिम जिल्ह्यातील १७ प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. देशमुख पुढे म्हणाले की, गोकृपा अमृतमधील उपयुक्त सूक्ष्मजीव, अन्नद्रव्य विरघळविणारे जीवाणू, जैविक कीड व रोग व्यवस्थापनास सहाय्यक सूक्ष्मजीव तसेच उत्तम प्रतीच्या कुजलेल्या शेणखताचा वापर यामुळे मृदास्वास्थ्य सुधारते, पिकांची वाढ जोमदार होते.

# विधान परिषद निवडणुकीत नवा ट्विस्ट!

## चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या पॅनेलची घेतली भेट

**नागपूर :** काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या पाठिंब्याने बुटीबोरी नगर परिषदेत सत्ता मिळवलेल्या परिवर्तन पॅनेलच्या पदाधिकाऱ्यांसोबत नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या बैठकीमुळे विधान परिषद निवडणुकीच्या राजकारणाला नवा ट्विस्ट मिळाला आहे.

**भाजपच्या मताधिक्याच्या रणनीतीला बळ**

विधान परिषद निवडणुकीत भाजपकडे विजयासाठी आवश्यक संख्याबळ असल्याचे मानले जात असले तरी पक्षाने मताधिक्य वाढविण्यासाठी स्वतंत्र प्रयत्न सुरू केले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांशी संपर्क साधून व्यापक पाठिंबा मिळविण्याची रणनीती भाजपने आखल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर बुटीबोरीतील परिवर्तन पॅनेलशी वाढलेला संवाद राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात आहे. सहा महिन्यांपूर्वी नगर परिषद निवडणुकीत भाजपला पराभूत करणाऱ्या याच आघाडीची भूमिका आता उत्सुकतेचा विषय ठरत आहे.

**बावनकुळे यांच्या उपस्थितीत खलबते**

गुरुवारी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत नगर परिषदेचे सभापती अमजद शेख यांच्या निवासस्थानी बैठक पार पडली. या बैठकीस आमदार समीर मेघे, डॉ. राजीव पोतदार, नगराध्यक्ष सुमित मेंढे, उपाध्यक्ष आकाश वानखेडे, माजी नगराध्यक्ष बबलू गौतम, नगरसेवक समीर बोरकुटे, नगरसेविका करिश्मा भुमरकर यांच्यासह अन्य नगरसेवक



उपस्थित होते. बैठकीतील चर्चेचा तपशील अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आलेला नसला तरी तिचा संबंध आगामी विधान परिषद निवडणुकीशी जोडला जात आहे.

**परिवर्तन पॅनेलचे राजकीय वजन वाढले**

बुटीबोरी नगर परिषद निवडणुकीत परिवर्तन पॅनेलने २१ पैकी १७ जागा जिंकून सत्ता हस्तगत केली होती. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या पाठिंब्यामुळे या आघाडीला भक्कम ताकद मिळाली होती. स्थानिक पातळीवर भाजपविरोधी वातावरण निर्माण करत भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर ही निवडणूक लढविण्यात आली होती. त्यामुळे या पॅनेलची भूमिका केवळ बुटीबोरीपुरती मर्यादित न राहता जिल्ह्यातील राजकीय समीकरणांवर परिणाम करणारी ठरू शकते, असे जाणकारांचे मत आहे.

नगर परिषद निवडणुकीत भाजपविरोधी भूमिका घेऊन सत्तेवर आलेल्या परिवर्तन पॅनेलकडून आता भाजपला पाठिंबा मिळण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने विरोधी पक्षांच्या गोटात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी बावनकुळे आणि परिवर्तन पॅनेलच्या नेत्यांमधील भेटीमुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या घडामोडींमुळे स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची नांदी मिळाल्याचे मानले जात असून आगामी काही दिवसांत या हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गुरुवारी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत नगर परिषदेचे सभापती अमजद शेख यांच्या निवासस्थानी बैठक पार पडली. या बैठकीस आमदार समीर मेघे, डॉ. राजीव पोतदार, नगराध्यक्ष सुमित मेंढे, उपाध्यक्ष आकाश वानखेडे, माजी नगराध्यक्ष बबलू गौतम, नगरसेवक समीर बोरकुटे, नगरसेविका करिश्मा भुमरकर यांच्यासह अन्य नगरसेवक उपस्थित होते.

बैठकीतील चर्चेचा तपशील अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आलेला नसला तरी तिचा संबंध आगामी विधान परिषद निवडणुकीशी जोडला जात आहे.

## संक्षिप्त

### घाटकोपर, दादर आणि आता गिरगाव चौपाटीच्या पदपथावरही पांढऱ्या पट्ट्या

**घाटकोपर** -विद्याविहार, दादर मध्ये रस्त्यावर आखलेल्या पांढऱ्या पट्टूयांवरचा वाद शमत नाही तोच आता अशा पट्टूया गिरगाव परिसरातही दिसून आल्या आहेत. चर्नीरोड येथे चौपाटीच्या पदपथावर अशा पांढऱ्या पट्टूया दिसून आल्या आहेत. मात्र मध्यरात्रीच या पट्टूयावर काळा रंगही फासून विरोध दर्शवण्यात आला आहे. या पांढऱ्या पट्टूयांमुळे आता घाटकोपर, दादर मधील जैन विरूद्ध मराठी वाद गिरगावातही पोहोचला असल्याचे चित्र आहे. गेल्या आठवड्यात विद्याविहार परिसरातील एका सोसायटीत जैन कुटुंबाने साधुंच्या आगमनासाठी पांढऱ्या पट्टूया आखल्याचे प्रकरण उजेडात आले होते. समाजमाध्यमावरील इन्फ्लुएन्सर प्रसाद वेदपाठक यांनी याबाबत समाज माध्यमावरून नाराजी व्यक्त केली होती. त्यावरून खूप मोठा वाद निर्माण झाला होता. हा वाद थांबत नाही तोच शुक्रवारी अशाच पांढऱ्या पट्टूया दादरमध्येही एका दिसून आल्या. दादरमधील गोखले मार्गावर जैन धर्मियांच्या प्रार्थनास्थळाच्या जवळील सार्वजनिक रस्त्यावर अशा पांढऱ्या पट्टूया आखण्यात आल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेतली. मनसेने दिलेल्या इशाऱ्यानंतर पालिका प्रशासनाने या पट्टूया राखाडी रंग मारून झाकून टाकल्या. या वादाला एक दिवस उलटत नाही तोच आता अशाच पट्टूया चर्नीरोड-गिरगाव परिसरातही दिसल्या आहेत. चर्नीरोड परिसरातील चौपाटीलगतच्या पदपथावर अशी पांढरी पट्टी आखल्याचे सकाळी दिसून आले. या पांढऱ्या पट्टीविरोधात आम्ही गिरगावकर या संस्थेने आक्रमक भूमिका घेतली आहे. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी आणि स्थानिक गिरगावकरांनी एकत्र येऊन या पांढऱ्या पट्टूयांवर रात्रीच्या सुमारास काळा रंग लावला आहे. याबाबतची छायाचित्रे आणि ध्वनिचित्रफिती समाजमाध्यमांवरून मोठ्या प्रमाणावर प्रसारित होऊ लागल्या आहेत.

### चार्टर्ड अकाउंटंटला लॉजवर डांबून ठेवत मारहाण

**नाशिक:** नाशिकरोड येथील चार्टर्ड अकाउंटंटचे (सीए) अठरा लाखांच्या खंडणीसाठी अपहरण करून डांबून ठेवत मारहाण केल्याची घटना घडली आहे. उपनगर पोलिसांनी दोघांना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली. दोघांचे साथीदार पसार झाले आहेत. सीए अक्षय लोया हे २३ मे रोजी मुंबई नाका येथील एका हॉटेलमध्ये रॉक वेस्ट कंपनीच्या बैठकीला ते गेले असता तेथे अविनाश पारेकर, हिंमाशु पाटील यांच्याशी ओळख झाली. गुरुवारी (दि. ११) दुपारी तीन वाजता लोया रुंग्टा शॉपिंग हब येथे गेले असता तेथे अविनाश व हिमांशू हे दोघे पुन्हा भेटले. यावेळी दोघांनी 'आमच्याकडे पंधरा लाख रुपये रोख आहेत. मुंबईला सुरक्षित पाठवायचे आहेत. कोणी आहे का,' असे अक्षयला विचारले. लोया यांनी, 'माझ्या परिचयाची व्यक्ती नेहमी मुंबईला जाते, तिला देऊ', असे मदत करण्याच्या उद्देशाने सांगितले. त्यानंतर अविनाश व हिमांशु यांनी सांगितल्यानुसार सायंकाळी दिंडोरी नाका येथे योगेश महाजन याच्याकडे पंधरा लाख रुपये घेण्यास लोया गेले.

### वाहन चालकाना समुपदेशन

**मुंबई :** हँड ब्रेक, क्लच अन् स्टेअरिंग हाताळताना चालकांनी दक्षता घ्यावी. शहरातील रस्त्यांवर बेस्ट बसचा स्पीड मर्यादितच ठेवा. आगारातून बाहेर पडताना बसची योग्य तपासणी करून द्यावी, तसेच रस्त्यांवर दुचाकी जात असेल तर ओव्हरटेक करू नका, अशा प्रकारचे समुपदेशन सध्या बेस्टमधील चालकांचे करण्यात येत आहे. दादर येथील अपघातानंतर उपक्रमाने चालकांचे समुपदेशन करण्यास सुरुवात केली आहे. सुमारे ७ हजारांहून अधिक चालकांचे समुपदेशन करण्यात येणार आहे. कुर्ला, भांडुप, दादर, कांदिवली येथे बेस्ट बसचे अपघात झाले आहेत. महत्त्वाचे म्हणजे हे सगळे अपघात भाडेतत्त्वावरील बसचे झाले असून भाडेतत्त्वावरील बसच्या सुरक्षित प्रवासावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बेस्टचे सद्यस्थितीत २५ लाख प्रवासी आहेत. सुरक्षित व सर्वांत स्वस्त प्रवास म्हणून मुंबईकर बेस्टने प्रवास करतात.

### धायरीत १५ वर्षीय मुलगा ३० हजार रुपयांच्या गांजासह ताब्यात

**पुणे :** पुणे शहरातील अमली पदार्थ तस्करांविरुद्ध कडक कारवाईचे आदेश पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिले आहे. धायरी परिसरात गांजा विक्री प्रकरणात १५ वर्षीय नांदेड सिटी पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक किलो ६४ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेला १५ वर्षीय मुलगा मूळचा बीडमधील आनंदनगरचा रहिवासी आहे. याबाबत पोलीस हवालदार संग्राम शिनगारे यांनी नांदेड सिटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

**वाशीम:** वाशीम जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यातील तिवळी गावात एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार शनिवारी रात्री समोर आला. पतीचा मृतदेह विजेच्या टॉवरला लटकलेल्या अवस्थेत, तर पत्नी व मुलांचे मृतदेह विहिरीत आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. कौटुंबिक वादातून मुलांना विहिरीत ढकलून स्वतः आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे. वाशीम जिल्ह्यातील शिरपूर जैन पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या तिवळी गावातून एक अत्यंत दुर्दैवी खळबळजनक घटना समोर आली. एकाच कुटुंबातील पती, पत्नी आणि त्यांच्या दोन निष्पाप लहान मुलांचे मृतदेह शेतात आढळून आले. तिवळी येथील बकाल यांच्या स्वतःच्या शेतात हे मृतदेह आढळून आले आहेत. संतोष तुकाराम बकाल (वय ३८) यांचा मृतदेह शेतातील विजेच्या टॉवरला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. वर्षा संतोष बकाल (वय ३४) यांचा मृतदेह शेतातील विहिरीत आढळून आला. जान्हवी संतोष बकाल (मुलगी, वय अंदाजे ७) व सोहम संतोष बकाल (मुलगा, वय अंदाजे ६) या चिमुकल्यांचे मृतदेह विहिरीत हात-पाय बांधलेल्या अवस्थेत आढळून आले.

### मनसेची मुंब्रा – भिवंडीत जाण्याची हिंमत आहे का?

**मुंबई-** घाटकोपर येथील पांढऱ्या पट्टीवरून सुरू झालेला वाद शनिवारी दादरपर्यंत पोहोचला. दादर परिसरातील गोखले मार्गावरही पांढऱ्या पट्टूया काढण्यात आल्याचे निदर्शनास आल्यानंतर मनसेने आक्रमक भूमिका घेतली. त्या संदर्भात मनसैनिकांनी शनिवारी दुपारपर्यंत अल्टिमेटम दिल्यानंतर त्यापूर्वीच प्रशासनाने घटनास्थळी पोहोचून पांढऱ्या पट्टूया हटवण्याची कारवाही केली. त्यावरून जैन समाजाचे धर्मगुरू निलेश चंद्र मुनी यांनी आक्रमक भूमिका घेतली असून मनसेला खुले आव्हान दिले. वृत्तवाहिनीशी बोलताना निलेश चंद्र मुनी यांनी पांढऱ्या पट्टूया हटवण्याच्या मनसेच्या भूमिकेवर टीका केली. घाटकोपर आणि दादर येथील जैन धर्माच्या पांढऱ्या पट्टूयावरून मनसेला धोका वाढतो. हिंमत असेल तर त्यांनी मुंब्रा, भिवंडी येथे जाऊन दाखवावे, पण तिथे ते जाणार नाही.

## बेस्ट बसबाबत सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत

**मुंबई:** बेस्ट उपक्रमाचे रुतलेले चाक बाहेर काढण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करूनही प्रशासनाच्या कारभाराला गती मिळत नाही.

याचा प्रवाशांसोबत, कर्मचाऱ्यांनाही फटका बसत आहे. या आर्थिक कोंडीतून 'बेस्ट'ला बाहेर काढण्यासाठी उपक्रमाचे मुंबई महापालिकेतच विलीनीकरण करण्याचा विचार आता पुन्हा एकदा जोरकसपणे पुढे आला असून त्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या आहेत. महापालिकाही यासाठी सकारात्मक असल्याचे सांगितले जात आहे.

बेस्ट समितीच्या अध्यक्ष तृष्णा विश्वासराव यांनीच यासाठी पुढाकार घेतला आहे.

त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्यासोबत बेस्ट महाव्यव स्थापक सोनिया सेठी यांच्याकडे याबाबत चर्चा केली. बेस्ट उपक्रमाच्या पुनरुज्जीवना साठी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा या निवासस्थानी नुकतीच बैठक पार पडली. यामध्ये आधुनिकीक रणासंदर्भात आराखडा सादर करण्यात आला.

## 'काँग्रेस-भाजपा नको, आमच्या रिपब्लिकन पक्षासोबत या'

### रामदास आठवलेंची शरद पवारांना खुली ऑफर

**नवी दिल्ली** - यापूर्वी शरद पवारांनाकाँग्रेससोबत जाण्याचा सल्ला दिला होता. परंतु, आता ती परिस्थिती राहिलेली नाही. काँग्रेसला भविष्य नाही. त्यामुळे शरद पवारांना एनडीएमध्ये यावे. काँग्रेस भाजपा नको असेल, तर शरद पवारांनी आमच्या आरपीआय पक्षासोबत यावे, अशी खुली ऑफर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी थेट शरद पवारांना दिली आहे. पत्रकारांशी बोलताना रामदास आठवले यांनी सदर आवाहन केले आहे.

पश्चिम बंगालमध्ये झालेले सत्तांतर, तृणमूल काँग्रेसमध्ये पडलेली मोठी फूट यामुळे देशातील राजकारण ढवळून



निघाले आहे. एकीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट काँग्रेसमध्ये विलीन करण्याबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या चर्चांमध्ये रामदास आठवले यांचे नाव जोडले गेले आहे.

**काँग्रेस-भाजपा नको, आमच्या रिपब्लिकन पक्षासोबत या**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट हा काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चांबाबत रामदास आठवले यांना प्रतिक्रिया विचारण्यात आली. यावर बोलताना ते म्हणाले की, मला वाटते की, शरद पवारांनी आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करू नये. मी त्यांना पूर्वीच तसा सल्ला दिला होता.

परंतु, आता काँग्रेसमध्ये काही दम राहिलेला नाही. काँग्रेसला चांगले भविष्य दिसेल, अशी परिस्थिती नाही. शरद पवारांना काँग्रेसकडे जाण्यापेक्षा आमच्याकडे यावे. NDA मध्ये शरद पवारांनी येणे आवश्यक आहे. अजित पवार एनडीएमध्ये आले, आज अजितदादा असते, तर कदाचित शरद पवारही एनडीएमध्ये आले असते.

## मुंबई विमानतळाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी

**मुंबई** - नुकताच एक धक्कादायक घटना पुढे येत आहे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली. अज्ञाताकडून धमकीचा मेल आला. या धमकीच्या मेलनंतर सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आली. यानंतर तात्काळ अलर्ट जारी करण्यात आला. अज्ञाताविरोधात पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हाही नोंद करण्यात आला. गेल्या काही दिवसांपासून अशाप्रकारच्या धमकीचे मेल किंवा फोन येण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली. स्थानिक पोलिस, बीडीडीएसच्या पथकाकडून विमानतळ परिसराची तपासणी केली जात आहे. यादरम्यान संशयास्पद काहीही न सापडल्याची प्राथमिक माहिती समोर आलीये. मात्र, सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आहेत. कसून तपासणी केली जात आहे. मुंबई विमानतळावरून दररोज



हजारोंच्या घरात विमानांचे उड्डाण होते.

लाखोंच्या घरात प्रवासी ये-जा करतात. देशातील महत्वाचे विमानतळ मुंबई विमानतळाकडे बघितले जाते. यादरम्यानच धमकीचा मेल आल्याने एकच खळबळ उडाली. पोलिसांकडून या प्रकरणात तपास केला जात आहे. मेलमध्ये थेट मुंबई विमानतळाला बॉम्बने उडवून टाकण्याची धमकी देण्यात आली. या धमकीच्या मेलनंतर यंत्रणा अलर्ट मोडवर आहेत.

काही दिवसांपूर्वीच मुंबई विमानतळ आणि ताज हॉटेलला बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली होती. मुंबई विमानतळ पोलिसांच्या ईमेल आयडीवर मेल करत ही धमकी देण्यात आली होती. ज्यानंतर सुरक्षा वाढवण्यात आली होती. ईमेलमध्ये दावा करण्यात आला होता की ताज हॉटेल आणि विमानतळाला बॉम्बने उडवले जाईल. या घटनेला काही दिवस होत नाहीत तोवरच आता पुन्हा अशाचप्रकारचा मेल आला.

यासोबतच दोन दिवसांपूर्वीच पुण्याच्या आणि मुंबईच्या महापौरांना धमकीचा मेल आला होता.

## राज्यात मोठा राजकीय भूकंप? उद्धव ठाकरे यांना मोठा झटका?

**मुंबई** -रविवारी राज्यात मोठी राजकीय घडामोड घडत आहे. उद्धव ठाकरे यांनी आज मातोश्रीवर बैठक बोलावली आहे. या बैठकीला सद्या खासदार अरविंद सावंत, राजाभाऊ वाजे, संजय राऊत, विनायक राऊत हे उपस्थित झाले आहे तर दोन खासदार हे ऑनलाईन उपस्थित असतील. दोन खासदार सध्या नॉट रिचेबल आहे. इतर खासदार लवकरच मातोश्रीवर पोहचत आहेत. दरम्यान ऑपरेशन टायगरचा मुहूर्त आणि तारीख ठरल्याची माहिती शिंदे सेनेच्या एका बड्या नेत्याने टीव्ही ९ मराठीला दिली आहे. पुढील आठवड्यात मोठा खेला होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

येत्या ७-८ दिवसात ठाकरे सेनेचे काही खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत दिसतील असा दावा मोठ्या नेत्याने केला आहे. ऑपरेशन टायगरची तारीख आणि मुहूर्त या नेत्याने




सांगितला आहे. पण किती आणि कोण खासदार शिंदे सेनेसोबत येतील याची माहिती त्यांनी दिली नाही. त्यामुळे शिंदे सेनेत जाणारे खासदार कोण हे मात्र अद्याप गुलदस्त्यातच आहे. येत्या एक ते दोन दिवसात याविषयीची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे हे सकाळपासून नॉट रिचेबल आहेत. त्यांचा मोबाईल सकाळपासून लागत नसल्याची माहिती समोर आली आहे. तर परभणीचे खासदार संजय जाधव यांच्याविषयी माहिती समोर आलेली नाही. यापूर्वी त्यांनी उद्धव सेना सोडण्याचे स्पष्ट संकेत दिले होते.

त्यांनी राजकीय व्यावहारिकपणाचे संकेत दिले होते. तर खासदार नागेश पाटील आष्टीकर आणि संजय देशमुख हे ऑनलाईन उपस्थित असतील.

येत्या दहा दिवसात एकनाथ शिंदे यांच्या सेनेत उद्धव सेनेचे काही खासदार येण्याची शक्यता बड्या नेत्याने वर्तवली आहे. येत्या दहा दिवसात मोठा राजकीय भूकंप होण्याची शक्यता या नेत्याने वर्तवली आहे.

## अकरावीच्या दुसऱ्या गुणवत्ता यादीत कटऑफ वधारला

### वाणिज्य आणि विज्ञान शाखांसाठी विद्यार्थ्यांमध्ये रस्सीखेच

**मुंबई :** अकरावी प्रवेशाच्या पहिल्या गुणवत्ता यातील पात्रता गुणांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत अल्प घट झाली होती. त्यामुळे दुसऱ्या फेरीमध्ये पात्रता गुणांमध्ये घसरण होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र दुसऱ्या यादीत मुंबईतील काही नामांकित महाविद्यालयांमध्ये पात्रता गुणांमध्ये घसरण होण्याऐवजी वाढ झाल्याने विद्यार्थ्यांना मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेण्याशिवाय पर्याय नसल्याचे दिसून येत आहे.

दुसऱ्या फेरीसाठी १ लाख ४६ हजार ८२७ विद्यार्थी पात्र ठरले होते. त्यापैकी ७१ हजार ८९ विद्यार्थ्यांना जागा वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, या विद्यार्थ्यांपैकी २९ हजार ५६९ जणांना त्यांच्या पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले आहे. १२ हजार ७४ विद्यार्थ्यांना दुसऱ्या पसंतीक्रमाची, तर ८ हजार ६०३ विद्यार्थ्यांना तिसऱ्या पसंतीक्रमाची जागा मिळाली आहे. म्हणजेच जवळपास निम्म्या विद्यार्थ्यांना पहिल्या तीन पसंतीक्रमांपैकी एखाद्या महाविद्यालयात प्रवेशाची संधी मिळाली आहे. यावरून मुंबई विभागातील दुसऱ्या गुणवत्ता यादीच्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांचा कल नामांकित महाविद्यालयांकडे असल्याचे अधोरेखित होते.

दुसऱ्या फेरीत जागा मिळालेल्या ७१ हजार ८९ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ३९ हजार १८७ विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेत, २४ हजार ४१८ विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेत आणि केवळ ७ हजार ४८४ विद्यार्थ्यांना कला शाखेत प्रवेश मिळाला आहे. यावरून वाणिज्य आणि विज्ञान शाखांसाठीची स्पर्धा यंदाही सर्वाधिक तीव्र असल्याचे दिसून येते.

वाणिज्य आणि विज्ञान शाखांमध्ये विद्यार्थ्यांची पसंती मोठ्या प्रमाणात असल्याने पात्रता गुणांमध्ये फारशी घट झालेली नाही. पोदार महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेचा कटऑफ ९४.२ टक्क्यांवरून ९४.४ टक्क्यांवर पोहोचला आहे. वझे-केळकर महाविद्यालयातही वाणिज्य शाखेचा कटऑफ ९२.४ वरून ९३.४ टक्क्यांपर्यंत वाढला. एचआर, एनएम, एमसीसी, डहाणूकर, रुईया, सेंट झेविअर्स यांसारख्या प्रतिष्ठित महाविद्यालयांमध्ये कटऑफ अजूनही ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आहे. त्यामुळे दुसऱ्या यादीतही उच्च गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचाच वरचष्मा दिसून आला.

कला शाखेत कटऑफ मोठ्या प्रमाणात खाली येण्याची विद्यार्थ्यांची अपेक्षा फोल ठरली आहे. जय हिंदमध्ये कला शाखेचा कटऑफ ८९ वरून ८८.८ टक्क्यांवर, रुईयामध्ये ९१.८ वरून ९१.४ टक्क्यांवर, तर वझे-



केळकरमध्ये ८९.४ वरून ८९.२ टक्क्यांवर आला आहे. काही महाविद्यालयांमध्ये तर कटऑफ जवळपास स्थिरच राहिला आहे. विज्ञान शाखेतही रुईया, रुपारेल, सेंट झेविअर्स, के. जे. सोमय्या, बांदोडकर यांसारख्या महाविद्यालयांमध्ये ९० टक्क्यांहून अधिक गुणांची मागणी कायम आहे. त्यामुळे विज्ञान शाखेसाठीची स्पर्धा अजूनही तीव्र आहे.

पुढील यादीत मोठी घसरण होईल, अशी अपेक्षा असलेल्यांना फारसा फायदा झालेला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अधिक फेऱ्यांची वाट न पाहता मिळालेल्या पसंतीक्रमाच्या महाविद्यालयात प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शिक्षणतज्ज्ञांकडून करण्यात आले आहे.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १९८ ■ सोमवार, १५ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

### सायकल चालवा... फिट राहा

## वर्धा पोलिसांची संडे ऑन सायकल रॅली ठरली आरोग्याचा जल्लोष; शहरभर फिटनेसचा संदेश




**वर्धा जनमाध्यम :** आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि फिटनेसचा संदेश देत वर्धा जिल्हा पोलिस दलातर्फे रविवारी सकाळी संडे ऑन सायकल या विशेष सायकल रॅलीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. सकाळी ठीक ६ वाजता पोलिस मुख्यालयातून रॅलीला शानदार सुरुवात झाली आणि शहरभर सायकल चालवा फिट राहा चा संदेश घुमला.

पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वर्धा पोलिस दलातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि अंमलदार पांढऱ्या गणवेशात सहभागी होत सायकलस्वारांचा उत्साह वाढवत होते. वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक विलास पाटील तसेच राखीव पोलिस निरीक्षक यांचीही प्रमुख उपस्थिती होती. रॅलीमध्ये शहरातील विविध सायकलिंग क्लबचे सदस्य, तरुणाई, ज्येष्ठ नागरिक आणि शाळकरी मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. रंगीबेरंगी सायकलिंग जर्सी, हेल्मेट आणि घोषणांनी संपूर्ण वातावरण उत्साहाने भारून गेले होते. आरोग्यदायी जीवनासाठी सायकल चालवा, निरोगी राहा पर्यावरण वाचवा अशा घोषणांनी शहरातील प्रमुख मार्ग दुमदुमून गेले.

या उपक्रमातून पर्यावरण संरक्षण, इंधन बचत आणि नियमित व्यायामाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आले. रॅलीच्या समारोपप्रसंगी सहभागी सायकलपटूंना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

या उपक्रमाचे यशस्वी नियोजन कल्याण शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक आशिष चिलांगे यांनी केले. या सामाजिक उपक्रमामुळे वर्धा शहरात आरोग्य आणि पर्यावरणाबाबत सकारात्मक जनजागृती झाली असून, भविष्यातही अशाच आरोग्यवर्धक उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार असल्याचे पोलिस विभागाने स्पष्ट केले.

---

### रामनगर ठाण्यात ड्युटी रॅकेटचा स्फोट

## लक्ष्मी दर्शननंतर आता ड्युटी वाटपावर पैशांचा खेळ

### जो पैसे देईल त्यालाच सोयीची ड्युटी:कर्मचाऱ्यांत संताप; एसपी सौरभ कुमार अग्रवाल कारवाई करणार का?

**वर्धा रवींद्र लाखे :** रामनगर पोलीस ठाण्याभोवती सुरू असलेल्या वादांना आता आणखी एक गंभीर वळण मिळाले असून, ठाण्यात कर्मचाऱ्यांच्या ड्युटी वाटपात कथित आर्थिक व्यवहार होत असल्याच्या आरोपांनी पोलीस विभागात मोठी खळबळ उडाली आहे. काही दिवसांपूर्वी समोर आलेल्या लक्ष्मी दर्शन प्रकरणाची चर्चा अद्याप थंडावलेली नसतानाच आता ड्युटी लावण्यासाठी पैशांची देवाणघेवाण होत असल्याचे आरोप पुढे आल्याने संपूर्ण विभागाचेच धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, रामनगर पोलीस ठाण्यावर मनुष्यबळाची मोठी कमतरता आहे. बोटावर मोजण्याइतके कर्मचारी संपूर्ण ठाण्याचा कारभार सांभाळत असताना ड्युटी व्यवस्थापन अत्यंत संवेदनशील विषय बनला आहे. अशातच जो पैसे देईल त्यालाच मनासारखी ड्युटी मिळते अशी दबक्या आवाजातील चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे.




विशेष म्हणजे, ठाण्यातील मोरर कर्मचारी युसुफ खान यांच्यावर गंभीर आरोप होत आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, कर्मचाऱ्यांच्या ड्युटी लावण्याचे अधिकृत काम नसतानाही ते गेल्या तीन वर्षांपासून ड्युटी वाटपात हस्तक्षेप करत असल्याचे सांगितले जात आहे. एवढेच नव्हे तर या संदर्भात यापूर्वी तत्कालीन पोलीस अधीक्षकांकडे गोपनीय तक्रारीदेखील करण्यात आल्या होत्या. मात्र, इतक्या गंभीर आरोपांनंतरही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर अधिक तीव्र झाला आहे.

रामनगर ठाण्यातील काही कर्मचाऱ्यांमध्ये अशीही चर्चा आहे की, युसुफ खान यांचे मुख्य कार्य ड्युटी व्यवस्थापन नसून ते कथित लक्ष्मी दर्शन साठीच सक्रिय असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे ठाण्यातील प्रशासन नेमके कोणाच्या नियंत्रणाखाली चालते, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना मात्र या प्रकारामुळे मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगितले जात आहे. काम करा आणि पैसेही द्या अशी परिस्थिती निर्माण झाल्याची भावना काही कर्मचाऱ्यांनी व्यक्त केल्याची चर्चा आहे. परिणामी ठाण्यातील अंतर्गत वातावरण ढवळून निघाले असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल हे या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेऊन चौकशीचे आदेश देतील का, गोपनीय तक्रारींची फाईल पुन्हा उघडली जाणार का आणि रामनगर ठाण्यातील कथित ड्युटी बाजारवर कारवाई होणार का, याकडे आता पोलीस कर्मचाऱ्यांसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

## रमणा फाट्यावर भरधाव कारचा थरारक अपघात

### डिव्हायडरला जोरदार धडकून कार पलटी ; तिघे गंभीर जखमी

**सेलू जनमाध्यम :** नागपूरहून वर्धेकडे भरधाव वेगाने धावणारी कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने थेट डिव्हायडरवर आदळून पलटी झाल्याची भीषण घटना रविवारी (दि. १४) सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास सेलू तालुक्यातील रमणा फाट्याजवळ घडली. या अपघातात कारमधील तिघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सेवाग्राम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातातील जखमींमध्ये वेदांत फासगे (वय २१), आशिष शिंदे (वय ४०) आणि तेजस फासगे (वय २८, सर्व रा. वर्धा) यांचा समावेश आहे. एमएच-३२-सी-२८२७ क्रमांकाची कार नागपूरहून वर्धेकडे येत असताना रमणा फाट्याजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. भरधाव वेगात असलेल्या कारने डिव्हायडरला जोरदार धडक दिल्यानंतर अनेक पलट्या घेत रस्त्याच्या कडेला जाऊन थांबली.



अपघात इतका भीषण होता की कारचा पुढील भाग पूर्णपणे चोंदामोंदा झाला. धडकेचा आवाज ऐकताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. माहिती मिळताच रुग्णमित्र प्रज्वल लटारे यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून जखमींना आपल्या रुग्णवाहिकेतून सेवाग्राम रुग्णालयात दाखल केले.

या दुर्घटनेमुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. भरधाव वेग, निष्काळजी वाहनचालक आणि महामार्गावरील बेफिकीर ड्रायव्हिंगमुळे अपघातांची मालिका सुरूच असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

---

### विहिरीत मृत्यूचा लोखंडी टब

## क्रेनचा टब कोसळून मजुराचा जागीच अंत

### -खोदकामादरम्यान भीषण दुर्घटना

**वर्धा जनमाध्यम :** विहिरीच्या खोदकामावेळी क्रेनचा लोखंडी टब अचानक कोसळल्याने एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना पुलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चोंडी परिसरात शनिवारी घडली. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

रामेश्वर प्रभाकर पांचभाई (वय ४९, रा. आकोली ता. देवळी) असे मृत मजुराचे नाव आहे. तो गेल्या काही दिवसांपासून गावातील गजानन बकाले यांच्या क्रेन मशीनवर मजूर म्हणून काम करत होते. चोंडी परिसरातील राजेंद्र झाडे यांच्या शेतात विहिरीचे खोदकाम सुरू होते. शनिवारी सकाळी रामेश्वर पांचभाई, दादाराव सोनुले आणि खटेश्वर वाघाडे हे विहिरीत उतरून माती व दगडांचा मलबा लोखंडी टबमध्ये भरत होते. क्रेनच्या सहाय्याने भरलेला टब वर खेचला जात असतानाच अचानक तोल जाऊन लोखंडी टब थेट विहिरीत कोसळला. या भीषण धडकेत रामेश्वर पांचभाई गंभीर जखमी झाले. घटनेनंतर उपस्थित मजुरांनी आरडाओरड करत रामेश्वर यांना तातडीने विहिरीबाहेर काढले. मात्र, तोपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवली होती. या दुर्घटनेमुळे कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेच्या वेळी कैलास नेहारे व रोशन सोनवणे हेही घटनास्थळी उपस्थित होते. पुलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.

---

### आर्वीत औद्योगिक क्रांतीची चाहूल

## एमआयडीसीसाठी ७२ शेतकऱ्यांच्या खात्यात ७ कोटी ७४ लाखांचा मोबदला

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी विधानसभा क्षेत्रात औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या एमआयडीसी प्रकल्पासाठी संपादित जमिनींचा तब्बल ७ कोटी ७४ लाखांहून अधिक मोबदला ७२ शेतकऱ्यांना वितरित करण्यात आला. सुमित वानखेडे यांच्या हस्ते तहसील कार्यालयातील सभागृहात मोबदल्याच्या आदेशांचे वाटप करण्यात आले.

१४३.६१ हेक्टर जमिनीसाठी एकूण ७,७४,३८,६६५ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यात पहिल्या टप्प्यात ४ कोटी ९९ लाख तर दुसऱ्या टप्प्यात २ कोटी ७५ लाख रुपयांचा समावेश आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट व तहसीलदार हरीश काळे उपस्थित होते.



एमआयडीसी उभारणीसाठी आमदार वानखेडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला. शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी त्यांनी प्रत्यक्ष सर्वेक्षणातही सहभाग घेतला होता.या एमआयडीसीमुळे आर्वी परिसरात मोठे उद्योग उभे राहून हजारो युवकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याने हा प्रकल्प परिसराच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

---

## मध्यप्रदेशातून दुचाकीवर गुटख्याची तस्करी

### -एलसीबीच्या कारवाईत दोघे जाळ्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रतिबंधित गुटख्याची तस्करी रोखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) राबविलेल्या विशेष मोहिमेत मोठे यश मिळाले आहे. मध्यप्रदेशातून दुचाकीवरून अमरावती जिल्ह्यात गुटखा आणणाऱ्या दोन तस्करांना अवघ्या एका तासाच्या अंतराने अटक करण्यात आली. बुरडघाट येथील आरटीओ तपासणी नाक्याजवळ झालेल्या या सलग दोन कारवायांत गुटखा, दुचाकी आणि अन्य साहित्य असा एकूण २ लाख २६ हजार ४८४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**२.२६ लाखांचा मुद्देमाल जप्त**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार यांच्या पथकाला मध्यप्रदेशातील खामला परिसरातून मोठ्या प्रमाणात गुटखा आणला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकाने १३ जून रोजी पहाटे बुरडघाट येथील आरटीओ चेक पॉइंट परिसरात सापळा रचला. पहाटे संशयास्पदरीत्या येणाऱ्या एका दुचाकीला अडवून तपासणी करण्यात आली. झडतीदरम्यान दुचाकीस्वार शेख जमील शेख मुनीर (वय ३८, रा. परतवाडा) याच्याकडे प्रतिबंधित गुटखा आढळून आला.

---

## स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या सामाजिक उपक्रमांचा महाराष्ट्रातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ, राज्याच्या विकासात बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण : मुख्यमंत्री

**मुंबई जनमाध्यम :** स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाशी सामना करण्यासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान मिळाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शासन आणि खासगी क्षेत्राच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. जलसंवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा क्षेत्रात बँकेचे कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे. बँकेच्या उपक्रमांतील लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून, राज्यातील ३० जिल्हे आणि ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम राबविण्यात आले आहेत.

**जलसुरक्षेसाठी व्यापक उपाययोजना जलसुरक्षा**

उपक्रमांतर्गत १.०६ अब्ज लीटर पाणीसाठा क्षमता निर्माण करण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागांत ४५ वॉटर एटीएम सुरू करण्यात आले आहेत. मराठवाडा आणि विदर्भासह २७१ गावांमध्ये जलसुरक्षा मजबूत करण्यात आली. तसेच ८ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना हवामान सुसंगत शेती आणि जलसंवर्धनासाठी मदत करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासाठी ७ लाख वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

**रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना**

६ हजार ५९८ युवकांना कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ६३ टक्के युवकांना रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक वाहने, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, बँकिंग आणि उद्योजकता क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यात आल्या. या कार्यक्रमातील ६१ टक्के लाभार्थी महिला असून, ७५८ महिला सूक्ष्म उद्योजिकांनाही सहाय्य देण्यात आले आहे.

**आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी**

सीईंग इज बिलिव्हिंग उपक्रमांतर्गत ४ लाख ३९ हजारांहून अधिक नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ३८ हजारांहून अधिक नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आल्या. राज्यभरात ४९ दृष्टी केंद्रे सुरू करण्यात आली असून, ती स्वयंपूर्ण पद्धतीने कार्यरत आहेत.

स्टँडर्ड चार्टर्ड बँक, भारतच्या शाश्वतता विभागाच्या प्रमुख करुणा भाटिया यांनी सांगितले की, वंचित समुदायांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी बँक कटिबद्ध आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी हे उपक्रम शाश्वत विकास आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणारे असल्याचे नमूद केले.

---

### पेट्रोल संपलं... अन् काळाने गाठलं

## बायपासवर दुचाकी ढकलत नेत असताना भरधाव ट्रकची धडक; युवकाचा दुर्दैवी मृत्यू

**वर्धा जनमाध्यम :** दुचाकीतील पेट्रोल संपल्याने रात्रीच्या अंधारात बायपासवर गाडी ढकलत जाणाऱ्या युवकाला भरधाव अज्ञात वाहनाने चिरडल्याची हृदयद्रावक घटना नागपूर-यवतमाळ महामार्गावर घडली. या भीषण अपघातात २९ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

अभिजीत उर्फ छोटू सुरेंद्र उपाध्याय (वय २९, रा. स्टेशनफैल) असे मृत युवकाचे नाव आहे. अभिजीत हा आपल्या मित्रासोबत एम.एच. ३२ ए.जी. ७२९८ क्रमांकाच्या दुचाकीवरून बाहेर गेला होता. रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास परत येत असताना दुचाकीतील पेट्रोल अचानक संपले. त्यामुळे तो नागपूर-यवतमाळ बायपास मार्गावरून दुचाकी ढकलत नियोजित ठिकाणी जात होता. साटोडा परिसरातील हॉटेल हायवे व्ह्यूजवळ मागून भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात ट्रकने अभिजीतला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की अभिजीत गंभीर जखमी झाला. त्याचा मित्र दुसऱ्या बाजूने चालत असल्याने तो थोडक्यात बचावला. अपघातानंतर जखमी अवस्थेतील अभिजीतला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. एका क्षणात हसतखेळत जीवन संपल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या प्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरोधात गुन्हा नोंदवून फरार ट्रकचा शोध सुरू केला आहे.

---

## सेलूकरांना विकासाच्या खड्ड्यात गाडलं

### पाणीपुरवठा योजनेच्या नावाखाली शहराची उकरून काढली चाळण; कंत्राटदाराच्या मनमानीने जनतेचा संताप अनावर

**सेलू जनमाध्यम :** विकास करतोय की शहर उद्ध्वस्त करतोय असा प्रश्न आता सेलूकर प्रशासनाला विचारू लागले आहेत. बोरधरण पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी शहरातील मुख्य रस्ते अक्षरशः खोदून ठेवल्याने संपूर्ण शहर धुळीच्या ढगात, चिखलात आणि वाहतूक कोंडीत अडकले आहे. कंत्राटदाराच्या बेजबाबदार कारभारामुळे नागरिकांच्या जिवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप होत आहे.

नियम धाब्यावर बसवत कंत्राटदाराने एकाच वेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी खोदकाम सुरू केले. एवढेच नव्हे तर, खोदकामातून निघालेली माती थेट रस्त्याच्या मध्यभागी टाकून मुख्य मार्गच बंद केला. वाहनांना रस्ता नाही, पादचाऱ्यांना पाऊलवाट नाही, अशी भयावह स्थिती शहरात निर्माण झाली आहे.



मेडिकल चौक ते श्री क्षेत्र घोराड हा शहरातील सर्वाधिक वर्दळीचा मार्ग सध्या मृत्यूच्या सापळ्यात बदलला आहे. अधिक मासानिमित्त दर्शनासाठी येणारे भाविक, शाळकरी विद्यार्थी, नोकरदार आणि नागरिक रोज जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. दुचाकीस्वार चिखलात घसरून पडत असून अपघातांचा धोका वाढला आहे.

एक वर्षापासून विकासाच्या गप्पा मारणारे नगर पंचायत प्रशासन नेमके झोपले आहे का असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. खोदकामाच्या ठिकाणी बॅरिकेड्स नाहीत, सुरक्षेची कोणतीही उपाययोजना नाही आणि धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

काम करा पण शहराचा गळा घोटून नाही, असा इशारा आता नागरिकांनी प्रशासनाला दिला आहे. तातडीने रस्ते दुरुस्त करून वाहतूक सुरळीत न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संतप्त सेलूकरांनी दिला आहे.

---

## सरकारी नोकरी च्या रणांगणात ७२१ उमेदवार गायब

### गट 'ब' पूर्व परीक्षेला मोठी दांडी ; १२ केंद्रांवर २४०८ जणांनी दिली परीक्षा

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र गट 'ब' (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षेत यंदा तब्बल ७२१ उमेदवारांनी गैरहजेरी लावत प्रशासनालाच धक्का दिला. जिल्ह्यातील १२ परीक्षा केंद्रांवर रविवारी पार पडलेल्या या परीक्षेसाठी ३ हजार १२९ उमेदवार नोंदणीकृत होते. मात्र, प्रत्यक्षात २ हजार ४०८ परीक्षार्थीच हजर राहिल्याने सरकारी नोकरीच्या स्पर्धेत अनेकांनी आधीच माघार घेतली काय अशी चर्चा रंगली.

वर्धा शहरातील विविध महाविद्यालये व शाळांमध्ये परीक्षा केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. जानकी देवी बजाज विज्ञान महाविद्यालय, गो. से. वाणिज्य महाविद्यालय, सुशिल हिंमतसिंगका विद्यालय, न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय, रत्नीबाई विद्यालय, केसरीमल कन्या विद्यालय, यशवंत महाविद्यालय, न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, भरत ज्ञान मंदिरम् कॉनव्हेंट ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय तसेच पिपरी मेघे येथील अग्रग्रामी हायस्कूल व श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा विद्यालय येथे परीक्षा घेण्यात आली.

परीक्षा सुरळीत आणि पारदर्शक पार पाडण्यासाठी उपकेंद्र प्रमुख पर्यवेक्षक समादेशक लिपीक आणि शिपाई अशा तब्बल २७६ कर्मचाऱ्यांची फौज तैनात करण्यात आली होती. कडक बंदोबस्त आणि शिस्तबद्ध वातावरणात परीक्षा शांततेत पार पडली.

**कोणत्या केंद्रावर किती उमेदवार गैरहजर**

| | |
|---|---|
| न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय - | ८७ |
| अग्रग्रामी हायस्कूल - | ८३ |
| रत्नीबाई विद्यालय - | ७२ |
| यशवंत महाविद्यालय - | ७२ |
| जे. बी. विज्ञान महाविद्यालय - | ६९ |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय - | ६६ |
| न्यू आर्टस्-कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज - | ६३ |
| श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा विद्यालय - | ५५ |
| केसरीमल कन्या विद्यालय - | ५४ |
| सुशिल हिंमतसिंगका विद्यालय - | ३९ |
| भरत ज्ञान मंदिरम् कॉनव्हेंट ॲण्ड ज्युनिअर कॉलेज - | ३६ |
| गो. से. वाणिज्य महाविद्यालय - | २५ |

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## राजकीय द्विधा

आपल्याच प्रदेशाध्यक्षांच्या तक्रारी घेऊन दिल्लीत मोर्चेबांधणी करायला गेलेले काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले येताना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या काँग्रेसमधील विलीनीकरणाची बातमी घेऊन आले. पटोले यांनी फोडलेल्या या बातमीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगेच प्रतिक्रिया दिल्याने बातमीचे महत्त्व साहजिकच वाढले. काल दिवसभर माध्यमात त्याचीच चर्चा होती. अनेक माध्यमांनी या बातमीचे श्रेय उबाठाच्या अ. भा. प्रवक्त्यांना दिले असले, तरी ते खरे नाही. कारण, त्यांनी फक्त इच्छा व्यक्त केली होती. त्यांच्या अशा अनेक अतृप्त इच्छा महाराष्ट्राला अधूनमधून ऐकाव्या लागतातच. ते देशाला; कधी तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह अखिल विश्वाला आपले जे मौलिक सल्ले देत असतात, त्याने सगळ्यांची करमणूक होते, वृत्तवाहिन्यांचा दिवस निघतो; पण त्या पलीकडे त्याला काही किंमत मिळत नाही. यावेळीही दिल्लीत सोमवारी झालेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर 'काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतरही त्या विचारांशीच बांधिलकी ठेवलेल्या सर्व प्रादेशिक पक्षांनी पुन्हा काँग्रेसमध्ये सामील व्हावे आणि काँग्रेसची ताकद वाढवावी' असा उपदेश त्यांनी केला. हा उपदेश देशातल्या बऱ्याच पक्षांना होता. पण, महाराष्ट्रात ज्यांना याचे निमित्त हवे होते, त्यांनी हा उपदेश राष्ट्रवादी शरद पवार पक्षालाच आहे, असा अर्थ काढून त्यावर चर्चा सुरू केली. पहिल्या दिवशी खासदार सुप्रिया सुळे यांनी तातडीने दिलेली प्रतिक्रिया 'काळ ठरवेल, तसे होईल' अशी सावध आणि मोघम होती. पण, चर्चेचा चेंडू कोणाकडून कुणाकडे जातो आहे आणि तो कोण खेळवतं आहे, याचा अंदाज येताच दुसऱ्या दिवशी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी त्याचा स्पष्ट शब्दात इन्कार केला. पहिल्या दिवशीच्या बातम्यांमध्येही मोठी गंमत होती. विलीनीकरणाचा प्रस्ताव कोणी कोणाला दिला? यातही प्रत्येकाची स्वतंत्र 'पतंगबाजी' सुरू होती. कोणाचं म्हणणं असा प्रस्ताव काँग्रेसने राष्ट्रवादीला दिला, तर कोणाचं म्हणणं राष्ट्रवादीनेच काँग्रेसला दिला! थोडक्यात, जिथून बातमी सुटली, त्यांच्याकडून महत्त्वाचे तपशील विशेषकरून अधोरेखित करायचे राहून गेल्याने ज्याने त्याने आपापल्या तर्कबुद्धीने बातमी 'चालवली'. बातमीतला एकूण जीव पाहता, ती फार चालेल, असे वाटत नाही. बातमी आली कधी? नेमक्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिनाच्या मुहूर्ताला. अ. भा. प्रवक्त्यांचा हेतू वर्धापन दिनाच्या कार्यक्रमातील भाषणात या मुद्द्याला महत्त्वाचे स्थान मिळावे आणि त्याचे श्रेय आपल्याला मिळावे, एवढाच नेहमीप्रमाणे असणार. पण, प्रत्यक्षात त्या मेळाव्यात तसं काहीच घडले नाही. राष्ट्रवादी शरद पवार गट थकला आहे, हे सध्या सुरू असलेल्या विधान परिषद निवडणुकीत दिसतेच आहे. यापूर्वी झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही पक्षाचा किती शक्तिपात झाला आहे, हे दिसले होतेच. त्यामुळे, विधानसभा निवडणुका जवळ येताच या पक्षाचे आमदार (आणि कदाचित त्याआधी खासदार) आपापल्या वाटा शोधणार, हे उघड आहे. स्वतःच्या मतदारसंघातील राजकीय परिस्थिती आणि आपल्या गरजेनुसार भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गट कोणासाठी किती ताकद लावतो, यावर ही सगळी विभागणी अवलंबून असेल. तोपर्यंत आहे त्या स्थितीत वाट पाहात राहिलो, तर आपले सौदामूल्य पूर्ण संपेल, याची कल्पना पक्षनेतृत्वाला आहे. त्यामुळे, खासदार सुळे यांच्या केंद्रातील मंत्रीपदासह राज्यात काही मंत्रीपदे पदरात पाडून घेऊन भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीची वाट धरायची, की वैचारिक निष्ठेचा खांब पकडून ठेवून आपले नैतिक मूल्य वाढवायचे, आणि 'इंडिया आघाडी'त दामटून राहायचे, या द्विधेत पक्षनेतृत्व आहे. देशातील वातावरणाचा अंदाज ते त्यासाठी घेत असावेत. नेमक्या अशावेळी त्यांची आणि काँग्रेसची विलीनीकरणाची बोलणी सुरू आहेत, अशी बातमी ज्यांनी पसरवली, त्यांनी आपल्या पक्षाचे हित पाहिले, की शरद पवार गटातल्या खासदार आमदारांना हलवून जागे केले, हा प्रश्न आता काँग्रेसमध्येच काही जण विचारत आहेत. पटोले दिल्लीहून स्वतःसाठी नेमका काय निर्णय घेऊन परतले, ते लवकरच आणखी स्पष्ट होईल. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या रोज चिंधड्या उडताहेत. परिवारवादाच्या मुद्द्यावरून खासदार, आमदार पक्षत्याग करून भारतीय जनता पक्षाची वाट धरताहेत. त्यामुळे, ममता बॅनर्जी यांना या क्षणी 'इंडिया आघाडी'चा आधार हवा आहे. त्यासाठी त्या खासदार सोनिया गांधी यांची गळाभेट घ्यायलाही तयार झाल्याचं सगळ्या देशाने पाहिले. काँग्रेसची ज्या वेगाने घसरण सुरू आहे, ती सावरायला पक्षाला राजकीय मुत्सद्देगिरीची गरज आहे. गांधी घराण्याने अन्य नेत्यांना, राज्या-राज्यातल्या मित्र पक्षांना बरोबरीने वागवण्याची, थोडी मोकळीक देण्याची गरज आहे. त्याची खात्री जोपर्यंत मिळत नाही, तोपर्यंत कोण कशाला परत जाईल किंवा 'इंडिया आघाडी' मजबूत करण्यासाठी कष्ट घेईल ? काँग्रेसमधल्या दिग्विजय सिंह यांना किंवा अ. भा. प्रवक्त्यांना असे कितीही वाटत असले, तरी सहा दशके पूर्णवेळ राजकारणात घालवलेल्या शरद पवार यांना आपला पक्ष 'बुडत्या जहाजा'वर नेऊन ठेवावा, असं कसं वाटेल? आताची त्यांची कृती ही त्यांच्या राजकारणातल्या अखेरच्या टप्प्यातला फार महत्त्वाचा निर्णय असणार आहे. तो त्यांना घ्यायचाच आहे, पण काही प्रश्नांची उत्तर मिळाल्यानंतर. ती उत्तरं मिळण्यावर त्यांचा निर्णय अवलंबून असेल. त्याला अजून वेळ आहे.

# संकटमोचक व्हेनेझुएला

**मे २०२६ मध्ये भारताने व्हेनेझुएलाकडून सुमारे ४.१७ ते ४.२७ लाख बॅरेल प्रतिदिन इतके तेल आयात केले. सौदी अरेबिया आणि अमेरिकेकडून होणाऱ्या आयातीपेक्षाही ही तेल आयात जास्त ठरली. अलीकडेच व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्ष डेल्सी रोड्रिग्ज यांनी भारताला दिलेली भेट ही ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली आहे.**



तेलसंपन्न आखाती देशांच्या परिघाबाहेर असणारा व्हेनेझुएला हा देश अलीकडील काळात भारतासाठी संकटमोचक ठरला आहे. भारताला ऊर्जा पुरवठ्याच्या स्रोतांमध्ये वैविध्य आणावयाचे आहे, तर व्हेनेझुएलाला स्थिर आणि मोठी बाजारपेठ हवी आहे. त्यामुळे दोन्ही देशांचे हितसंबंध परस्परपूरक ठरतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात काही संबंध सतत चर्चेत राहतात, तर काही संबंध प्रकाशझोतात नसतानाही दीर्घकालीन परिणाम घडवून आणत असतात. भारत आणि व्हेनेझुएला यांच्यातील संबंध हे दुसऱ्या प्रकारातील मानावे लागतील. दोन्ही देशांमधील संबंधांनी कधी मोठ्या मथळ्यांमध्ये स्थान मिळवले नाही; परंतु गेल्या काही वर्षांतील घडामोडी पाहिल्यास ही भागीदारी सातत्याने अधिक मजबूत होत असल्याचे स्पष्ट दिसते. विशेषतः ऊर्जा सुरक्षेच्या बदलत्या समीकरणांमध्ये आणि बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेच्या उदयाच्या पार्श्वभूमीवर या संबंधांचे महत्त्व अधिक वाढले आहे.

अलीकडे व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्ष डेल्सी रोड्रिग्ज यांनी भारताला दिलेली भेट याच दृष्टीने महत्त्वाची ठरते. ही त्यांची भारतातील सहावी भेट होती. एखाद्या देशाचा सर्वोच्च नेता पुन्हा पुन्हा एखाद्या देशाला भेट देतो, यामागे दीर्घकालीन हितसंबंध निर्माण करण्याचे आणि परस्पर सहकार्याचे बंध घट्ट करण्याचे उद्दिष्ट असते. डेल्सी रोड्रिग्ज यांच्या भेटीत व्हेनेझुएलाचे परराष्ट्र, अर्थ, विज्ञान-तंत्रज्ञान, दळणवळण आणि वाहतूक मंत्रालयांचे मंत्रीही उपस्थित होते. त्यामुळे हा केवळ सदिच्छा दौरा नव्हता, तर विविध क्षेत्रांतील सहकार्याच्या शक्यता तपासण्याचा गंभीर प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

भारत आणि व्हेनेझुएला यांच्यातील संबंधांचा सर्वात महत्त्वाचा आधार म्हणजे ऊर्जा क्षेत्र. भारत जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा आयातदारांपैकी एक आहे. देशाच्या एकूण कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ९० टक्के गरज आयातीद्वारे भागवली जाते. अनेक दशकांपासून भारताची तेल आयात मुख्यतः पश्चिम आशियातील देशांवर अवलंबून राहिली आहे; मात्र अलीकडील संघर्ष, सामुद्रधुनींवरील तणाव आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांनी या अवलंबित्वातील जोखीम अधोरेखित केली. या पार्श्वभूमीवर व्हेनेझुएलाचे महत्त्व पुन्हा वाढले. जगातील सर्वांत मोठ्या तेलसाठ्यांपैकी काही साठे व्हेनेझुएलाकडे आहेत. अमेरिकेच्या निर्बंधांमुळे अनेक वर्षे हा देश जागतिक ऊर्जा बाजाराच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिला. भारतानेही काही काळ सावध भूमिका घेतली होती; परंतु बदलत्या परिस्थितीत भारताने पुन्हा व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी वाढवली. मे २०२६ मध्ये व्हेनेझुएला हा भारताचा तिसरा सर्वांत मोठा कच्चे तेल पुरवठादार ठरला. आजपासून सुमारे ५८ वर्षांपूर्वी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी व्हेनेझुएलाची राजधानी काराकस या ऐतिहासिक शहराला भेट दिली होती. त्या काळात कदाचित कोणी विचारही केला नसेल की, हा देश भविष्यात भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी इतका महत्त्वाचा आणि धोरणात्मक भागीदार बनेल.

भारताला ऊर्जापुरवठ्याच्या स्रोतांमध्ये वैविध्य आणावयाचे आहे, तर व्हेनेझुएलाला स्थिर आणि मोठी बाजारपेठ हवी आहे. त्यामुळे दोन्ही देशांचे हितसंबंध परस्परपूरक ठरतात. जागतिक राजकारणात अनेकदा विचारसरणीपेक्षा राष्ट्रीय हितसंबंध अधिक महत्त्वाचे ठरतात, याचे हे उत्तम उदाहरण आहे. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील ओएनजीसी विदेश या कंपनीने २००८ पासून व्हेनेझुएलामध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. आतापर्यंत सुमारे ८०० दशलक्ष डॉलर्सच्या आसपासची गुंतवणूक विविध तेल क्षेत्रांमध्ये करण्यात आली आहे. तथापि, राजकीय अस्थिरता, आर्थिक संकटे आणि आंतरराष्ट्रीय निर्बंधांमुळे या गुंतवणुकीतून अपेक्षित लाभ मिळालेले नाहीत. उलट सुमारे ६०० दशलक्ष डॉलर्सचे लाभांश अद्यापही प्रलंबित असल्याचे सांगितले जाते. तरीदेखील भारताने या संबंधांमधून माघार घेतलेली नाही. यामागे दूरगामी विचार आहे. ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक ही अनेकदा दशकांच्या कालावधीत फळ देणारी असते. व्हेनेझुएलातील प्रचंड तेलसाठे लक्षात घेता भविष्यातील संधी भारतासाठी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे अल्पकालीन अडचणी असूनही भारताने आपली उपस्थिती कायम ठेवली आहे.

या संबंधांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, अमेरिकेची भूमिका. व्हेनेझुएलावर अमेरिकेने दीर्घकाळ निर्बंध लादले होते. अलीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाकडून तेल किंवा वायू खरेदी करणाऱ्या देशांवर अतिरिक्त शुल्क लावण्याची धमकीही दिली होती. अशा स्थितीतही भारत आणि व्हेनेझुएला यांच्यातील उच्चस्तरीय संवाद सुरू राहणे हे महत्त्वाचे आहे. भारत आपले राष्ट्रीय हित लक्षात घेऊन स्वतंत्र निर्णय घेण्यास सक्षम असल्याचा संदेश यातून दिला गेला आहे. मध्यंतरी अमेरिकेने या देशावरील निर्बंध शिथिल झाल्यानंतर भारताने तेलाची आयात वाढवली. कारण, यामुळे भारताला मध्यपूर्वेवरील अवलंबित्व कमी करण्याची अतिरिक्त संधी मिळाली. व्हेनेझुएला भारताचा तिसरा सर्वात मोठा कच्चे तेल पुरवठादार बनला. मे २०२६ मध्ये भारताने व्हेनेझुएलाकडून सुमारे ४.१७ ते ४.२७ लाख बॅरेल प्रतिदिन इतके तेल आयात केले. सौदी अरेबिया आणि अमेरिकेकडून होणाऱ्या आयातीपेक्षाही ही तेल आयात जास्त ठरली.

✍ **व्ही. के. कौर**

भारतीय परराष्ट्र धोरणातील हा एक व्यापक बदल मानला जातो. शीतयुद्धोत्तर काळात भारताने बहुध्रुवीय जगाच्या संकल्पनेला सातत्याने पाठिंबा दिला आहे. कोणत्याही एका महासत्तेवर अवलंबून न राहता विविध देशांशी संतुलित संबंध राखण्याचा प्रयत्न भारत करीत आहे. व्हेनेझुएलासोबतचे संबंध याच दृष्टिकोनाचा भाग म्हणून पाहिले जाऊ शकतात. तथापि, भारत-व्हेनेझुएला संबंध केवळ तेलाभोवती फिरत नाहीत. अलीकडील चर्चांमध्ये औषधनिर्मिती, आयुष, डिजिटल तंत्रज्ञान, वाहतूक, वाहन उद्योग आणि सांस्कृतिक सहकार्य अशा अनेक विषयांचा समावेश होता. व्हेनेझुएला अनेक वर्षांपासून आरोग्यसेवा आणि औषधांच्या उपलब्धतेच्या समस्यांना सामोरे जात आहे. जगातील सर्वात मोठ्या जेनेरिक औषध उत्पादक देशांपैकी एक असलेल्या भारतासाठी येथे मोठी संधी उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे भारताने विकसित केलेली डिजिटल सार्वजनिक पायाभूत व्यवस्था आज अनेक विकसनशील देशांसाठी आकर्षणाचा विषय ठरत आहे. आधार, यूपीआय आणि डिजिटल सेवा वितरणाच्या भारतीय अनुभवाचा अभ्यास करण्याची उत्सुकता अनेक देशांनी दाखवली आहे. व्हेनेझुएलाही त्याला अपवाद नाही. त्यामुळे भविष्यात डिजिटल सहकार्याचे नवे मार्ग खुले होऊ शकतात.

या संबंधांचा आणखी एक व्यापक अर्थ आहे. भारत आणि व्हेनेझुएला हे दोन्ही देश स्वतःला ग्लोबल साऊथचा भाग मानतात. विकसनशील देशांच्या हितसंबंधांना आंतरराष्ट्रीय मंचांवर अधिक प्रभावीपणे मांडण्याची गरज दोघांनाही वाटते. त्यामुळे ऊर्जा आणि व्यापाराच्या पलीकडेही या संबंधांना राजनैतिक महत्त्व प्राप्त होते. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या इतिहासात काही भागीदाऱ्या अचानक निर्माण होत नाहीत. त्या हळूहळू, सातत्याने आणि परस्पर विश्वासाच्या आधारावर विकसित होतात. भारत आणि व्हेनेझुएला यांच्यातील संबंध आज अशाच टप्प्यावर पोहोचलेले दिसतात. एकीकडे ऊर्जा सुरक्षेची गरज, दुसरीकडे आर्थिक आणि तांत्रिक सहकार्याच्या संधी आणि त्यासोबत 'ग्लोबल साऊथ'मधील सहकार्याची सामायिक भूमिका यामुळे ही भागीदारी अधिक व्यापक होत आहे

भविष्यात या संबंधांचे स्वरूप किती विस्तारेल, हे अनेक घटकांवर अवलंबून असेल. जागतिक ऊर्जा बाजारातील बदल, अमेरिकेची धोरणे, व्हेनेझुएलातील अंतर्गत परिस्थिती आणि भारताच्या आर्थिक गरजा यांचा त्यावर परिणाम होईल; परंतु एक गोष्ट निश्चित आहे. जगाचे लक्ष नसतानाही भारत आणि व्हेनेझुएला यांच्यात शांतपणे उभी राहत असलेली ही भागीदारी आगामी काळात अधिक महत्त्वाची ठरू शकते. कधीकधी आंतरराष्ट्रीय राजकारणातील सर्वांत प्रभावी घडामोडी या गाजावाजा न करता घडत असतात. भारत-व्हेनेझुएला संबंध हे त्याचेच एक उदाहरण मानावे लागेल. रशिया, मध्यपूर्व आणि व्हेनेझुएला या तिन्ही दिशांनी पुरवठा ठेवून भारत भविष्यातील कोणत्याही जागतिक संकटासाठी स्वतःला तयार करत आहे.

व्हेनेझुएलाकडे जगातील सर्वात मोठे सिद्ध तेलसाठे आहेत. त्यामुळे भारतासाठी हा केवळ अल्पकालीन पुरवठादार नाही, तर पुढील अनेक दशकांसाठी ऊर्जा भागीदार ठरू शकतो. व्हेनेझुएलाचे तेल हे हेवी क्रूड असल्यामुळे ते ब्रेंटच्या तुलनेत सवलतीच्या दरात मिळते. व्हेनेझुएलाकडे तेलाचा महासागर असला, तरी ते तेल सहज वाहणारे नाही. आपल्याकडील जड तेल उपसण्यासाठी आणि ते विकण्यायोग्य बनवण्यासाठी व्हेनेझुएलाला आधी इतर देशांकडून नॅफ्थासारखे हलके हायड्रोकार्बन आयात करावे लागतात. हे हलके हायड्रोकार्बन जड तेलात मिसळल्याशिवाय ते पाईपलाईनमधून वाहू शकत नाही.

विशेष म्हणजे, भारत ही सध्या जगातील एक अग्रगण्य आणि सर्वात मोठी रिफायनिंग शक्ती असून आपल्याकडे दरवर्षी कोट्यवधी टन नॅफ्थाचे उत्पादन केले जाते. गुजरात, महाराष्ट्र आणि इतर राज्यांमध्ये असलेल्या देशातील अजस्त्र रिफायनरी स्थानिक गरजा पूर्ण करूनही मोठ्या प्रमाणावर नॅफ्थाची निर्यात करण्यासाठी सक्षम आहेत. यामुळे भारत हा व्हेनेझुएलासाठी तेल उद्योगातील सर्वात मोठ्या समस्येचे निवारण करू शकणारा एक अत्यंत महत्त्वाचा व्यावसायिक भागीदार ठरू शकतो.

# नेहरू आणि मोदी



## भिन्न विचारसरणी, भिन्न कालखंड

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतंत्र भारतातील जनतेतून निवडून येत सलग सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषवणारे नेते बनले आहेत. त्यांनी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा सलग कार्यकाळाचा विक्रम मोडीत काढला आहे. २६ मे २०१४ रोजी प्रथमच सत्तेवर आल्यानंतर, त्यांनी १० जून २०२६ रोजी सलग ४,३९९ दिवस सत्तेवर राहण्याचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण केला. एकूण कार्यकाळाचा विचार करता, पंडित नेहरू (१६ वर्षे, २८६ दिवस) आणि इंदिरा गांधी (१५ वर्षे, ३५० दिवस) यांच्यानंतर नरेंद्र मोदी हे भारताचे तिसरे सर्वाधिक काळ काम करणारे पंतप्रधान आहेत. याच आधारावर नेहरू आणि मोदी यांच्यात तुलना केली जात आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू आणि नरेंद्र मोदी या दोन पंतप्रधानांच्या कार्यकाळात भारताच्या इतिहासाचे दोन महत्त्वाचे टप्पे समाविष्ट आहेत नेहरूंचा काळ हा स्वातंत्र्योत्तर राष्ट्रबांधणी, संस्थांची निर्मिती आणि समाजवादी लोकशाहीवर आधारित होता, तर मोदींचा काळ हा तंत्रज्ञान, पायाभूत सुविधांचा विकास आणि जागतिक स्तरावर भारताच्या वाढत्या महत्त्वाशी जोडलेला आहे. नेहरू हे धर्मनिरपेक्षता, लोकशाही समाजवाद आणि अलिप्ततावादी परराष्ट्र धोरणाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी नियोजित अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांवर भर दिला. तर नरेंद्र मोदी यांची विचारसरणी सांस्कृतिक राष्ट्रवाद, आर्थिक उदारीकरण आणि कल्याणकारी योजनांच्या थेट वितरणावर आधारित आहे. त्यांचे प्रशासन 'कमीत कमी शासन, जास्तीत जास्त प्रशासन' या मंत्रावर चालते. नेहरूंनी आयआयटी , इस्रो , आणि विविध मोठ्या धरणांसारख्या वैज्ञानिक आणि औद्योगिक संस्थांचा पाया रचला मोदी काळात डिजिटल इंडिया, युनिफायेड पेमेंट्स इंटरफेस आणि आधार-सक्षम तंत्रज्ञानाद्वारे नागरिकांचे प्रशासनाशी जोडले जाणे अधिक सुलभ झाले आहे.

**कालखंड :** नेहरूंचा कालखंड (१९४७-१९६४) नुकत्याच स्वतंत्र झालेल्या आणि फाळणीच्या जखमा झेलणाऱ्या देशाला स्थैर्य देणे, हे नेहरूसमोर सर्वात मोठे आव्हान होते. मोदींचा कालखंड (२०१४-सध्या) २१ व्या शतकातील जागतिक आव्हाने, आर्थिक वाढ, पायाभूत सुविधांचा विस्तार (जसे की रस्ते, रेल्वे, विमानतळ) आणि लोकसंख्येच्या आकांक्षा पूर्ण करणे, यावर मोदींच्या कार्यकाळात भर दिला गेला आहे.

जागतिक प्रतिमा: नेहरूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर 'जागतिक नेते' म्हणून ओळखले जात असे, ज्यांनी आशिया आणि आफ्रिकेतील वसाहतवादविरोधी चळवळींचे नेतृत्व केले. तर मोदी यांनी भारताची जागतिक ताकद वाढवण्यावर भर दिला आहे, ज्यामध्ये जी-२० चे यशस्वी अध्यक्षपद आणि जागतिक मंचांवर भारताची आक्रमक भूमिका यांचा समावेश आहे. एकंदरीत पंडित जवाहरलाल नेहरू आणि मोदी यांचा कालखंड वेगवेगळा ,

✍ **प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**

बिजासनी वेगळी कार्य करण्याची पद्धत वेगळी यामुळे त्यांच्यात तुलना न करता त्याच्या कार्याची तुलना व्हावी. पंडित जवाहरलाल नेहरू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलना होऊ नये, ही अनेक ज्येष्ठ राजकीय नेत्यांची आणि विचारवंतांची ठाम भूमिका आहे. दोन्ही नेत्यांचे कार्यकाळ, देशासमोरील आव्हाने आणि त्यांची विचारसरणी पूर्णपणे भिन्न असल्यामुळे त्यांच्यात थेट तुलना करणे उचित मानले जात नाही. पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. त्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात स्वातंत्र्यलढ्यात दीर्घकाळ तुरुंगवास भोगला. त्यांच्या कार्यकाळात देशाला लोकशाही मार्गावर स्थिर करणे, संस्थांची उभारणी करणे आणि आधुनिक भारताचा पाया रचणे ही मुख्य आव्हाने होती.

**समकालीन राजकारण (मोदी):** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील कार्यकाळात भारताच्या आर्थिक आणि जागतिक स्थित्यंतरांवर अधिक भर दिला गेला आहे. डिजिटल क्रांती, पायाभूत सुविधांचा विकास आणि जागतिक स्तरावर भारताची वाढती ताकद हे त्यांच्या कार्यकाळाचे प्रमुख पैलू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे (एसपी) अध्यक्ष शरद पवार यांनी स्पष्ट केले आहे की, नेहरू हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यागाचे प्रतीक आहेत. मोदींनी सलग सर्वात जास्त काळ पंतप्रधानपद भूषवण्याचा विक्रम केला असला, तरी नेहरूंनी देशासाठी केलेल्या बलिदानाची आणि पायाभरणीची तुलना कुणाशीही होऊ शकत नाही, असे पवार यांनी ठळकपणे नमूद केले. देवेंद्र फडणवीस यांची भूमिका: भाजप नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मते, स्वतंत्र भारतात जे घडू शकले नाही ते आज नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली घडत आहे, मात्र तुलना करण्यापेक्षा देशाच्या प्रगतीकडे लक्ष दिले पाहिजे. काँग्रेस पक्षाच्या मते, दोन्ही नेत्यांची तुलना करणे तार्किकदृष्ट्या चुकीचे आहे. नेहरूंनी देशाला स्वावलंबी बनवले, तर आजच्या सरकारने बेरोजगारी व महागाई यांसारख्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे, असा दावा काँग्रेस नेते करतात. थोडक्यात सांगायचे तर, दोन्ही नेते वेगवेगळ्या कालखंडातील आहेत. एकाने शून्यातून लोकशाहीचा पाया रचला, तर दुसऱ्याने त्या पायावर देशाला जागतिक महासत्ता बनवण्याच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे त्यांची तुलना करणे योग्य नाही.

वर्धा
९५६१५९४३०६

# बंगाल निवडणूक: विरोधी पक्षांची वैचारिक लाचारी

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे निकाल आणि त्यानंतरचे चित्र भारतीय राजकारणाला एक नवा धडा शिकवणारे ठरले आहे. या निवडणुकीने केवळ सत्ताधाऱ्यांचे बुरूज ढासळले नाहीत, तर देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच एका वेगळ्या राजकीय वास्तवाचे दर्शन घडवले आहे. ते म्हणजे-ज़नतेच्या हिताशी तडजोड करणाऱ्या आणि धोरणशून्य राजकारण करणाऱ्या विरोधी पक्षांची उरली-सुरली विश्वासार्हताही आता वेशीवर टांगली गेली आहे.

आज तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांना ज्या तीव्र जनरोषाचा सामना करावा लागत आहे, त्याला जेवढी सत्ताधाऱ्यांची प्रशासकीय अनागोंदी कारणीभूत आहे, तितकीच काँग्रेससह समस्त विरोधी पक्षांची लाचारीही जबाबदार आहे.

या संपूर्ण राजकीय पतनाचा उगम काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या दुटप्पी भूमिकेत आहे. राष्ट्रीय पातळीवर 'तथाकथित' एकजूट दाखवण्यासाठी या पक्षांनी तृणमूल काँग्रेससोबत मंचावर शेजारी बसणे पसंत केले. मात्र, त्याच वेळी पश्चिम बंगालमधील सामान्य जनता तृणमूलच्या जुलमी राजवटीचा, भ्रष्टाचार आणि दहशतीचा सामना करत होती. दिल्लीत मैत्रीचे आणि गळाभेटीचे राजकारण करायचे आणि बंगालमध्ये मात्र विरोधाचे नाटक करायचे, या ढोंगी धोरणामुळे सर्वसामान्य बंगाली जनतेचा या पक्षांवरून पूर्ण विश्वास उडाला.



लोकशाहीत विरोधी पक्षाचे मुख्य कर्तव्य जनतेच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हे असते. दुर्दैवाने, काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी बंगालमधील जनतेला पूर्णपणे वाऱ्यावर सोडले. जेव्हा जेव्हा स्थानिक पातळीवर कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला, महिला सुरक्षेचे प्रश्न निर्माण झाले, तेव्हा या प्रस्थापित विरोधी

✍ **अविनाश देशपांडे**

पक्षांनी तृणमूल विरोधात तीव्र संघर्ष उभारण्याऐवजी मऊ आणि बचावात्मक भूमिका घेतली. आपली हक्काची लढाई लढणारा आणि आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा एकही प्रस्थापित पक्ष मैदानात नाही, ही जाणीव जेव्हा जनतेला झाली, तेव्हा त्यांच्या मनात विरोधी पक्षांविषयी तीव्र संताप निर्माण झाला. राजकारणात कधीही पोकळी राहत नाही.

निवडणूक आयोगाच्या 'एसआयआर' मोहिमेमुळे मतदार यादीतील लाखो बोगस आणि दुबार नावे वगळली गेली. सत्ताधाऱ्यांची वर्षानुवर्षे चालत आलेली ही 'कृत्रिम यंत्रणा' कोलमडताच, जनतेने ९२.९३टक्के इतके ऐतिहासिक मतदान करून आपला रोष व्यक्त केला.

मतपेटीतून बाहेर पडलेला हा जनमानसाचा उद्रेक इतका मोठा होता की, ममता बॅनर्जी यांना त्यांच्या स्वतःच्या भवानीपूर मतदारसंघातून पराभवाचा धक्का सहन करावा लागला.

सुवेंदु अधिकारी यांनी मिळवलेला विजय हा केवळ एका जागेचा विजय नव्हता, तर तो अहंकारी सत्तेच्या बालेकिल्ल्याला पडलेले भगदाड होते.

पश्चिम बंगालचा हा निकाल म्हणजे देशातील सर्वच राजकीय पक्षांसाठी धोक्याची घंटा आहे.

जनतेच्या धुमसत असलेल्या असंतोषाला जेव्हा कोणताच पक्ष वाचा फोडत नाहीत, तेव्हा जनता स्वतःच रस्त्यावर उतरते. आज तृणमूलच्या नेत्यांना जनतेच्या ज्या असंतोषाला आणि रोषाला सामोरे जावे लागत आहे, त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते- लोकशाहीत जनतेला गृहीत धरणाऱ्या सत्ताधाऱ्यांची आणि जनतेचा आवाज न बनणाऱ्या विरोधी पक्षांची लक्तरे एक ना एक दिवस वेशीवर टांगली जातातच!

# अंजनगाव सुर्जी तालुक्याचा विकासाचा अनुशेष कायम

## लोकप्रतिनिधींनी लक्ष देणे गरजेचे; राजकीय नेत्यांच्या अनास्थेमुळे तालुका २० वर्षे मागे

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील एक महत्त्वाचा तालुका म्हणून ओळख असलेला अंजनगाव सुर्जी तालुका आज विकासाच्या बाबतीत प्रचंड माघारलेला दिसत आहे. रस्ते, पाणी, वाहतूक आणि क्रीडा सुविधा अशा मूलभूत गरजांसाठीही नागरिकांना संघर्ष करावा लागत असून, जिल्ह्याच्या इतर तालुक्यांच्या तुलनेत हा तालुका २० वर्षे मागे फेकला गेल्याची संतप्त भावना जनमानसात उमटत आहे.




तालुक्यातील जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या बहुतांश रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. अनेक मुख्य मार्गांवर मोठमोठे खड्डे पडले असून, वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. पावसाळ्यात तर या रस्त्यांची स्थिती अधिकच बिकट होते. 'रस्ते आहेत की खड्डे' असा प्रश्न विचारण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे.अंजनगाव सुर्जी हे तालुक्याचे मुख्य केंद्र असूनही येथील बसस्थानकाची अवस्था दयनीय आहे. लांब पल्ल्याच्या गाड्या सोडाच, पण स्थानिक पातळीवरही पुरेशा एसटी बस उपलब्ध नाहीत. परिणामी, विद्यार्थ्यांना आणि नोकरदारांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो, ज्यातून त्यांची आर्थिक लूट आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे.तालुक्याला लागूनच 'शहानूर' सारखा मोठा प्रकल्प असूनही शेतकऱ्यांच्या नशिबी कोरडवाहू शेतीच आली आहे. सिंचनाचे योग्य नियोजन नसल्याने धरणातील पाणी शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाहिजे तसे पोहोचत नाही. एकीकडे सरकार खेळांना प्रोत्साहन देण्याच्या गप्पा मारत असताना, अंजनगाव सुर्जी शहरात अद्याप अद्यायावत क्रीडा संकुल उभारण्यात आलेले नाही. तसेच,औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेले प्रयत्न न झाल्याने तालुक्यात नवीन उद्योजक तयार होऊ शकले नाहीत.लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या काळात लोकप्रतिनिधी विकासाच्या मोठ्या बाता मारतात, मात्र निवडून आल्यानंतर या समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते. संसदेत किंवा विधानसभेत तालुक्याच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्वक मांडणी करून निधी खेचून आणण्यात लोकप्रतिनिधी अपयशी ठरत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.तालुक्याचा हा प्रलंबित अनुशेष भरून काढण्यासाठी आता शासनाने आणि लोकप्रतिनिधींनी ठोस पावले उचलण्याची गरज आहे, अन्यथा अंजनगाव सुर्जी तालुका विकासाच्या नकाशावरून अधिकच पुसट होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# ग्रामपंचायतीचे वार्डनिहाय आरक्षण जाहीर

## ४ वार्डांतून ११ सदस्यांची निवड; सरपंचपद अनुसूचित जमाती (खुला) प्रवर्गासाठी राखीव

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

ग्रामपंचायतीच्या आगामी निवडणुकीसाठी वार्डनिहाय आरक्षणाची सोडत विशेष ग्रामसभेत जाहीर करण्यात आली. ग्रामपंचायत क्षेत्रात एकूण ४,६६५ मतदार असून चार वार्डांतून ११ सदस्यांची निवड होणार आहे. तसेच सरपंचपद अनुसूचित जमाती (खुला) प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित विशेष ग्रामसभेत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले कृषी अधिकारी एम. व्ही. भुरे, महसूल अधिकारी मोहन पाखरे व ग्रामविस्तार अधिकारी प्रदीप भाकरे यांच्या उपस्थितीत



आरक्षण सोडत पार पडली.

**वार्डनिहाय आरक्षण**

वार्ड क्र. १ : अनुसूचित जाती (खुला), सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण खुला

वार्ड क्र. २ : अनुसूचित जाती महिला, सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण खुला

वार्ड क्र. ३ : अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, सर्वसाधारण खुला

वार्ड क्र. ४ : अनुसूचित जाती (खुला), सर्वसाधारण महिला

आरक्षण जाहीर झाल्यानंतर गावातील राजकीय हालचालींना वेग येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. विविध प्रवर्गांतील इच्छुक उमेदवारांकडून निवडणूक लढविण्यासाठी चाचपणी सुरू झाली असून ग्रामपंचायतीवरील वर्चस्वासाठी स्थानिक राजकीय गटांची भूमिका काय राहणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. आगामी काळात निवडणुकीचे वातावरण अधिक रंगण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# नेहरू चौकातील पानपट्टीवर एफडीएचा छापा

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अन्न व औषध प्रशासन (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यापासून राज्यभरात भेसळखोर आणि गुटखा विक्रेत्यांविरुद्ध मोहिमेचा धडाका लावला आहे. याच पार्श्वभूमीवर, अंजनगाव सुर्जी येथील नेहरू चौक परिसरातील एका पानपट्टीवर अन्न सुरक्षा व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे.

या कारवाईत महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित असलेला सुगंधित तंबाखू आणि विविध प्रकारची स्वीट सुपारी जप्त करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही कारवाई ११ जून रोजी सायंकाळी नेहरू चौक परिसरातील 'बजरंग पान मटेरियल' या दुकानावर करण्यात आली. या दुकानाचा चालक जितेंद्र मंडलिक (वय ४९ वर्ष) याच्या ताब्यातून शासनाने प्रतिबंधित केलेला एकूण १९ हजार २७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये विविध कंपन्यांचा सुगंधित तंबाखू आणि आरोग्यास घातक ठरू शकणाऱ्या स्वीट सुपारीचा समावेश आहे.अन्न सुरक्षा अधिकारी घनश्याम दंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात आरोपी जितेंद्र मंडलिक याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेला माल पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतला असून, या प्रकरणाचा पुढील तपास अंजनगाव पोलीस करीत आहेत. अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कडक धोरणांमुळे सध्या भेसळयुक्त खाद्यपदार्थ आणि गुटखा विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. शहरात ठिकठिकाणी होणाऱ्या या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. आरोग्याशी खेळणाऱ्या अशा विक्रेत्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहील.

# एसआयआरमध्ये राजकीय पक्षांच्या, बीएलए.भूमिका महत्वाची

**चांदूरबाजार/वार्ताहर**

भारत सरकारच्या मुख्य निवडणूक आयोगा व्दारे, मतदार याद्यांचे विशेष पुनर्निरीक्षण कार्यक्रम देशभर सुरू आहे.या पुनर्निरीक्षण कार्यक्रमाचा महत्वाचा तिसरा टप्पा, जिल्ह्यात २० जून पासून सुरू होत आहे. यावेळी मतदारांच्या तपासणी साठी, निवडणूक विभागाचे बी.एल.ओ. घरोघरी जाणार आहेत.या तपासणी दरम्यान त्या - त्या ठिकाणच्या,राजकीय पक्षांचे बी.एल.ए.(बूथ लेवल एजंट) यांची भूमिका महत्वाची असणार आहे. तिसऱ्या टप्प्यातील मतदार यादीच्या निरक्षण प्रसंगी, राजकीय पक्षांच्या बी.एल.ए.मुळे निर्दोष मतदार यादी तयार होण्यास मदत होईल. मात्र सर्वच राजकीय पक्षांना एक महिना आधीच पूर्व सुचना देऊन ही, अद्यापही आपल्या राजकीय पक्षांच्या बी.एल.ए.ची बूथ निहाय नावांची यादी निवडणूक विभागाकडे दिली नाही. तरी तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या बी.एल.ए.च्या नावांची यादी, फोन नंबर सह निवडणूक विभागाकडे सादर करावी. असे आवाहन स्थानिक निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार यांनी, तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांना केले आहे.

एस.आय.आर.अंतर्गत मतदार याद्यांच्या पूनर्निरीक्षणाचा, तिसरा टप्पा अत्यंत महत्त्वाचा आहे. या टप्प्यात मतदार यादीतील एखाद्या मतदारांची माहिती निवडणूक विभागाच्या बी.एल.ओ.ला न मिळाल्यास, त्या मतदारांचे नाव मतदार यादीतून बाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर मतदाराची माहिती, राजकीय पक्षांचा बी.एल.ए.ही सादर करू शकतो. यामुळे मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळल्या जाणार नाही. याचा विचार करूनच मुख्य निवडणूक आयुक्तांनी बी.एल.ओ.यांना मदतनीस म्हणून, राजकीय पक्षांच्या बी.एल.ए.ची यांची स्थानिक निवडणूक विभागा कडे सादर करण्याची विनंती केली आहे. निवडणूक आयोगाने मतदार यादी पूनर्निरीक्षण वेळी, राजकीय पक्षांना दिलेल्या बी.एल.ए.च्या सोई कडे हेतूपरस्पर दुर्लक्ष करतात. मतदार यादीच्या पूनर्निरीक्षणातील महत्वाची बाब म्हणजे मतदारांचे नाव यादीतून वगळल्या गेल्यास, आक्षेप घेण्याचा अधिकार त्या मतदारास किंवा राजकीय पक्षांनी नेमलेल्या बी.एल.ए.यांनाच आहे.तो अधिकार कोणत्याही राजकीय पक्षांना नाही. हे विशेष.तरी ही राजकीय पक्ष आपला बी.एल.ए.का नेमत नाहीत? हे न सुटणारे कोडे आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या संधीचे सोने न करून घेणे.हे राजकीय पक्षांचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

> एक महिना आधीच तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांची, पक्षांचे बुथ लेवल एजंट नेमण्यासाठी सभा घेण्यात आली होती. त्यांना या संबंधी माहिती देऊन, मतदार यादीच्या निरक्षण प्रसंगी बी.एल.ए.ची भूमिका किती महत्त्वाची आहे.या बाबत माहिती देण्यात आली.या सभेला सर्वच राजकीय पक्षांचे तालुका अध्यक्ष व इतर प्रतिनिधी उपस्थित होते.त्या सर्वांना बी.एल.ए. नेमण्यासंबधीचे , निवडणूक विभागाचे फॉर्म ही देण्यात आले.मात्र अद्यापही एकाही राजकीय पक्षाकडून,बी.ए.ए.ची नावे देण्यात आली नाही.तरी सर्वच राजकीय पक्षांनी, त्वरित आपल्या बी.एल.ए.ची नांवे अर्जासह निवडणूक विभागाकडे सादर करावी.
>
> **मनिष यंबरवार,**
> नायब तहसीलदार, निवडणूक विभाग

# पीएम किसानच्या २३ व्या हप्त्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत जून महिन्यात प्रत्येकी दोन हजार रुपयांचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, केंद्र सरकारकडून अद्याप अधिकृत तारीख जाहीर करण्यात आलेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

अमरावती जिल्ह्यासह ग्रामीण भागातील हजारो शेतकरी या योजनेचा लाभ घेत आहेत. त्याच धर्तीवर यंदाही १८ जूनच्या आसपास २३ वा हप्ता वितरित होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तथापि, अधिकृत घोषणेअभावी शेतकऱ्यांनी अफवा किंवा सोशल मीडियावरील अप्रमाणित माहितीकडे दुर्लक्ष करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी अनोळखी लिंक, फोन कॉल किंवा संदेशांवर विश्वास ठेवू नये तसेच वैयक्तिक बँकिंग माहिती कोणालाही देऊ नये, असे आवाहनही करण्यात आले आहे. अधिकृत माहितीसाठी शासनाच्या संकेतस्थळाचा किंवा संबंधित विभागाच्या अधिकृत माध्यमांचा वापर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

> पीएम किसान योजनेचा लाभ नियमित मिळण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी ३० जून पर्यंत ई-केवायसी प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी. आधार व बँक खात्याची माहिती अद्ययावत ठेवल्यास पुढील हप्ता कोणत्याही अडचणीशिवाय मिळू शकतो.'
>
> **प्रियंका पाटबाजे,**
> सहाय्यक कृषि अधिकारी, अंजनगाव बारी

# आज अधिक मास समाप्तीनिमित्त 'भक्ती संध्या'

**अमरावती-**अधिक मासानिमित्त श्री अंबादेवी संस्थानतर्फे विविध



धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रममालिकेचा समारोप म्हणून ज्येष्ठ शास्त्रीय व उपशास्त्रीय गायक सूरमणी पं. धनंजय जोशी यांच्या 'भक्ती संध्या' या विशेष गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.हा कार्यक्रम सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ ते ८.३० या वेळेत श्री अंबादेवी कीर्तन सभागृहात होणार आहे. शास्त्रीय व उपशास्त्रीय गायनाच्या माध्यमातून भक्तिरसाची अनुभूती देणारा हा कार्यक्रम संगीतप्रेमींसाठी पर्वणी ठरणार आहे.नांदेड येथील एम.जी.एम. महाविद्यालयात भौतिकशास्त्राचे प्राध्यापक असलेले पं. धनंजय जोशी प्रख्यात गायक पं. अजय पोहनकर यांचे शिष्य आहेत. शास्त्रीय संगीत मैफिलींसह त्यांनी मराठी संगीत नाटकांमध्ये गायक-नट म्हणून विशेष नावलौकिक मिळविला आहे.या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी भाविक व संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री अंबादेवी संस्थान विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# नरेश धवने यांचे निधन

**कुऱ्हा-**तिवसा तालुक्यातील मारडा येथील माजी सरपंच सुरेशराव



मारोतराव धवने यांचे भाऊ युवा तरुण नरेशराव मारोतराव धवने यांचे वयाच्या ५२ व्या वर्षी दि. १३ जून ला अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, असा बराच मोठा आप्त परिवार आहे.स्व.नरेशराव धवने यांच्या अंत्यविधी करिती सर्वच स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.

# विदर्भ आयुर्वेदिक महाविद्यालय आणि ॲड. ठाकरे ॲन्ड असोसिएट्सच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर

**अमरावती/का.प्र.**

मानवी जीवनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या रक्तदान कार्यात आपला खारीचा वाटा उचलण्याच्या उद्देशाने, विदर्भ आयुर्वेदिक महाविद्यालय (राष्ट्रीय सेवा योजना संघ), अमरावती आणि ॲड. ठाकरे ॲन्ड असोसिएट्स, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिराचे रक्त संकलन डॉ.पंजाबराव देशमुख रक्तपेढी, अमरावती यांच्या तांत्रिक सहकार्याने करण्यात आले. या शिबिरात अनेक रक्तदात्यांनी सहभागी होऊन बहुमोल रक्तदान केले.प्रमुख उपस्थिती: या कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ. सुभाषचंद्र वार्ष्णेय यांनी भूषविले. यावेळी डॉ. रवींद्र वाघमारे, डॉ. निलेश इंगळे, डॉ. मंजुषा काळमेघ, डॉ. ज्योती डाखोरे, प्रा. डॉ. प्रशांत विघे, डॉ. नंदकिशोर लोहाणा आणि डॉ. कुशल झंवर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, राजेंद्र महल्ले, जस्सी नंदा, प्रवीण निमगावकर, अतुल किरणे, सचिन अवघड, अली कवसर, महेंद्र भूतडा, शिमेश श्रॉफ, दीपक अनासाने, सुधाकर तेटू, गजानन ठाकरे, संजय कंकाळे, चेतन पाकधने, श्रीकृष्ण ठाकरे, अनुराधा ठाकरे, कल्पना ठाकरे, हेमलता तेटू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. रक्तदात्यांचा सहभाग: या शिबिरात मयूर देव्हाते, प्रा. अभिजित काळबांडे, अतुल किरणे, जतीन अग्राहारी, अंश जैस्वाल, सौरभ वानरे, आदित्य चव्हाण, रुपेश डाखोरे, चिरंजीव मकरे, कमलेश चौधरी, चेतन जाधव, सार्थक गावंडे, समीर विघे, माधुरी चोन्डे, पल्लवी पहाडे, चेतन सपकाळ, गणेश डाखोरे, आयुषी लोखंडे, गौरव शर्मा, अभिषेक येणकर, क्षितीज आळेकर, आदित्य रावत, मनोहरलाल बजाज, गणेश रावत, पंकज काळे, प्रवीण पाठक, सौरभ सापधरे, ॲड.अनुज ठाकरे, ॲड. निखील देशमुख आणि चेतन उजवणे आदींसह अनेक रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. आयोजकांनी सर्व रक्तदाते, डॉक्टर आणि सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे आभार मानले.या रक्तदान शिबिराचे यश पाहता, समाजातील आरोग्य विषयक जाणीव जागृत करण्यात हा उपक्रम नक्कीच यशस्वी ठरला आहे.

## प्रशासनातील उत्तम सेवेकरी

# श्री.राजेंद्रजी जाधवर

एखाद्या पदाची खरी ओळख त्या पदाला मिळालेल्या अधिकारातून नव्हे, तर त्या अधिकाराचा उपयोग किती संवेदनशीलतेने समाजाच्या हितासाठी केला जातो यावर ठरत असते. प्रशासनात राहून माणुसकीचा स्पर्श जपणारे अधिकारी समाजासाठी नेहमीच प्रेरणादायी ठरतात. अशाच सेवाभावी, संवेदनशील आणि कर्तव्यनिष्ठ व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे श्री. राजेंद्रजी जाधवर.



समाज कल्याण विभाग, अमरावती येथे सहाय्यक आयुक्त म्हणून कार्यरत असलेले श्री. राजेंद्र जाधवर यांनी आपल्या कार्यकाळात प्रशासनातील जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडली आहे. गेल्या दहा वर्षांत अमरावती जिल्ह्यात विविध ठिकाणी कार्य करताना त्यांनी आपल्या कार्यातून केवळ अधिकारी म्हणून नव्हे, तर एक संवेदनशील माणूस म्हणून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

समाजातील वंचित, गरजू आणि दुर्लक्षित घटकांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचविणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे यासाठी त्यांची सदैव सकारात्मक भूमिका राहिली आहे.दिव्यांग बांधवांसाठी त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. दिव्यांग व्यक्तींना समाजात सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि त्यांना स्वावलंबनाकडे जाता यावे यासाठी त्यांनी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली. त्यासाठी विविध ठिकाणी दिव्यांग सक्षमिकरण अभियान राबविले त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे अनेक दिव्यांग व मुकबधीर बांधवांच्या व विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा नवा प्रकाश निर्माण झाला आहे.

श्री. राजेंद्र जाधवर यांची कार्यशैली म्हणजे सेवा, समर्पण, सहकार्य आणि संवेदनशिलता यांचा सुंदर संगम आहे. आपल्या कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्याशी त्यांचे असलेले आपुलकीचे नाते हे त्यांच्या मोठ्या मनाचे दर्शन घडवते. आपल्या पदाचा मोठेपणा न दाखवता प्रत्येकाशी सन्मानाने वागणे, सहकाऱ्यांच्या अडचणी समजून घेणे आणि एकसंघभावनेने काम करणे ही त्यांच्या व्यक्तीमत्वाची विशेष ओळख आहे.

श्री. जाधवर यांच्या सेवाभावी वृत्तीमागे त्यांच्या आई वडीलांच्या संस्कारांची मोठी ताकद आहे. त्यांचे वडील श्री. विठ्ठलराव जाधवर हे आदर्श शिक्षक म्हणून शिक्षण क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी दिलेले संस्कार, प्रामाणिकपणा, त्याग, समर्पण आणि समाजहिताची भावना ही माणुसकीची शिकवण श्री. जाधवर सर आपल्या कार्यातून पुढे नेत आहेत.

***'हम न सोचे हमे क्या मिला है !***
***हम ऐ सोचे किया क्या है अर्पण !!***

हा विचार त्यांच्या प्रत्येक कृतीतून जाणवतो. कोणतीही अपेक्षा न ठेवता, निस्वार्थ भावनेने समाजाची सेवा करणे, प्रत्येकाला आवश्यक ते सहकार्य करणे हेच त्यांच्या जीवनाचे खरे वैशिष्ट्य आहे.

आज त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला व कार्याला सलाम करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेत लिहीलेल्या खालील ओळी सार्थ ठरतात....

***दिसे बिचारा साधा - भोळा !***
***परि हृदयी कार्याचा जिव्हाळा !***
***हवाहवाच वाटे सकाळा !***
***सेवागुणे....!!***

समाजाला अशाच संवेदनशील आणि कर्तव्यनिष्ठ अधिकारी असलेल्या व्यक्तिमत्वाची आज गरज आहे.म्हणुनच त्यांचे हे अलौकिक कार्य आज अनेकांसाठी प्रेरणेचा स्त्रोत ठरले आहे.

आदरणीय राजेंद्रजी जाधवर यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्याकडून प्रशासकीय सेवेसोबतच समाजसेवेचे हे महान कार्य अखंडपणे सुरू राहो. हिच ईश्वरचरणी प्रार्थना...

***वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!***

**श्रीकृष्ण रामदास पखाले**
सुप्रसिद्ध निवेदक तथा व्याख्याते
मो. ९४२०४०५६०७

# पं.तरुणजी भट्टाचार्य यांच्या संतूर वादनाने जिंकलीत रसिकांची मने

## ॲड.संकेत जोशी यांच्या तबला वादनाने सभागृह मंत्रमुग्ध

**अमरावती/का.प्र.**

जगविख्यात संतूर वादक पद्मश्री पं. तरुणजी भट्टाचार्य यांच्या संतूर वादनाचा कार्यक्रम हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व.सोमेश्वर पुसतकर सभागृहात नुकताच झाला. नाद,स्वर आणि स्मृतींचा या उत्सवाला अमरावतीकरांनी भरभरून प्रतिसाद दिला. येथील प्रसिद्ध तबलावादक ॲड संकेत सतीश जोशी यांनी वडिलांच्या स्मरणार्थ या स्वरोत्सवाचे आयोजन केले होते.रसिकमान्य संगीतकार म्हणून ओळखल्या जाणारे संकेत जोशी यांच्या तबला वादनाने सभागृह मंत्रमुग्ध झाले.

भारतीय शास्त्रीय संगीतील मैहर घराण्याचे प्रतिनिधीत्व करणारे प्रतिष्ठित आणि जागतिक कीर्तीचे संतूर वादक पं. तरुणजी भट्टाचार्य यांनी संतूर या मूळच्या काश्मिरी लोकवाद्याला शास्त्रीय संगीताच्या मंचावर मानाचे स्थान मिळवून देण्यात मोलाचा वाटा आहे. भारतरत्न पं. रविशंकर यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले आहे. भारतीय संगीतातील त्यांच्या या अमुल्य योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. संगीत नाटक अकादमी पुरस्कार,सूरमणी पुरस्कार तसेच येत्या बावीस तारखेला पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.



पं. तरुणजी भट्टाचार्य यांनी केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील प्रतिष्ठित रॉयल अल्बर्ट हॉल, वॉशिंग्टन डीसी मधील केनेडी सेंटर येथे कला सादर केली आहे. विख्यात तबला वादक झाकीर हुसेन यांच्या सोबतच्या त्यांच्या जुगलबंदी प्रचंड गाजल्या आहेत. अमरावती येथील तबलावादक ॲड संकेत जोशी यांनी सदर कार्यक्रमात दिलेली साथही वाखाणण्याजोगी आहे. खुद्द पं. तरुणजी भट्टाचार्य यांनी त्यांच्या तबलावादनाचे कार्यक्रमात भरभरून कौतुक केले. अमरावतीकरांनी टाळ्यांच्या कडकडाटात संकेतचा गौरव केला.

अमरावती जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी संकेतच्या मातोश्री जयश्री जोशी यांचा पंडितजींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच इतर संबंधित मान्यवरांना सन्मानितही करण्यात आले. अबोली जोशी यांनी पंडितजींचा परिचय करून दिला तसेच दरवर्षी अशा कार्यक्रमांची आखणी करण्यात येणार असल्याचे सुतोवाच करण्यात आले. या कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण निवेदन गायिका प्रतिक्षा डांगे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केले. एकंदरीत हा कार्यक्रम अमरावतीकरांसाठी अपुर्व अशी सांगितीक मेजवानी ठरला आहे.

# दोन खून ... दोन तपास ... आणि पोलिसांचाही दुहेरी 'स्ट्राईक'

## आलेगाव खूनप्रकरणातील तिघे अवघ्या ६ तासांत जेरबंद, तारफैल हत्याकांडात १२ तासांत आरोपीच्या मुसक्या आवळल्या

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात एका दिवसात घडलेल्या दोन भीषण हत्याकांडांनी कायदा-सुव्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण केले असतानाच स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) आणि संबंधित पोलिसांनी दाखविलेल्या वेगवान कारवाईने गुन्हेगारांना जबरदस्त धक्का दिला आहे. पातूर तालुक्यातील आलेगाव येथील अल्पवयीन मुलाच्या खूनप्रकरणातील तीन आरोपींना अवघ्या सहा तासांत जेरबंद करण्यात आले, तर अकोला शहरातील तारफैल भागातील खूनप्रकरणात १२ तासांच्या आत एका आरोपीला अटक करण्यात यश आले. जिल्हा पोलिसांनी रात्रंदिवस राबविलेल्या शोधमोहिमेमुळे फरारी आरोपींचे मनसुबे उधळले गेले.

दोन्ही प्रकरणांत आरोपींनी गुन्ह्यानंतर जिल्ह्याबाहेर पसार होण्याचा प्रयत्न केला. मात्र एलसीबीच्या तांत्रिक तपास, माहितीदारांचे जाळे आणि वेगवान हालचालीमुळे त्यांचे सर्व डाव उधळले गेले. मोबाईल लोकेशन, गुप्त माहिती आणि प्रत्यक्ष शोधमोहीम यांचा संगम साधत पोलिसांनी आरोपींपर्यंत थेट मजल मारली.

जिल्ह्यातील दोन खूनप्रकरणांमध्ये पोलिसांनी दाखविलेली तत्परता ही केवळ तपासातील यशोगाथा नसून गुन्हेगारांसाठी कठोर इशाराही मानली जात आहे. गुन्हा करून पळ काढण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना पोलिसांचा ससेमिरा चुकविता येणार नाही, हे या कारवाईतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अवघ्या काही तासांत आरोपींना बेड्या ठोकून अकोला पोलिसांनी आपल्या कार्यक्षमतेची ठळक छाप उमटविली आहे.






### 'वाद मिटवायचा' बहाणा, पण घात झाला जीवावर

दुसरीकडे अकोला शहरातील तारफैल भागात घडलेले हत्याकांडही तितकेच धक्कादायक ठरले. अंकीत नंदागवळी याला कौटुंबिक वाद मिटविण्याच्या नावाखाली फोन करून तारफैल येथे बोलावण्यात आले. तेथे पोहोचताच मुख्य आरोपी आनंद चवरे आणि त्याच्या साथीदारांनी धारदार शस्त्रांनी हल्ला चढवत त्याचा निर्घृण खून केला. घटनेनंतर आरोपी पसार झाले. मात्र उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर आणि रामदासपेठचे ठाणेदार शिरीष खंडारे यांनी घटनास्थळी धाव घेत तपासाची सूत्रे हाती घेतली. एलसीबीची तीन विशेष पथके तयार करण्यात आली. अकोला शहर, रेल्वे स्टेशन, बसस्थानके, तसेच शेगाव येथील रेल्वे स्टेशन, मंदिर परिसर, भक्तनिवास, लॉजेस आणि हॉटेल्समध्ये रात्रभर शोधमोहीम राबविण्यात आली. या धडाकेबाज कारवाईत निलेश उर्फ दद्दू विजय बोरकर (२६, रा. तारफैल) याला ताब्यात घेण्यात आले. उर्वरित आरोपींचा कसून शोध सुरू असून त्यांनाही लवकरच अटक करण्यात येणार असल्याचा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

### या अधिकाऱ्यांनी रात्रभर झटून उभी केली यशोगाथा

या कारवाईत पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, ठाणेदार गंगाधर दराडे, पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गोपाल जाधव, निलेश देशमुख, पोलीस उपनिरीक्षक माजिद पठाण, तसेच पोलीस अंमलदार महेंद्र मलिये, वसीमोद्दीन, शेख हसन, रविंद्र खंडारे, फिरोज खान, अब्दुल माजिद, किशोर सोनोने, अमोल दिपके, श्रीकांत पातोंड, धीरज वानखेडे, राज चंदेल, अभिषेक पाठक, चालक मनीष ठाकरे आणि सायबर विभागाचे तेजस देशमुख यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### चाकूच्या सपासप वारांनी १७ वर्षीय यशचा जीव घेतला

पातूर तालुक्यातील आलेगाव येथे वसंतराव नाईक शाळेसमोरील शेकापूर फाट्यावर रविवारी घडलेली घटना अंगावर काटा आणणारी ठरली. यश गजानन गिन्हे (वय १७) या अल्पवयीन मुलावर कौटुंबिक वादाच्या कारणावरून गावातीलच काही तरुणांनी चाकूने सपासप वार केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या यशचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी फरार झाल्याने गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक अर्चित (अचिंत) चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांनी प्रकरण गांभीर्याने घेत तातडीने विशेष पथके रवाना केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वाखाली एलसीबी, बाळापूर उपविभाग आणि चान्नी पोलिसांची संयुक्त मोहीम सुरू झाली. तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला.

अमरावतीकडे पळून जाण्याच्या तयारीत असलेले चैतन्य जगदीश काळपांडे (१९, रा. आलेगाव) आणि एक विधीसंघर्षग्रस्त बालक (१६) यांना दर्यापूर रोडवरील आपातापा परिसरातून एलसीबीने ताब्यात घेतले. तर तिसरा आरोपी जतीन राजेश क्षीरसागर (१९, रा. विवरा) याला चान्नी पोलिसांनी अटक केली. अवघ्या सहा तासांत तिन्ही आरोपी पोलिसांच्या जाळ्यात अडकल्याने तपास यंत्रणेच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

## मनपाने केलेली छाया हॉस्पिटलची अतिक्रमण कारवाई अवैध
### न्यायालयात दाद मागणार, देशमुख यांची माहिती

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्वतःच्या जागेतील बांधकामाला अतिक्रमण संबोधून व प्रकरण न्यायप्रविष्ट असतांनाही आपली वास्तू ही अतिक्रमित ठरवून मनपा प्रशासनाने उध्वस्त केली, यामुळे न्यायालयचा अवमान होऊन आपली नाहक आर्थिक क्षती झाली आहे. सबब आपण या संदर्भात मनपा प्रशासनाच्या या अतिरेकी अवैध कारवाई संदर्भात न्यायालयाचे दार ठोठावून दाद मागणार असल्याची माहिती छाया हॉस्पिटलच्या संचालिका डॉ छाया देशमुख यांनी दिली. रविवारी देशमुख यांच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत मनपा प्रशासनाच्या या अविवेकी व अवैध कारवाईची ची माहिती देण्यात आली. छाया हॉस्पिटलचे सर्व बांधकाम मालकीच्या जागेत आहे. तरीही मनपाने रस्ता रूंदीकरणाच्या नावाखाली जागा हडपण्याचा प्रयत्न घालविलेला आहे. त्यामुळे मालकीच्या जागेतील बांधकामालाही जाणून बुजून 'अतिक्रमण' असा



शब्दप्रयोग करून डाव साधला गेला. हा वाद न्यायप्रविष्ट असतांना सुध्दा बांधकाम पाडण्यात आले. कंपाऊंड वॉलचा काहीच संबंध नसतांना न्यायव्यवस्थेलाही न जुमानता ते सुध्दा जमिनदोस्त करण्यात आले. दरम्यान एकीकडे या प्रकरणाची सुनावणी सुरू असतांनाच दुसरीकडे बुलडोझर लावून बांधकामाची तोडाफोड करण्यात येत होती. यावेळी आपण न्यायालयाचा आदेश येईपर्यंत कारवाई करू नये म्हणून विनंती करण्यात आली होती. न्यायालयाचे दस्तावेज मनपा अधिकाऱ्यांना दाखविण्यात आले होते. सायंकाळी न्यायालयाचा 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश आलेला होता. परंतू केलेल्या विनंतीला प्रतिसाद न देता त्यापूर्वीच कारवाई पूर्ण करण्यात आली. या बांधकामामुळे गेल्या ३० वर्षात रहदारीला कोणताच अडथळा झालेला नाही. रस्ता रूंदीकरणासाठी आपण सहकार्य करण्यास तयार होतो. त्यासाठी एमआर.टी.पी अक्ट १२७ नुसार नोटीस दिली असतांनाही आमची जागा विनामुल्य हडपण्याचा गैर कायदेशीर डाव साधण्यासाठी वरील नोटीसकडे जाणून बुजून दुर्लक्ष करण्यात आलेअसल्याचा आरोप यावेळीं करण्यात आला. मुळात मालकीच्या जागेत बांधकाम असतांना त्याला अतिक्रमण कसं काय संबोधता येते? याबाबत मनपा अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण देण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. या पत्रकार परिषदेत यावेळी डॉ छाया देशमुख यांचे पती डॉ डी के देशमुख उपस्थित होते.

## महाराष्ट्र चेंबर मध्ये निवड हा जिल्ह्याचा बहुमान -रुहाटिया

■ प्रतिनिधी | अकोला ■

व्यापार, उद्योगांना नव्या चालना, नवे तंत्रज्ञान, आधुनिक जगातली माहितीसाठी सेवार्थ असणाऱ्या यंग इंडिया बिजनेस क्लबचा आपणही एक घटक असून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अग्रिकल्चर या शिखर संस्थेच्या विदर्भ उपाध्यक्षपदी अविरोध झालेली आपली निवड ही अकोला जिल्ह्याचा बहुमान असून या संस्थेचे केंद्रीय कार्यालय हे अकोल्यात व्हावे अशी आपली मनीषा असून यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्या ची ग्वाही महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड एग्रीकल्चर संस्थेचे नवनिर्वाचित विदर्भ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया यांनी व्यक्त केले. त्यांच्या या निवडीबद्दल यंग इंडिया बिझनेस क्लबच्या वतीने त्यांचा गौरव सोहळा संपन्न



झाला. क्लबचे व्यवस्थापकीय संचालक एड देवेंद्र अग्रवाल यांच्या पुढाकाराने आयोजित या सोहळ्यात क्लबचे राष्ट्रीय अध्यक्ष रमाकांत खेतान, क्लब अध्यक्ष निलेश बियाणी, सचिव श्रीराम पांडे, कोषाध्यक्ष योगेश तिवारी उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या उपस्थितीत महाराष्ट्र चेंबरचे नवनिर्वाचित विदर्भ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया यांचा स्मृतिचिन्ह शाल श्रीफळ देऊन भावपूर्ण गौरव करण्यात येऊन त्यांना शुभेच्छा बहाल करण्यात आल्यात. यावेळी क्लबचे मार्गदर्शक, ज्येष्ठ उद्योजक रमाकांत खेतान यांनी सिद्धार्थ रुहाटिया यांच्या उद्योग, व्यापार क्षेत्रातील सेवा कार्याची माहिती देत आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या सत्काराला उत्तर देताना सिद्धार्थ रुहाटिया यांनी व्यापार उद्योग क्षेत्रासमवेत कास्तकारांची ही सेवा उल्लेखनीय असल्याचे सांगून यासाठीच महाराष्ट्र चेंबरमध्ये कृषी क्षेत्रालाही समाविष्ट करून त्यांनाही या विश्वात वाव देण्याचे स्पष्ट केले.

क्लबचे व्यवस्थापकीय संचालक एड देवेंद्र अग्रवाल यांनी यावेळी प्रास्ताविक सादर करून रुहाटीया यांच्या कार्य कर्तुत्वा समवेत क्लब ची भूमिका मांडली. आपण या व्यापार उद्योग क्षेत्रातील क्लब मध्ये का सदस्य होतो? याची जाणीव होणे सर्वप्रथम आवश्यक असून क्लबच्या माध्यमातून आपल्या उद्योगांची भरभराट व्हावी यासाठीच याची जडणघडण करण्यात आल्याचे सांगितले. क्लब सदस्यांनी आपली ओळख देताना काय करावे याचे त्यांनी यावेळी प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी क्लब मध्ये नवीन आलेले डॉ नवनीत अग्रवाल या सदस्यांची ओळख करून देण्यात आली. तसेच सर्व सदस्यांनी आपल्या सेवा कार्याची ओळख सादर केली. अध्यक्षीय मनोगत निलेश बियाणी यांनी करून सदस्यांनी नवीन सदस्य जोडो अभियान कार्यान्वित करण्याचे आवाहन केले केले.

## तेल्हारा नगर परिषदेत सेवा हमी कायदा कागदावरच?
### दलालांची 'एक्सप्रेस सेवा', सामान्य नागरिकांची मात्र फरफट

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

महाराष्ट्र शासनाने नागरिकांना वेळेत सेवा मिळावी यासाठी लागू केलेला सेवा हमी कायदा तेल्हारा नगर परिषदेत अक्षरशः धाब्यावर बसविल्याचे चित्र समोर येत आहे. शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा आणि प्रशासकीय सेवांचा बोजवारा उडाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून, 'नियमाने अर्ज करणाऱ्यांची कामे रखडतात आणि काहींची कामे झटपट कशी होतात?' असा थेट सवाल आता जनतेकडून विचारला जात आहे.

शहरातील अनेक भागांत कचऱ्याचे ढीग दिवसेंदिवस वाढत आहेत. नाल्यांची स्वच्छता वेळेवर होत नसल्याने दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. पाणीपुरवठ्याच्या अनियमिततेमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. दुसरीकडे बांधकाम परवानग्या, दुकानांच्या एनओसी, मालमत्ता नोंदणी, विविध दाखले आणि इतर प्रशासकीय कामे महिनोनमहिने प्रलंबित असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत.

सेवा हमी कायद्यानुसार ठरावीक मुदतीत कामे पूर्ण होणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात नागरिकांना नगर परिषद कार्यालयाच्या वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. त्यामुळे हा कायदा फक्त फलकांवर आणि सरकारी कागदपत्रांपुरताच मर्यादित राहिला आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तेल्हारा शहरात सध्या एकच चर्चा रंगली आहे; नियमाने अर्ज करणारा नागरिक वारंवार चकरा का मारतो आणि काहींची कामे तातडीने कशी होतात? सेवा हमी कायदा नेमका कोणासाठी आहे? या प्रश्नांची स्पष्ट आणि ठोस उत्तरे नगर परिषद प्रशासनाने जनतेसमोर मांडण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

दरम्यान, यासंदर्भात नगर पालिका प्रशासनाला संपर्क साधला असता होऊ शकला नाही, तर नगर परिषद प्रशासनाचा याबाबतचा अधिकृत प्रतिसाद मिळाल्यास तो सुद्धा प्रसिद्ध करण्यात येईल.



### 'जनतेची कामे रखडतात, जबाबदार कोण?'

प्रहार संघटना महाराष्ट्राचे अकोला जिल्हा महासचिव राजेश पाटील खारोडे यांनी नगर परिषद प्रशासनावर जोरदार हल्लाबोल करत नागरिकांच्या समस्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. 'शहरातील नागरिकांची कामे वेळेत होत नसतील तर त्याला जबाबदार कोण? सामान्य माणसाला आपल्या रोजंदारीची, शेतीची किंवा व्यवसायाची कामे सोडून नगर परिषदेत वारंवार चकरा माराव्या लागतात, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. नागरिकांच्या वेळेची आणि श्रमांची किंमत प्रशासनाला आहे की नाही?' असा सवाल खारोडे यांनी उपस्थित केला.

### दलालांमार्फत कामे झटपट? शहरात चर्चांना उधाण

नगर परिषदेच्या कार्यपद्धतीबाबत शहरात गंभीर स्वरूपाच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. काही विशिष्ट दलालांच्या माध्यमातून अथवा शिफारशीने कामे जलदगतीने मार्गी लागतात, तर नियमाने अर्ज करणाऱ्या नागरिकांना मात्र दिवसेंदिवस हेलपाटे मारावे लागतात, अशी चर्चा शहरभर सुरू आहे. याबाबत खारोडे म्हणाले, 'जर अशा प्रकारची व्यवस्था प्रत्यक्षात अस्तित्वात असेल तर ती लोकशाही व्यवस्थेला घातक आहे. प्रशासनाने याची सखोल चौकशी करून नागरिकांसाठी पारदर्शक आणि उत्तरदायी यंत्रणा उभी करावी.'

### कर्मचारी-अधिकारी समन्वयाचा अभाव?

नगर परिषदेत कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय नसल्याने विकासकामे आणि प्रशासकीय प्रक्रिया प्रभावित होत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. अनेक विभागांत मनुष्यबळाची कमतरता असल्याने कामांचा खोळंबा होत असल्याची वस्तुस्थितीही पुढे येत आहे. यावर उपाय सुचविताना खारोडे यांनी शासनाच्या नियमांनुसार सेवानिवृत्त अनुभवी कर्मचाऱ्यांना करार पद्धतीवर पुन्हा सेवेत घेण्याचा पर्याय वापरण्याची मागणी केली. 'नगराध्यक्ष आणि मुख्याधिकाऱ्यांनी इच्छाशक्ती दाखवली तर प्रलंबित कामांना गती मिळू शकते,' असे ते म्हणाले.

### प्रहारचा आंदोलनाचा इशारा

शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा, सेवा हमी कायद्यांतर्गत प्रलंबित कामे आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत तातडीने उपाययोजना न झाल्यास प्रहार संघटना रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. 'सामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी आम्ही जनतेला सोबत घेऊन आक्रमक आंदोलन उभारू. प्रशासनाने वेळीच जागे व्हावे, अन्यथा जनआक्रोशाचा सामना करण्याची तयारी ठेवावी,' असा स्पष्ट इशारा खारोडे यांनी दिला.

## भव्य-दिव्य ऐतिहासिक श्याम झुलनोत्सवा ची तयारी जोमात

**अकोला :** 'श्याम के दिवाने' या अध्यात्मिक युवा समूहाच्या वतीने दि १२ ऑगस्ट रोजी भव्य चतुर्थ श्याम झुलनोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या भव्य भजन महोत्सवाची तयारी जोमात सुरू करण्यात आली आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १८९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जीआरपीच्या तत्कालीन ठाणेदारासह पाच जणांविरुद्धील लाचप्रकरणी १७ जूनला सुनावणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

धावत्या रेल्वेत शेंगदाणे विक्री करणाऱ्या एका हॉकरकडून व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी मासिक लाचेची मागणी केल्याच्या आरोपावरून दाखल करण्यात आलेल्या बहुचर्चित भ्रष्टाचारप्रकरणातील खटल्याची पुढील सुनावणी १७ जून रोजी प्रथम जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयात होणार आहे. या प्रकरणात अकोला जीआरपीचे तत्कालीन ठाणेदारांसह पाच जण आरोपी आहेत. जवळपास दहा वर्षांपासून न्यायालयीन प्रक्रियेत असलेल्या या खटल्याकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे.

सन २०१६ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) दाखल झालेल्या तक्रारीनंतर हे प्रकरण उघडकीस आले होते. तक्रारदार हा धावत्या रेल्वेत शेंगदाणे विक्री करून उदरनिर्वाह करीत होता. त्याने दिलेल्या तक्रारीनुसार, अकोला जीआरपी पोलीस ठाण्यातील डीबी शाखेतील काही कर्मचाऱ्यांकडून व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी नियमितपणे हप्त्याची मागणी करण्यात येत होती.

तक्रारीत तक्रारदार व त्याच्या एका मित्राकडून दरमहा ४ हजार ५०० रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आल्याचा उल्लेख होता. पुढे ही रक्कम वाढवून ६ हजार ५०० रुपये करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला होता. पैसे न दिल्यास रेल्वेमधील विक्री व्यवसायात अडथळे निर्माण केले जातील, असा दबाव टाकला जात असल्याचे तक्रारदाराने म्हटले होते.

तक्रारीची प्राथमिक पडताळणी झाल्यानंतर तत्कालीन एसीबी उपअधीक्षक उत्तम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा कारवाई करण्यात आली. त्यानंतर २९ जुलै २०१६ रोजी तत्कालीन जीआरपी ठाणेदार राजकुमार तुकाराम वानखेडे यांच्यासह सतीषसिंह जसवंतसिंह चव्हाण, गौतम हरिभाऊ सिरसाट, शरद बालाभाऊ जुंधरे आणि सुनील लक्ष्मणराव कडू यांना अटक करण्यात आली होती.

या प्रकरणी रामदास पेठ पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलम ७, कलम १३(१)(ड) सह १३(२) तसेच भारतीय दंड संहितेच्या कलम २०१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर एसीबीने तपास पूर्ण करून आवश्यक पुरावे संकलित केले व न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

विशेष म्हणजे, गुन्हा नोंदविल्यानंतर तब्बल १४ महिन्यांनी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. त्यानंतर खटल्याची सुनावणी सुरू झाली. सध्या हे प्रकरण प्रथम जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयात प्रलंबित आहे. आगामी सुनावणीत प्रकरणातील पुरावे, साक्षीदारांचे जबाब आणि दोन्ही पक्षांच्या युक्तिवादांवर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे. रेल्वे परिसरातील अनधिकृत विक्री, त्यावरील नियंत्रण आणि त्यासंदर्भातील कथित भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे हे प्रकरण त्या काळात चर्चेत आले होते. दहा वर्षांनंतरही न्यायालयीन प्रक्रियेत असलेल्या या खटल्याच्या पुढील टप्प्याकडे कायदेवर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### दोषारोपपत्रासाठी १४ महिन्यांचा कालावधी

या प्रकरणात एसीबीने तपास पूर्ण करून आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी सुमारे १४ महिन्यांचा कालावधी घेतला होता. तपासातील कागदपत्रे, पुरावे आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपपत्र सादर करण्यात आले. त्यानंतर प्रकरणाची सुनावणी विविध टप्प्यांतून पुढे सरकत आहे.

# जागतिक रक्तदाता दिनानिमित्त अमरावतीत रक्तदान शिबिर

**अमरावती/प्रतिनिधीः-** जागतिक रक्तदाता दिनाचे औचित्य साधून इंडियन मेडिकल असोसिएशन, अमरावती आणि असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १४ जून २०२६ रोजी आयएमए हॉल, अमरावती येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत झालेल्या या शिबिराला डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे शिबिर डॉ. दिनेश वाघाडे, अध्यक्ष, आयएमए अमरावती, डॉ. विक्रम वानखडे, सचिव, आयएमए अमरावती, डॉ. पंकज बागडे, अध्यक्ष, एपीए आणि डॉ. राहुल मानकर, सचिव, एपीए यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.





डॉ. दिनेश वाघाडे म्हणाले, ‘जागतिक रक्तदाता दिन आपल्याला सुरक्षित रक्ताचे महत्त्व पटवून देतो. आज पुढे आलेल्या प्रत्येक रक्तदात्याचे आम्ही आभारी आहोत. रक्ताच्या एका पिशवीमुळे तीन रुग्णांचे प्राण वाचू शकतात.’

संकलित केलेल्या रक्ताच्या पिशव्या आपत्कालीन, शस्त्रक्रिया आणि थॅलेसेमिया रुग्णांसाठी अतिशय आवश्यक असतात. या शिबिराकरिता डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय रक्तपेढीचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच सर्व रक्तदात्यांना प्रशस्तीपत्र आणि अल्पोपहार देण्यात आला.

या कार्यक्रमास डॉ. दिनेश वाघाडे, डॉ. विक्रम वानखडे, डॉ. रोहन बोबडे, डॉ. अलका कुथे, डॉ. विजय कुथे, डॉ. अश्विनीकुमार देशमुख, डॉ. संदीप दानखडे, डॉ. पंकज बागडे, डॉ. सोहेल बारी, डॉ. धीरज सवाई, डॉ. आशिष डागवार, डॉ. सिकंदर अडवाणी, डॉ. भूषण सागणे, डॉ. सौरभ लांडे, डॉ. पंकज इंगळे, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. रूपेश शेंडोकार, डॉ. अक्षय चांदुरकर, डॉ. संकेत अग्रवाल, डॉ. अभिलाष पोहोकार, डॉ. अपूर्वा मुंदडा, डॉ. युवराज बंड, डॉ. राहुल ढाकरे, डॉ. अक्षय हटवारे, डॉ. राहुल मानकर व डॉ. दिपाली चांदुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.पावसाळा आणि सणासुदीच्या काळात रक्ताची मागणी वाढते, त्यामुळे अशा शिबिरांचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे आयोजकांनी सांगितले. रक्ताचा पुरेसा साठा उपलब्ध राहावा यासाठी आयएमए अमरावती आणि एपीए तर्फे नियमितपणे रक्तदान शिबिरे आयोजित केली जाणार आहेत.

# अवैध देशी दारूची मोटर सायकलवरून वाहतूक

## आरोपींना रंगेहात अटक,५१ हजाराचा मुद्देमाल जप्त

**मोर्शी/प्रतिनिधीः-** अवैध्य देशी दारूची मोटर सायकल वरून वाहतूक करीत असतांना मोर्शी पोलिसांनी रेल्वे गेट परिसरात नाकाबंदी करून कारवाई केली. देशी दारू विक्रीकरिता घेऊन जाणाऱ्या आरोपींना मोर्शी पोलिसांनी रंगेहात पकडून जवळपास ५१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात यश प्राप्त केले. अवैध देशी-विदेशी दारू विक्रीसाठी बाळगणाऱ्या इसमांवर कार्यवाही करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी दिले.त्या अनुषंगाने गुप्त माहितीच्या आधारे मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्शी पोलिसांनी रेल्वे गेट परिसरात सापळा रचून नाकाबंदी केली.यावेळी मोटारसायकलवरून देशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपी विजय लक्ष्मण जाधव (वय ३५ वर्षे,रा. मोर्शी), सुनील ज्ञानेश्वर उडापुरे (वय ३० वर्षे,रा. पेडगाव ता.मोर्शी)



यांच्या ताब्यातून देशी दारूच्या एकूण २९६ बाटल्या एकूण किंमत १५,६८० रुपये तसेच देशी दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली मोटारसायकल क्र.एम एच २७/ ए एम ९१४१ किंमत ३५,००० रुपये असा एकूण ५०,६८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात येऊन त्यांना ताब्यात घेण्यात आले.पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे.सदरची कारवाई पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिवराज पवार,पोलीस हवालदार योगेश सांभारे, पोलीस अंमलदार पप्पू शुंगणजुळे यांनी केली. मोर्शी शहरात राज्य उत्पादन शुल्क खात्याचे कार्यालय असून सुद्धा येथील वरिष्ठ अधिकारी अवैध देशी विदेशी व गावठी दारू विक्रीकडे जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांनी केला असून कोणत्याही प्रकारची ठोस कार्यवाही केल्या जात नसल्यामुळे राज्य उत्पादन शुल्क खात्याच्या अधिकाऱ्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.या अगोदर मोर्शी व मध्यप्रदेश पोलिसांनी संयुक्तरित्या गावठी दारू काढणाऱ्या अड्ड्यावर धाड टाकून जागीच माल नष्ट केला होता.त्यानंतर मोर्शी पोलिसांनी अवैध विदेशी दारू विक्रीसाठी बाळगणाऱ्या इसमांवर सुद्धा कार्यवाही केली होती. मात्र राज्य उत्पादन शुल्क खात्याचे अधिकारी कुंभकर्णी झोपेत आहे की काय?असा संतप्त सवाल सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहे.

# गडगडेश्वर ते रविनगर परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी मोहीम

## महावीर दूध डेअरीवर ५००० दंड

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त मनोज शहाळे झोन क्र.५ भाजीबाजार यांच्या मार्गदर्शनाखाली गडगडेश्वर ते रविनगर रोड परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी विशेष मोहीम राबविण्यात आली.



या मोहिमेदरम्यान एकूण १४ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान काही ठिकाणी शासनाने प्रतिबंधित केलेल्या प्लास्टिकचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित आस्थापनांवर महानगरपालिकेकडून नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली.

यामध्ये महावीर दूध डेअरी या आस्थापनामध्ये प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळून आल्याने संबंधित आस्थापनावर ५००० दंड आकारण्यात आला.


सदर मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक राजेश राठोड, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी, सागर इंगोले व अनिकेत फुके उपस्थित होते.

महानगरपालिकेने नागरिक व व्यावसायिक आस्थापनांना प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळून स्वच्छता नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले असून अशा मोहिमा पुढेही नियमितपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

# एकाच रात्री चार घरफोड्यांनी दापोरी गाव हादरले

## ६० हजार ५०० रुपयाचा ऐवज लंपास

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी येथून जवळच असलेल्या दापोरी गावात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घालून एकापाठोपाठ तीन घराला तसेच लागूनच असलेल्या भाईपूर गावातील एका घराला लक्ष केंद्रित करून घराच्या आत प्रवेश मिळविला आणि रोख रक्कम व सोन्या-चांदीच्या दागिन्यासह ६० हजार ५०० रुपयाचा ऐवज लंपास करून घटनास्थळावरून पलायन केल्याची घटना दि.१३ जून रोजी सकाळी सात वाजताचे सुमारास उघडकिस आली.एकाच रात्री झालेल्या या चार घरफोडीमुळे संपूर्ण दापोरी गाव हादरून निघाले असून नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे.





पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार दि.१२ जून रोजी मंगेश राजेंद्र गावंडे (वय २२ ) हे नेहमीप्रमाणे ११ वा.च्या सुमारास घराचा मुख्य दरवाजा बंद करुन हॉलमध्ये झोपले होते. अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश मिळविला.कपाटा मधील असलेल्या लॉकरमधून नगदी १५ हजार रुपये व गळ्यातील ३ हजार रुपये किमतीच्या तीन ग्रॅम चांदीच्या चेनवर हात साफ केला.नंतर चोरट्यांनी आपला मोर्चा गावातील राजेंद्र साहेबराव दोडके (वय ४२) यांच्याकडे वळवून त्यांच्या घरातील हॉलमध्ये ठेवलेल्या सुटकेसमधून जुने सोन्याचे वापरते ३ ग्रॅमचे कि.अं.१२००० रु किमतीचे कानातले,४ ग्रॅमची सोन्याची पोत कि.अं. १६००० रु.असा ऐवज लंपास केला.

नंतर गावातीलच आशाबाई बाळकृष्ण बळोदे (वय ७५) यांचे घरातून चोरट्यांनी १० लुगडे कि.अं.४००० रु घेऊन तेथून पलायन केले. नंतर गावाला लागूनच असलेल्या भाईपुर येथील रामप्रसाद शामा पाटील यांच्या घराला सुद्धा लक्ष केंद्रित करून चोरट्यांनी त्यांच्या घराचे लोखंडी गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश मिळवून त्यांच्या घरातील लोखंडी कपाटाचे लॉकर तोडून १.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे जुने वापरते १ डोरले कि.अं.५००० रु.व २३.४४० ग्रॅमच्या चांदीच्या तोरडया कि.अं.५५०० रु.असा एकूण ६० हजार ५०० रु.चा मुद्देमाल लंपास केला.एकाच रात्री झालेल्या या चोऱ्यांमुळे गावात एकच हल्लाकल्लोळ उडाला. घटनेची माहिती मिळताच मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले,पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण, स्कॉड विभागाचे अंमलदार छत्रपती करपते यांनी घटनास्थळाला भेट देऊन ६० हजार ५०० रुपयाचा माल चोरीला गेल्याची नोंद करून घटनास्थळावरील पुरावे संकलित करण्यात आले.

आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात येऊन अज्ञात चोरट्यांचा युद्धपातळीवर शोध सुरू आहे. या ठिकाणी फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले होते.या अगोदर शिरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अडगाव येथे सुद्धा एकाच रात्री चार घरफोड्या करून जवळपास एक लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केला होता.अज्ञात चोरट्यांजवळ टॉमीसारखे अवजार राहत असल्यामुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे.

# जोशी परिवाराची प्रज्ञा प्रबोधिनी संस्थेस एक लक्ष रूपयांची देणगी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीत अनेक वर्ष रहीवासी असलेल्या अलका जोशी यांनी त्यांचे दिवंगत पती सुधिरराव जोशी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रज्ञा प्रबोधिनी अमरावती संस्थेस पारधी समाजाचे सेवाकार्यासाठी एक लक्ष रूपयांची देणगी दिली.यापूर्वीही जोशी परिवाराने प्रज्ञा प्रबोधिनीस चांगले सहकार्य केले.देणगीचा धनादेश संस्थेचे सचिव मुकुंद पांडे यांनी स्विकारला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष अविनाश देशपांडे, उपाध्यक्ष मुकुंद देशपांडे,सह सचिव शुभांगी केसाळे, कोषाध्यक्ष जयंत खंदारकर, उमेश केसाळे , रेखा देशपांडे व वंदना पांडे हे उपस्थित होते.जोशी परिवाराचे आभार अध्यक्ष अविनाश देशपांडे यांनी मानलेत.



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २७७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# देशातील अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा मजबूत- खासदार डॉ. अनिल बोंडे

## -दर्यापुरात ‘विकसित भारत संकल्प संमेलना’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दर्यापूर :** ‘काँग्रेसची मानसिकता ही नेहमी अतिरेक्यांच्या बाजूची राहिली आहे. त्यामुळेच २०१४ पूर्वी देशात सातत्याने अतिरेकी हल्ले व्हायचे आणि आपले पोलीस व जवान शहीद होत होते. मात्र, नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हातात घेतल्यावर परिस्थिती पूर्णपणे बदलली. गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वात ‘अतिरेकी दिसला की ठोकून काढा’ आणि त्यांना कडक शासन करा, हे आक्रमक धोरण राबवले गेले. यामुळेच आज देशातील अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा कमालीची मजबूत झाली असून नक्षलवादाचे समूळ उच्चाटन होण्याच्या दिशेने देशाची वाटचाल सुरू आहे,’ असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते आणि खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले.

येथील कृषी भवन येथे भारतीय जनता पार्टीतर्फे आयोजित ‘विकसित भारत संकल्प संमेलना’त पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रदेश संयोजक दिनेश सूर्यवंशी, शिवराय कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष प्रभूदास भिलावेकर, आमदार प्रवीण तायडे, माजी आमदार सुधीर रसे, माजी आमदार रमेश बुंदिले, बाळासाहबे हिंगणीकर, बाबाराव बरवट, बाळासाहेब वानखडे, नगराध्यक्ष अविनाश गायगोले, नगराध्यक्ष रूपाली माथने, उपनगराध्यक्ष प्रियंका मालठाने, मदन बायस्कार, नकुल सोनटक्के, मेघा भारती, स्वप्नील गावंडे, सलीम घानीवाले, अमोल वाडी, विजय मेंढे, सुधीर गोळे, अनिल कुंडलवाल, अप्पा पाटील, तुषार खेरडे, माधव अवघड, सबुलाल दहीकर, दीपक दौलतानी, पद्माकर सांगोले, माणिक मानकर यांच्यासह भाजपचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी आणि नगराध्यक्ष प्रामुख्याने उपस्थित होते.

**मोदी सरकारच्या १२ वर्षांतील ऐतिहासिक कामगिरी-**



खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १२ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळातील केंद्र सरकारच्या महत्त्वाच्या उपलब्धींवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, गेल्या १२ वर्षांत देशात रस्ते, वीज, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि हवाई मार्गांचा अभूतपूर्व विकास झाला आहे. ‘सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण’ या त्रिसूत्रीवर आधारित केंद्र सरकारच्या योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचल्या आहेत.

**पश्चिम बंगालमधील गुंडागर्दी मोडून काढली-**

पश्चिम बंगालच्या परिस्थितीवर बोलताना खासदार बोंडे म्हणाले, ’ममता बॅनर्जीच्या राजवटीत पश्चिम बंगालचे विभाजन होते की काय, अशी गंभीर स्थिती निर्माण झाली होती. मात्र, तृणमूल काँग्रेसची गुंडागर्दी मोडून काढण्यात पंतप्रधानांना यश आले आहे. तिथे आता अवैध कामांवर आणि गुन्हेगारांवर बुलडोझर चालत असून ही सामान्य जनतेच्या मताची खरी ताकद आहे.’

**महिला सक्षमीकरण आणि युवा विकास-**

केंद्र सरकारच्या महिला सक्षमीकरणाच्या धोरणाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, आज देशाच्या सैन्य दलात तब्बल ६६ हजार महिला अभिमानाने काम करत आहेत. देशातील तरुण आणि महिला वर्गाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी अहोरात्र काम करत असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. या संमेलनाला दर्यापूर परिसरातील भाजप पदाधिकारी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन विजय मेंढे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सरचिटणीस गोपाल चंदन यांनी मानले.

**प्रशिक्षण हेच प्रभावी माध्यम : जिल्हाध्यक्ष भिलावेकर**

विकसित भारत संकल्प संमेलनाच्या यशस्वीतेसाठी भाजप जिल्हाध्यक्ष प्रभूदास भिलावेकर यांनी संघटनात्मक बांधणीवर विशेष भर दिला. पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत केंद्र सरकारच्या योजना पोहोचवण्यासाठी हे अभियान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलताना भिलावेकर म्हणाले, ’पक्षाची विचारधारा आणि सरकारच्या लोककल्याणकारी योजना जनतेपर्यंत प्रभावीपणे मांडण्यासाठी कार्यकर्ता प्रशिक्षित असणे गरजेचे आहे. संघटनात्मक पातळीवरील प्रशिक्षण हे कार्यकर्त्याला अधिक सक्षम बनवते. आगामी काळातील आव्हाने पेलण्यासाठी आणि पक्षाची घोडदौड कायम राखण्यासाठी प्रत्येक स्तरावर प्रशिक्षण शिबिरे महत्त्वाची भूमिका बजावतील,’ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**2 BHK FLAT FOR SALE**
**भाग्य नगर**
**गणेडीवाल लेआउट**
**कॅम्प-अमरावती**
**-संपर्क-**
**9422190814**
**9518527395**

MAHAVITARAN
**e-TENDER NOTICE**

Separate e-Tenders are invited in two bid system from Registered, Licensed Electrical contractors, Suppliers, Manufacturers for the following works to be carried out

Work Contract for engaging outsource peon for O&M Circle Amravati against tender no. SE/AMT/CIRCLE/PEON/HR/26-27/T-04, The estimated cost of tender is Rs. 07.50 Lakhs.

- **Tender Fee Rs. 1000+ 18 % GST (Non-refundable).**
- Date of availability of Bid Documents on MSEDCL E-tendering Website http://works.mahadiscom.in/eTender/etender: **15.06.2026**
- **Last Date & Time for Submission of Bid: 24.06.2026 upto 23:55 Hrs.**

**For further details of Invitation for Bids & Bid Documents, please visit MSEDCL website** http://works.mahadiscom.in/eTender/etender.

**Superintending Engineer MSEDCL, O & M Circle Amravati**
**Email ID. seamravati2011@gmail.com**
Contact person Executive Engineer (Adm) Tel.No 0721-2663640
**PRO No.132**
**Superintending Engineer, O & M Circle, MSEDCL, Amravati**

**जाहीर नोटीस**

आम जनतेला सुचित करण्यात येते की, माझे **पक्षकार सुमित्रा बाळासाहेब जुनघरे, रा. बजरंग टेकडी, साहू बागजवळ, मनपा शाळा नं.२ जवळ, वि.म.वि. अमरावती** यांनी खालील वर्णनांकीत मालकीची शेतजमिन **बनराज विजय जयस्वाल, मु.कुरुम, मुर्तीजापुर, अकोला** यांचेकडून खरेदी करण्याचा सौदा केला आहे. सदर शेतजमिनीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :**-विद्यमान दुय्यम निबंधक मुर्तिजापुर कक्षेतील व जिल्हा परिषद अकोलाच्या हद्दीतील मौजे-कुरुम भाग-१, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला येथील शेत गट नं.९२, जुना शेत सर्व्हे नं.., भो.वर्ग-१ एकूण क्षेत्रफळ ६ हे. १६ आर यापैकी माझे मालकी व ताब्यातील क्षेत्र. १ हे.२१ आर, आकार रु.५.८९ पैसे, (फेरफार क्र.३६४२) शेतजमिन,

**या शेतजमिनीची चर्तुःसीमा येणेप्रमाणे -**
**पूर्वेस -रोड, पश्चिमेस - भिमराव तिडके यांचे शेत,**
**उत्तरेस- हरीभाऊ काळे यांचे शेत, दक्षिणेस - पंजाबराव बावनकर यांचे शेत.**

वरील नमूद मिळकत (शेतजमिन) माझे पक्षकार यांच्यासोबत खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे. तसेच सदरच्या मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क किंवा हितसंबंध अथवा कोणाचाही आक्षेप किंवा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास किंवा सदरची शेतजमिन कोणत्याही सरकारी प्रकल्पाअंतर्गत संपादीत झाली असल्यास किंवा सदर शेताच्या वहीवाट व रस्त्याबाबत काही आक्षेप असल्यास सदरचा जाहीरनामा प्रकाशित झाल्यापासुन ७दिवसांच्या आत किंवा खरेदीपुर्वी कागदपत्रांसह खालील पत्त्यावर संपर्क करावा. अन्यथा त्यानंतर कोणाचाही उजर चालणार नाही. करीता सदरचा जाहीरनामा.

अमरावती,
दिनांक १४/६/२०२६

**ॲड. एम.बी. तिडके**
**मो.नं.९३२६४४९२४९**

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**
**कि.दि.अ. क्र. १५०/२०२६** **नेता - ३०/०६/२०२६**

अर्जदारः **१) अब्दुल जमीर अब्दुल जमील (मुलगा)**वय-४२ व्यवसाय- मजुरी रा. नांदसावंगी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**२) जुनेद अहेमद जमील अहमद (मुलगा)**वय-३६ वर्ष व्यवसाय-मजुरी रा. नांदसावंगी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**३)सबिल अहेमद मोहम्मद जमील (मुलगा)** .वय-३४ वर्ष व्यवसाय -मजुरी रा. नाँदसावंगी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**४)नवेद अहेमद जमील अहमद (मुलगा)**वय- २४ वर्ष व्यवसाय - मजुरी रा. अलीम नगर, अमरावती ता. जि. अमरावती
**५) रोमना ताजमूल हुसेन अन्सारी (मुलगी)**.वय - ३९ व्यवसाय-गृहिणी रा.न्यू इस्लामपुरा भिवंडी दांडेकर वाडी जिल्हा ठाणे**(मुलगी)**वय -३८ व्यवसाय -गृहिणी रा- हरीपुरा, बुहानपूर मध्य प्रदेश
**७) फराना परवीन जमीद अहमद परवीन (मुलगी)**.वय ३६ वर्ष व्यवसाय-गृहिणी रा. नाँद सावंगी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**८)सुलताना परवीन आसिफ खान (मुलगी)** वय -३५ वर्ष व्यवसाय -गृहिणी रा. मोर्बिन पुरा दारव्हा ता. दारव्हा जि. यवतमाळ
**९)शबनम परविन शेख मतीन(मुलगी)** वय ३३ वर्ष व्यवसाय गृहिणी रा. लाल खडी अमरावती ता. जि. अमरावती
**१०)सानिया तबसूम मोहम्मद वसीम (मुलगी)** वय ३८ वर्ष व्यवसाय गृहिणी वा. उस्मानिया कॉलनी जुनी वस्ती बडनेरा ता. जि. अमरावती

**विरूद्ध- निरंक**

ज्याअर्थी, वरील नमूद अर्जदारांनी या न्यायालयात मुंबई अधिनियम (८) १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र एक ते दहा यांचे **वडील अब्दुल जमीन अब्दुल गणी** राहणार नांदसावंगी ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती हे दिनांक २५/०५/२००७ रोजी नाँदसावंगी येथे मरण पावले तसेच अर्जदार क्रमांक एक ते दहा यांच्या **आई ककसाणा बी मोहम्मद जमील** या राहणा नांदसावंगी ता. नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती दिनांक ०८/११/२०२५ रोजी नाँदसावंगी येथे मरण पावल्या. तसेच, अर्जदारांनी नमूद केल्याप्रमाणे मृतकांच्या पश्चात वरील अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असून त्यांना वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. म्हणून, या न्यायालयात जो कोणी व्यक्ती वरील वारस प्रमाणपत्र देण्यास हरकत घेऊ इच्छित असेल, त्याने आपल्या हरकती दिनांक ३००६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः हजर राहून किंवा योग्य वकिलामार्फत लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा, कोणतीही हरकत नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
सदर जाहीरनामा दिनांक ०८/०६/२०२६ रोजी दिला आहे.

**आदेशानुसार,**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,**
**नांदगाव खंडेश्वर**

# बापू-विनोबांच्या नावावर लोण्याचा डल्ला

## गोरस भांडारात तूप, दूध आणि पैशांचा कथित महाघोटाळा

## धाडीनंतरही १४ दिवस कुलूप, भेसळ की भ्रष्टाचार




**पिपरी (वर्धा)/दिलीप पिंपळे**
महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे आणि उद्योगपती जमनालाल बजाज यांच्या विचारातून उभी राहिलेली गोरस भांडार संस्था आता गंभीर आर्थिक आणि प्रशासकीय आरोपांच्या भोवऱ्यात अडकली आहे. तूप घोटाळा, नियमबाह्य नोकरभरती, दूध व्यवहारातील तफावत आणि आर्थिक गैरव्यवहारांच्या आरोपांमुळे आधीच चर्चेत असलेल्या या संस्थेवर आता भेसळीचेही सावट गडद झाले आहे.

अन्न व औषधी प्रशासन आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा येथील अन्न व औषधी प्रशासन विभागाने तब्बल १४ दिवसांपूर्वी गोरस भांडारावर धाड टाकली होती. मात्र एवढे दिवस उलटूनही गोरस भांडार अद्याप सुरू झालेले नाही. त्यामुळे नेमके आत काय शिजत आहे, भेसळ लपविण्याचा प्रयत्न सुरू आहे की भ्रष्टाचाराची प्रकरणे दडपण्याचा खेळ असा प्रश्न आता नागरिक आणि सभासद विचारत आहेत.

दरम्यान, संस्थेच्या लेखापरीक्षण अहवालात तब्बल ९६२ किलो गावठी तूप खराब झाल्याने नष्ट करण्यात आल्याचा उल्लेख समोर आल्याने खळबळ उडाली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणातील तूप खरोखर खराब झाले होते की परस्पर विकून टाकण्यात आले, याबाबत संशयाचे ढग अधिक गडद झाले आहेत. गोपालकाच्या टाळूवरचं लोणी कुणी खाल्लं हा प्रश्न आता गावागावात चर्चेचा विषय ठरत आहे.वेळीच विक्री न करणे, चुकीची साठवणूक, व्यवस्थापनातील बेजबाबदारपणा आणि अंतर्गत नियंत्रणाचा पूर्ण अभाव यामुळे संस्थेला ५ लाख ७७ हजार ३२० रुपयांचा आर्थिक फटका बसल्याचे समोर आले आहे. त्यातच आधीपासून असलेला ८० लाखांचा संचित तोटा पाहता संस्थेची आर्थिक अवस्था पूर्णपणे डबघाईला गेल्याचे चित्र आहे.

विशेष म्हणजे विविध आर्थिक व्यवहारांमध्ये एकूण १ कोटी १३ लाख ७७ हजार ८० रुपयांचे नुकसान झाल्याचे लेखापरीक्षणात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणासाठी माजी अध्यक्ष, विद्यमान अध्यक्ष, संचालक मंडळ आणि व्यवस्थापक यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याकडून वसुली करण्याची मागणी आता जोर धरत आहे.ऑडिट अहवालात नियमबाह्य नोकरभरती, सेवा नियमांचे उल्लंघन, संचालक मंडळाच्या मंजुरीशिवाय खरेदी व्यवहार आणि आर्थिक नियमांचे उल्लंघन अशा अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत. काही संचालकांच्या नातेवाईकांनाच नोकऱ्या देण्यात आल्याचे आरोप होत असून, अल्प पगारावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे महागड्या गाड्या आणि बंगले कसे आले, याबाबतही संशय व्यक्त केला जात आहे.

दुधाच्या व्यवहारातही मोठी तफावत असल्याचे बोलले जात आहे. शेतकऱ्यांकडून कमी दराने दूध खरेदी करून ग्राहकांना महागात विक्री केली जात असल्याचा आरोप होत आहे. पूर्वी दुधाच्या कॅनला कुलूप लावून भेसळ रोखली जात होती, मात्र आता ही व्यवस्था बंद पडल्याने दुधाच्या शुद्धतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.बापू आणि विनोबांच्या विचारांची पताका फडकवणाऱ्या संस्थेत आज भेसळ, भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारांचे आरोप होत असल्याने सहकार क्षेत्राची प्रतिमा मलीन झाली आहे. संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता नागरिक, शेतकरी आणि सभासदांकडून केली जात आहे.

# पांढरपेशी टोळीच्या रडारवर आर्वीची कोट्यवधींची जमीन

## नगरपरिषदेची जागा गिळंकृत करण्याचा प्रयत्न; दिलीप पोटफोडे यांचा आरोप

**आर्वी/जनमाध्यम**
शहरातील नगरपरिषदेच्या मालकीच्या कोट्यवधी रुपये किमतीच्या जागेवर पांढरपेशी भूमाफिया टोळीने अवैधरित्या कब्जा करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आर्वी विधानसभा अध्यक्ष दिलीप पोटफोडे यांनी केला आहे. गांधी विद्यालयाजवळील गेटलगत असलेल्या नगरपरिषदेच्या जागेवर अनधिकृत बांधकाम सुरू असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

९ जून रोजी दिलीप पोटफोडे यांनी घटनास्थळी धाव घेत प्रत्यक्ष पाहणी केली असता काही मजूर बांधकाम करताना आढळले. चौकशीदरम्यान त्यांनी आर्वीतील काही व्यावसायिकांची नावे सांगितल्याचे समोर आले. संबंधित जमीन नगरपरिषदेकडून लीज अथवा भाडेतत्त्वावर देण्यात आली आहे काय, याची विचारणा करण्यात आली असता कोणतीही अधिकृत परवानगी नसल्याचे स्पष्ट झाले.याबाबत तातडीने



मुख्याधिकारी डॉ. किरण सुक्कलवाड तसेच बांधकाम विभागाला माहिती देण्यात आली. मुख्याधिकारी डॉ. सुक्कलवाड यांनी तत्परता दाखवत नगरपरिषदेच्या पथकासह घटनास्थळी भेट देऊन सुरू असलेले अतिक्रमण थांबवले. तसेच संबंधितांना नोटीस बजावण्याच्या सूचना देण्यात आल्या.

दरम्यान, वर्धा येथे मोर्चासाठी जात असताना दिलीप पोटफोडे यांना एका डॉक्टर व्यवसायातील व्यक्तीकडून धमकीवजा फोन आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणापासून दूर राहा, असा इशारा देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या संभाषणातून शहरातील प्रभावशाली व्यक्तींची टोळी भूमाफियांच्या कारवायांमध्ये सक्रिय असल्याचा संशय अधिक गडद झाल्याचा दावा त्यांनी केला.पैसा, राजकीय ताकद, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि राजाश्रय यांच्या बळावर शहरातील मोक्याच्या जागा गिळंकृत करण्याचा डाव सुरू आहे. विरोध करणाऱ्यांना जीवितहानीच्या धमक्या दिल्या जात आहेत, असा गंभीर आरोप राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी केला.या प्रकरणी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी वर्धा तसेच विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर येथे निवेदन देण्यात आले असून तात्काळ अतिक्रमण हटवून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.आर्वी विधानसभा मतदारसंघाचे आमदार यांनाही निवेदनाची प्रत पाठविण्यात आली आहे.प्रशासनाने त्वरित कारवाई न केल्यास उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे.



# चाय पे चर्चा त रमले खा.अमर काळे

## सामान्यांच्या हाकेला धावून जाणारा लोकनेता; चहाच्या टपरीवर रंगल्या दिलखुलास गप्पा

**वर्धा/जनमाध्यम**
वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे हे जिल्हा दौऱ्यावर असताना अचानक एका साध्या चहाच्या हॉटेलवर थांबले आणि मग सुरू झाली चाय पे चर्चा. कोणताही बडेजाव नाही, पदाचा रुबाब नाही, तर सर्वसामान्यांमध्ये मिसळून त्यांच्या सुख-दुःखाच्या गप्पांमध्ये रमलेले खासदार पाहून नागरिकांनाही सुखद धक्का बसला. राजकारणात मोठे पद मिळाल्यानंतर अनेक लोकप्रतिनिधी जनतेपासून दूर जातात, मात्र खासदार अमर काळे हे त्याला अपवाद ठरत आहेत. सामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेण्यासाठी ते सहजपणे लोकांमध्ये मिसळतात. चहाच्या कपासोबत सुरू झालेल्या चर्चेत परिसरातील समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी, रस्ते, पाणी यांसारख्या विषयांवर नागरिकांनी मनमोकळेपणाने संवाद साधला.खासदारकीच्या पदाचा कुठलाही दिखावा न करता आपल्यातलाच माणूस अशी भावना निर्माण करणारे अमर काळे यांच्या साधेपणाची उपस्थितांनी प्रशंसा केली. शांत, संयमी आणि प्रसंगी जनतेसाठी आक्रमक भूमिका घेणारा नेता म्हणून त्यांची ओळख अधिक ठळक होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.सहज उपलब्ध होणारे, आपुलकीने संवाद साधणारे आणि लोकांच्या प्रश्नांवर तत्परतेने दखल घेणारे खासदार म्हणून अमर काळे यांची प्रतिमा दिवसेंदिवस अधिक मजबूत होत असल्याचे चित्र या चाय पे चर्चा मधून पाहायला मिळाले.

# खड्डे भरले नाहीत, पण रेलिंगसाठी ८ कोटी

## जनतेच्या पैशांची उधळपट्टी थांबवा; खा.अमर काळे यांचा सरकारला इशारा

**वर्धा/जनमाध्यम**
राज्याची आर्थिक परिस्थिती गंभीर असताना प्रशासनाने अनावश्यक सौंदर्यीकरणाच्या कामांवर कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करू नये, असा थेट इशारा खा.अमर काळे यांनी दिला आहे. हिंगणी-सेलू-सुकळी राज्य महामार्गावरील दुभाजकावर स्टील रेलिंग, पेव्हिंग ब्लॉक आणि सौंदर्यीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने काढलेल्या तब्बल आठ कोटी रुपयांच्या निविदांवर त्यांनी तीव्र आक्षेप घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या कामाला तात्काळ स्थगिती देण्याची मागणी केली आहे.

१२ जून रोजी प्रसिद्ध झालेल्या निविदेनुसार राज्य महामार्ग ३२१ वरील दुभाजकावर स्टील रेलिंग, पेव्हिंग ब्लॉक व सौंदर्यीकरणाची कामे प्रस्तावित आहेत. मात्र, राज्यात आर्थिक टंचाईचे संकट असताना अशा कामांवर खर्च करणे म्हणजे जनतेच्या पैशांचा अपव्यय असल्याचे खासदार काळे यांनी म्हटले आहे.लाडकी बहीण योजनेचे पैसे केवायसीच्या नावाखाली थांबवले जात आहेत, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रखडल्या आहेत, संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजना, बालसंगोपनाचे मानधन प्रलंबित आहे. घरकुलाचे हप्ते, शेतकऱ्यांच्या सिंचन विहिरींचे अनुदान, अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहिरींची मदत, जलजीवन मिशनच्या कंत्राटदारांची देयके आणि सार्वजनिक बांधकाम विभागाची हजारो कोटींची बिले निधीअभावी अडकून पडली आहेत. अशा परिस्थितीत प्रशासनाने सौंदर्यीकरणासाठी कोट्यवधी खर्च करणे संतापजनक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.आरोग्य यंत्रणेची दयनीय अवस्था मांडताना खासदार काळे म्हणाले की, ग्रामीण भागातील रुग्णवाहिकांमध्ये डिझेल भरण्यासाठीही शासनाकडे निधी नाही. अतितातडीच्या प्रसंगी रुग्णांच्या नातेवाईकांनाच डिझेलसाठी पैसे भरावे लागत आहेत. अशा वेळी प्रशासनाने दिखाऊ कामांऐवजी लोकांच्या मूलभूत गरजांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जिल्ह्यात अजूनही अनेक गावांना चांगले रस्ते नाहीत, पुलांच्या अभावामुळे पावसाळ्यात वाहतूक ठप्प होते, जिल्हा परिषद शाळा दुरुस्तीअभावी ओस पडत आहेत. शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांसाठी निधी नसल्याचे सांगितले जाते, पण दुसरीकडे रेलिंग व पेव्हिंग ब्लॉकसाठी कोट्यवधींच्या निविदा काढल्या जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.या पार्श्वभूमीवर खा.अमर काळे यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून या अनावश्यक कामांना तातडीने स्थगिती देण्याची मागणी केली आहे. जनतेकडून कराच्या रुपाने जमा झालेला पैसा खऱ्या अर्थाने आवश्यक आणि लोकहिताच्या कामांसाठीच खर्च झाला पाहिजे. प्रशासनातील अधिकाऱ्यांनीही विवेकाने निर्णय घेत जनतेच्या पैशांचा योग्य विनियोग करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# कोटेश्वर तीर्थक्षेत्री चोरट्यांचा डल्ला

**देवळी-**अधिकमासनिमित्त तीर्थक्षेत्र कोटेश्वर येथे दर्शन व स्नानासाठी गेलेल्या महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्यांनी तब्बल २ लाख ३३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास केल्याची घटना घडली.अश्विनी दुभापीवर (५३) रा. बल्लारपूर, जि. चंद्रपूर या मैत्रिणीसह कोटेश्वर येथे दर्शनासाठी आल्या होत्या. नदीमध्ये स्नान करून दर्शन घेत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पर्समधील सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले.घटना लक्षात येताच त्यांनी देवळी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

# वणा नदीतून वाळूचा काळाबाजार

## ट्रॅक्टरसह वाळू जप्त

**समुद्रपूर-**वणा नदीतून अवैधरित्या वाळूची वाहतूक करून साठवणूक करण्यात येत असल्याची माहिती मिळताच समुद्रपूर पोलिसांनी मांडवकर ले-आऊट परिसरात धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत ट्रॅक्टर, वाळू असा एकूण १३ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.समुद्रपूर पोलिस गस्तीवर असताना मांडवकर ले-आऊटमधील मोकळ्या जागेवर वणा नदीतील वाळू साठवून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला असता विना क्रमांकाच्या ट्रॅक्टरमधून मिथून कुसराम (३०) रा. समुद्रपूर हा वाळू खाली करताना आढळून आला.पोलिसांनी त्याला ताब्यात घेत ट्रॅक्टर व वाळूसह एकूण १३ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# आष्टीत अभाविपतर्फे विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात

**आष्टी शहीद/जनमाध्यम**
अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) आष्टी नगरच्या वतीने श्री समर्थ वाचनालय येथे आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करून त्यांच्या मेहनतीचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक निलेश भिलावे उपस्थित होते. तर प्रमुख वक्ते म्हणून अभाविप वर्धा विभाग संघटनमंत्री नयन सोलंकी यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी, राष्ट्रभक्ती आणि नेतृत्वगुण जोपासून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडवावे, असे आवाहन केले.कार्यक्रमाला अभाविप आष्टी नगरमंत्री गुरुदेव निर्मले, नगरसहमंत्री लेखराज हिरुडकर, आर्वी नगर विद्यार्थी विस्तारक हर्ष वानखडे, अर्पिता सोनवणे तसेच अनिरुद्ध ढोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शहरातील विविध विद्यालये आणि महाविद्यालयांतील विद्यार्थी, पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार होताच सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालकांमध्येही समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस प्रेरणा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन अभाविप आष्टी नगरच्या कार्यकर्त्यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# व्हॉईस ऑफ मीडियाच्या विदर्भ विभागप्रमुखपदी अनुपकुमार भार्गव

**वर्धा/जनमाध्यम**
पत्रकारांच्या हक्कांसाठी व विविध समस्यांच्या निराकरणासाठी कार्यरत असलेल्या व्हॉईस ऑफ मीडिया महाराष्ट्र (साप्ताहिक विंग)च्या विदर्भ विभागप्रमुखपदी अनुपकुमार जगदीशमोहन भार्गव यांची एकमताने निवड करण्यात आली.संघटनेच्या वतीने जारी करण्यात आलेल्या नियुक्तीपत्राद्वारे ही घोषणा करण्यात आली.



संघटनेने भार्गव यांच्यावर विदर्भातील संघटनात्मक जबाबदारी सोपविताना त्यांच्या नेतृत्वाखाली पत्रकार संघटना अधिक सक्षम व प्रभावी होईल,असा विश्वास व्यक्त केला आहे. पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर संघटितपणे आवाज उठवून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी ते सक्रिय भूमिका बजावतील, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.या निवडीबद्दल संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय मार्गदर्शक विनोद बोरे, कार्याध्यक्ष अब्दुल करयुम, प्रदेश सरचिटणीस वामन पाठक यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी भार्गव यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या निवडीमुळे विदर्भातील पत्रकारांना अधिक सक्षम व्यासपीठ उपलब्ध होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## भीमाशंकर तीर्थक्षेत्राचा कायापालट होणार

# पुढील वर्षी कुंभमेळ्यापूर्वी ९० टक्के काम पूर्ण करू-मुख्यमंत्री

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चावीच्या दगडाची विधीवत पूजा आणि ब्रह्मध्वजारोहण

**पुणे/जनमाध्यम**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भीमाशंकर येथील मुख्य मंदिरासमोर नव्याने बांधण्यात आलेल्या सभामंडपाच्या चावीच्या दगडाची विधिवत पूजा तसेच ब्रह्मध्वजारोहण करण्यात आले. यानंतर त्यांनी श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे सुरू असलेल्या मंदिर परिसर विकास आणि हेरिटेज वाडी प्रकल्पाची केली.यावेळी त्यांनी कामाची गती गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त केले. पुढील वर्षी कुंभमेळा सुरू होण्यापूर्वी या प्रकल्पातील सुमारे ९० टक्के काम पूर्ण होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

यावेळी आ.दिलीप वळसे-पाटील , बाबाजी काळे काळे , जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मंदिराचे विश्वस्त आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.कमी कालावधीत उत्कृष्ट दर्जाचे काम केल्याबद्दल जिल्हा प्रशासनाचे कौतुक करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भीमाशंकर ज्योतिर्लिंगाला देशभरात मोठी मान्यता असून या तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू करण्यात आलेल्या प्रकल्पात मूळ मंदिराचा सभामंडप, त्याचा जीर्णोद्धार आणि परिसर विकासाची कामे



अतिशय वेगाने सुरू आहेत. मंदिर परिसर विकासाच्या माध्यमातून भीमाशंकरचे संपूर्ण रूप पालटणार आहे. यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. स्थानिक ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्याचा त्यांनी विशेष उल्लेख केला.

हेरिटेज वाडी प्रकल्पाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, सुमारे दीडशे घरे नव्या ठिकाणी स्थलांतरित होत असून या नागरिकांसाठी शेजारीच आधुनिक सुविधांनी युक्त नवीन गाव उभारण्यात येत आहे. हे गाव केवळ पुनर्वसनापुरते मर्यादित राहणार नसून तेथील अर्थव्यवस्थेलाही नवी दिशा मिळेल, असे त्यांनी सांगितले.परिसरातील वाहतूक व्यवस्थेबाबतही महत्त्वपूर्ण नियोजन करण्यात आले आहे. जाण्यासाठी आणि येण्यासाठी स्वतंत्र रस्ते तयार केले जात असून त्यामुळे वाहतूक कोंडी होणार नाही. ज्येष्ठ नागरिकांच्या सुविधेसाठी इलेक्ट्रिक वाहनांची व्यवस्था करण्यात येणार आहे. दुकाने, बसस्थानक आणि इतर सार्वजनिक सुविधा सुव्यवस्थित पद्धतीने विकसित केल्या जात असून भाविक आणि स्थानिक व्यावसायिक या दोघांच्याही हिताचा विचार करण्यात आल्याचे फडणवीस यांनी नमुद केले.या सर्व विकासकामांमुळे भविष्यात भीमाशंकर येथे येणाऱ्या भाविकांची संख्या पाच ते दहा पट वाढेल, असा विश्वास व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी कामाबाबत समाधान व्यक्त केले.

# भरधाव कारची दुचाकीला धडक; नालवाडीतील इसम जखमी

**वर्धा-**भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना राऊतवाडी-नालवाडी परिसरात घडली. या अपघातात अशोक बेलखडे (५४) रा. नालवाडी हे जखमी झाले.अशोक बेलखडे हे एमएच ३२ एल ५०५९ क्रमांकाच्या दुचाकीने जात असताना नितीन खातदेव हा एमएच ३२ एएस ७६२९ क्रमांकाच्या कारने भरधाव वेगात येत होता. वळणावर नियंत्रण सुटल्याने कारने दुचाकीला धडक दिली.या अपघातात बेलखडे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तक्रारीवरून रामनगर पोलिसांनी गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १९८**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# घुग्गूसचा कुख्यात शाहरुख ऊर्फ 'फावडा' देशी कट्ट्यासह अटक

## शिरपूर पोलीसांची धडक कारवाई

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. १४ : यवतमाळ जिल्ह्यात अवैध शस्त्रास्त्रांचा वापर आणि तस्करी रोखण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत शिरपूर पोलिसांनी धडक कारवाई करत घुगुस येथील कुख्यात आरोपी शाहरुख उर्फ फावडा गुलशेर खान (वय ३१) याला गावठी बनावटीच्या देशी पिस्तुलासह अटक केली. आरोपीकडून एक देशी कट्टा व दोन जिवंत काडतुसे असा एकूण ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**






पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध शस्त्रास्त्रांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शिरपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार संतोष मनवर यांनी आपल्या पथकाला गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. दि. १३ जून २०२६ रोजी रात्री सुमारे ९.४५ वाजता शाहरुख उर्फ फावडा हा मुंगोली खदान परिसरात चोरीच्या उद्देशाने देशी कट्टा बाळगून फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.या माहितीच्या आधारे पोलिसांनी मुंगोली-वर्धा नदी पुलाजवळ सापळा रचला. संशयास्पद हालचाली करत असलेल्या आरोपीला पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता कमरेला खोचलेला गावठी बनावटीचा देशी कट्टा (किंमत ५० हजार रुपये) आणि दोन जिवंत काडतुसे (किंमत २ हजार रुपये) आढळून आली. पोलिसांनी तत्काळ शस्त्र व काडतुसे जप्त करून आरोपीला अटक केली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध शस्त्र अधिनियम कलम ३/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ व १२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही यशस्वी कारवाई शिरपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार संतोष मनवर,पोलीस उपनिरीक्षक धीरज गुल्हाने,पोहेकॉ सुनिल दुबे,पोहवा अविनाश बानकर, पोहवा इकबाल शेख,पोलीस कॉन्स्टेबल पंकज कुडमेथे, दिपक वाकडे,किरण दासरवार आणि प्रफुल नाईक यांनी पार पाडली. अवैध शस्त्रास्त्रांविरोधात शिरपूर पोलिसांनी केलेल्या या निर्णायक कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तींना मोठा आळा बसण्यास मदत होणार असून नागरिकांनी पोलिसांच्या कार्याचे स्वागत केले आहे.

# पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळा..! बेकायदेशीर पाणी उपसा रोखा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १४ :** राज्यात संभाव्य एल-निनो परिस्थिती आणि कमी पर्जन्यमानाची शक्यता लक्षात घेता महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने १३ जून २०२६ रोजी सुधारित परिपत्रक जारी केले असून, जिल्ह्यातील नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




शासनाने ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत नागरिकांना अखंडित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिका, नगरपंचायत आणि जलसंपदा विभागाला आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. धरणे आणि जलाशयांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घेऊन पिण्याच्या पाण्यास प्राधान्य देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सुधारित परिपत्रकानुसार सिंचनासाठी प्रस्तावित किंवा सुरू असलेल्या पाण्याच्या आवर्तनांवर आवश्यकतेनुसार निर्बंध आणले जाणार असून, पिण्याच्या पाण्यासाठी राखीव साठ्याचा अन्य कारणांसाठी वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच नदी, नाले, तलाव आणि जलाशयांमधून होणारा अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. महसूल, पोलीस आणि जलसंपदा विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत नियमित तपासणी करून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना पाण्याचा जपून वापर करण्याचे, नळ सुरू ठेवून पाणी वाया घालवू नये, वाहन धुणे, अंगण धुणे व अन्य अनावश्यक कारणांसाठी पिण्याचे पाणी वापरणे टाळावे, तसेच बेकायदेशीर पाणी उपसा आढळल्यास त्वरित प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन केले आहे.पाणी ही सामूहिक संपत्ती असून प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. नागरिकांच्या सहकार्यामुळेच संभाव्य पाणीटंचाईवर मात करता येईल," असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# "मोदी सरकारच्या कृषी धोरणांमुळे शेतकरी आर्थिक कोंडीत..!

## दिशाभूल थांबवा" – मनीष जाधव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १३ :** केंद्रातील मोदी सरकारच्या गेल्या बारा वर्षांच्या कारकीर्दीत राबविण्यात आलेल्या कृषी धोरणांमुळे देशातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने दिलेली अनेक आश्वासने अद्याप अपूर्ण आहेत, असा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेश प्रवक्ते तथा शेतकरी नेते मनीष जाधव यांनी केला आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बारा वर्षांच्या कार्याचा गौरव केला. यावर प्रतिक्रिया देताना जाधव यांनी सांगितले की, २०१४ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील दाभडी येथे झालेल्या 'चाय पे चर्चा' कार्यक्रमात शेतकऱ्यांना स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करणे, उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा देणारा हमीभाव आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासह अनेक आश्वासने देण्यात आली होती. मात्र, या आश्वासनांची अपेक्षित अंमलबजावणी झालेली नाही. त्यांनी दावा केला की, किमान आधारभूत किंमत (एमएसपी), नाफेड आणि सीसीआयच्या खरेदी प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांना पूर्ण लाभ मिळत नाही. तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील बदल, रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या वाढत्या किमती, तसेच आयात-निर्यातीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढला आहे.तीन कृषी कायद्यांविरोधातील आंदोलनाचा उल्लेख करताना जाधव यांनी शेतकरी आंदोलनातील मृत्यूंचा संदर्भ देत सरकारच्या धोरणांवर टीका केली. शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाणही चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यातील कर्जमाफी योजनांमध्ये कठोर निकष लावल्यामुळे अनेक शेतकरी लाभापासून वंचित राहिल्याचा आरोप करत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांची दिशाभूल न करता त्यांच्या मूलभूत प्रश्नांवर ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मनीष जाधव यांनी केली.

# सोन्याची अंगठी लुटणारे दोन आरोपी २४ तासांत जेरबंद..! १.१३ लाखांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १४ :** पांढरकवडा रोडवरील 'चाचा का ढाबा' परिसरात शेतात काम करत असलेल्या शेतकऱ्यावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करून सोन्याची अंगठी लुटणाऱ्या दोन अज्ञात आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांत अटक करत १ लाख १३ हजार ४४० रुपयांचा १०० टक्के मुद्देमाल हस्तगत केला आहे. शनिवारी दुपारी सुनील महादेव पाली (५५, रा. चाचा का ढाबा, यवतमाळ) हे शेतात असताना दोन हल्लेखोरांनी त्यांच्यावर कोयत्याने वार करून जखमी केले आणि त्यांच्या बोटातील सुमारे सात ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी हिसकावून पळ काढला.



याप्रकरणी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे सतीश उर्फ शेंबड्या उर्फ मुंगश्या बाबाराव मडावी (२५) व शेख समीर उर्फ छोटया शेख इसराईल (२२) यांना ताब्यात घेतले. चौकशीत दोघांनी लुटमारीसह त्याच दिवशी पांढरकवडा रोडवरील शेतातून ५ एचपी पाण्याची मोटार चोरी केल्याची कबुली दिली.आरोपींकडून १ लाख ७ हजार ४४० रुपयांची सोन्याची अंगठी व ६ हजार रुपयांची पाण्याची मोटार असा एकूण १.१३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी सतीश मडावी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी एमपीडीअंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई झालेली आहे. पुढील तपास यवतमाळ शहर पोलीस करीत आहेत.

## थोडक्यात

### हॉटेल अतिथी संचालकाच्या मुलाचा तलावात डुबुन मृत्यू.!

**पुसद:** येथिल पुसद-माहूर टी पॉइंट जवळ असलेल्या अतिथी हॉटेलचे संचालक तथा नविन पुसद येथे वास्तव्यास असलेले जयस्वाल यांचा मुलगा नामे अंश वय १८ वर्षे अंदाजे हा आज दिनांक १३ जून २०२६ रोजी मानोरा तालुक्यातील फुलउमरी येथील तलावामध्ये पोहण्यासाठी काही मित्रा सोबत गेला होता. त्या ठिकाणी तो पाण्यात पोहतांना त्याला पाण्याचा अंदाज न लागता खोल पाण्यात गेल्यामुळे तो नंतर वर आलाच नाही.यामध्ये त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला,या दुर्दैवी घटनेची माहिती मानोरा पोलीस स्टेशन येथे होताच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळ गाठून, शोधा शोध मोहीम सुरू केली व अथक प्रयत्नानंतर अंश याचा मृतदेहास बाहेर काढण्यात आले. दुपारी अंदाजे २ ते ३ वाजताच्या सुमारास त्याच्यावर मानोरा येथे शवविच्छेदन करण्यात आले.पुढील तपास मानोरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार व पोलीस कर्मचारी हे करीत आहे.



### पाण्याचे नियोजन आणि पीक पद्धतीत बदलाशिवाय शेतीचे भवितव्य धोक्यात..!


**भाम येथे शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचा मंत्र**

**राळेगाव :** बदलते हवामान, घटती जमिनीची सुपीकता आणि वाढते पाणी संकट लक्षात घेता पाणी व्यवस्थापन व पीक पद्धतीत बदल ही काळाची गरज असल्याचा सूर भाम येथे आयोजित मार्गदर्शन कार्यशाळेत उमटला. "पाणी वापर संस्था" यांच्या वतीने ज्ञानसाधना शिक्षण संस्था, यवतमाळ व पाटबंधारे विभागाच्या संयुक्त विद्यमाने लाभधारक शेतकऱ्यांसाठी ही कार्यशाळा घेण्यात आली. प्रशिक्षक प्रीती थुल यांनी पाणी वापर संस्था बळकट करण्यासाठी शेतकऱ्यांच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रकल्प संचालक मेघावत यांनी पाणी वापर संस्था ही केवळ पाणी वाटप करणारी यंत्रणा नसून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविणारी प्रभावी व्यवस्था असल्याचे सांगत समितीच्या जबाबदाऱ्यांवर मार्गदर्शन केले.

कृषी मार्गदर्शक प्रदीप भगत यांनी रासायनिक शेतीमुळे जमिनीचे होत असलेले नुकसान, घटणारा सेंद्रिय कर्ब आणि भविष्यातील शेतीसमोरील संकटांवर भाष्य केले. हळद, मोरिंगा आणि चिया सीड्स यांसारख्या पर्यायी व निर्यातक्षम पिकांची माहिती देत शेतकऱ्यांनी बाजारपेठेच्या मागणीनुसार पीक पद्धतीत बदल करण्याचे आवाहन केले. कार्यशाळेत महिला बचत गटांच्या सदस्यांसह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये पाणी व्यवस्थापन, सेंद्रिय शेती आणि शाश्वत शेतीविषयी जागरूकता निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### धरणातील गाळ म्हणजे शेतकऱ्यांसाठी सोनं..! – मंत्री संजय राठोड

**यवतमाळ :** राज्यातील घटती भूजल पातळी, पाण्याचे वाढते संकट आणि शेतीसमोरील आव्हाने लक्षात घेता पावसाचे पाणी अडवणे आणि जमिनीत मुरवणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले. "गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार" ही योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत असून धरणातील गाळ म्हणजे शेतकऱ्यांसाठी सोन्या प्रमाणे मौल्यवान नैसर्गिक खत असल्याचे त्यांनी सांगितले. मंत्री राठोड म्हणाले की, राज्यातील अनेक तलाव, बंधारे आणि धरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचला आहे. हा गाळ काढून शेतात टाकल्यास दुहेरी लाभ होतो. धरणांची पाणी साठवण क्षमता वाढते आणि अधिक काळ पाणी उपलब्ध राहते. दुसरीकडे, शेतजमिनीची सुपीकता वाढून उत्पादनात वाढ होते. राज्य शासनाने जलसंधारणासाठी स्वतंत्र मृद व जलसंधारण विभाग स्थापन केला असून, राज्यभर नाल्यांचे खोलीकरण-रुंदीकरण, लहान बंधारे उभारणे आणि पाणी अडविण्याची विविध कामे सुरू आहेत. मात्र, ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक गाव आणि प्रत्येक शेतकऱ्याने या मोहिमेत सक्रिय सहभाग घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



आज पाणी आणि माती वाचवली, तर उद्याची पिढी सुरक्षित राहील. पर्यावरण संवर्धन आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी जलसंधारण हा एकमेव प्रभावी मार्ग आहे.असे आवाहन मंत्री संजय राठोड यांनी केले.

# फ्री ची हवा गायब, ग्राहकांचे हक्कही 'हवेत'..!

## पेट्रोल पंप चालकांची मनमानी, प्रशासनाची झोप कायम!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ विवेक वानखडे

**यवतमाळ, दि. १४ :** जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर वाहनधारकांसाठी अनिवार्य असलेल्या मोफत हवा, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि प्रसाधनगृहाच्या सुविधा गायब झाल्याचे चित्र समोर आले आहे. शासनाच्या स्पष्ट नियमांची पायमल्ली करत पेट्रोल पंप चालकांनी खर्च कपातीच्या नावाखाली ग्राहकांच्या मूलभूत हक्कांवरच गदा आणल्याचा आरोप होत आहे.




विशेष म्हणजे प्रशासनाकडूनही या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याने वाहनधारकांमध्ये तीव्र नाराजी आहे. जिल्ह्यात शहर व तालुक्यांमध्ये शंभराच्या जवळपास पेट्रोल पंप कार्यरत आहेत. नियमानुसार प्रत्येक पंपावर हवा भरण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी, स्वच्छ पाणी व प्रसाधनगृहाची सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक ठिकाणी 'हवा मशीन बंद आहे' असे फलक लावलेले दिसतात, तर काही ठिकाणी मशीन सुरू असूनही कर्मचारी उपलब्ध नसतात. त्यामुळे वाहना मधील टायरचा दाब योग्य न राहून अपघातांचा धोका वाढत असल्याची तक्रार वाहनधारकांनी केली आहे. दरम्यान, मनुष्यबळ कमी करून एकाच कर्मचाऱ्याकडून अनेक कामे करून घेतली जात असल्याने बेरोजगारांच्या रोजगार संधीही कमी होत आहेत. पेट्रोल-डिझेलच्या दरामध्ये ग्राहक सुविधांचा खर्च समाविष्ट असतानाही ग्राहकांना हक्काच्या सेवांसाठी वणवण करावी लागत असल्याने आर्थिक व मानसिक शोषण होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. या गंभीर प्रकाराची दखल अखिल भारतीय ग्राहक पंचायत व आंतरराष्ट्रीय मानव अधिकार असोसिएशन नवी दिल्ली शाखा यवतमाळ च्या वतीने घेतली असून, जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पंपांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात येणार आहे. प्रशासनाने तातडीने पावले न उचलल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

# अनुसूचित जातींच्या ५९ वंचित घटकांना न्याय द्या..!

## उपवर्गीकरण तातडीने लागू करा – नामदेव ससाने

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १४ :** सकल मातंग समाजाच्या वतीने यवतमाळ येथील उत्सव मंगल कार्यालयात उपवर्गीकरण संमेलनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत माजी आमदार नामदेव ससाने यांनी अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीची जोरदार मागणी करत राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी ठाम भूमिका मांडली. ससाने म्हणाले की, १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्णयानुसार राज्य सरकारांना अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.



लोकसंख्या, विकासाची पातळी आणि आरक्षणाची वास्तविक गरज लक्षात घेऊन आरक्षणाचे न्याय्य वाटप करणे आवश्यक आहे. अनुसूचित जातींमधील अनेक घटक आजही आरक्षण व विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. विशेषतः ५९ जातींना अद्याप अपेक्षित शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक लाभ मिळालेला नाही. या वंचित घटकांना उपवर्गीकरणाच्या माध्यमातून स्वतंत्र प्रतिनिधित्व व आरक्षणाचा न्याय मिळावा, यासाठी राज्य सरकारने तातडीने धोरण जाहीर करावे, अशी मागणी संमेलनातून करण्यात आली. यावेळी विष्णू कसबे, माणिकराव खडसे, साहेबराव खडसे, फकीरा खडसे, राजा इंगोले, मनोज रणखांब, संजय कांबळे,अरविंद वानखडे,दत्तात्रय काळे यांच्यासह मातंग समाजातील मोठ्या संख्येने पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# 'वन नेशन, वन ड्रग पॉलिसी'ची मागणी..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## वैध परवाना असूनही ग्राहक कोड नाकारल्याचा आरोप..!

**औषध वितरणात कृत्रिम मक्तेदारीचा दावा , पुसद येथील श्री लक्ष्मी एजन्सीज ही महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाची अधिकृत घाऊक औषध विक्री परवानाधारक संस्था आहे. मात्र, महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या कथित दबावामुळे अनेक औषध कंपन्या केवळ संघटनेच्या सदस्य असलेल्या वितरकांनाच माल पुरवठा करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. नॉन-एमएससीडीए व्यापाऱ्यांना ग्राहक कोड सुरू करून देण्यास नकार दिला जात असल्याने स्पर्धा कमी होत असून औषध वितरणावर काही मोजक्या घटकांचे वर्चस्व निर्माण होत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. यामुळे किरकोळ विक्रेत्यांचे पर्याय मर्यादित होत असून अखेरीस औषधांचे वाढते दर आणि त्याचा आर्थिक भार सर्वसामान्य रुग्णांच्या खिशावर पडत असल्याची गंभीर बाब पुढे आली आहे.**

**पुसद, दि. १४ :** राज्यातील औषध वितरण व्यवस्थेत होत असलेल्या कथित भेदभाव, कृत्रिम मक्तेदारी आणि कार्टेलसदृश व्यवहारांवर तातडीने लगाम घालण्यासाठी 'वन नेशन, वन ड्रग पॉलिसी'ची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी पुढे आली आहे.

पुसद येथील श्री लक्ष्मी एजन्सीजचे संचालक कृष्णा बनगीनवार यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांकडे निवेदन सादर करून सर्व परवानाधारक औषध विक्रेत्यांना समान दराने आणि समान अटींवर औषध पुरवठा करण्याची मागणी केली आहे.निवेदनानुसार, काही औषध उत्पादक कंपन्या आणि स्टॉकिस्टांकडून महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन (एमएससीडीए) सदस्यांना प्राधान्य दिले जात असून, नॉन-एमएससीडीए परवानाधारक विक्रेत्यांना ग्राहक कोड देण्यास किंवा माल पुरविण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे बाजारातील मुक्त स्पर्धेला धक्का बसत असून कृत्रिम मक्तेदारी निर्माण होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. केंद्र सरकारचे 'वन नेशन, वन लायसन्स' धोरण देशभर वैध औषध परवान्याला मान्यता देते. अशा परिस्थितीत कोणत्याही खाजगी संघटनेच्या सदस्यत्वाच्या आधारावर व्यवसायिकांना वगळणे किंवा भेदभाव पूर्ण वागणूक देणे हे स्पर्धाविरोधी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच काही ठिकाणी 'अंडरकटिंग'च्या माध्यमातून संघटनेच्या सदस्यांना कमी दरात आणि इतरांना अधिक दराने औषध पुरवठा केला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यामुळे ग्राहकांना औषधे महागात मिळण्याची शक्यता वाढत असून त्याचा थेट आर्थिक फटका सर्वसामान्य रुग्णांना बसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. यवतमाळ जिल्ह्यातील कथित कार्टेल आणि अंडरकटिंगची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच सर्व कंपन्यांना सदस्यत्वाचा विचार न करता समान दराने औषध पुरवठ्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने १५ दिवसांत ठोस पावले उचलली नाहीत तर भारतीय स्पर्धा आयोग (सीसीआय) आणि केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडे तक्रार दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# ३० जूनची अंतिम मुदत..! ई-केवायसी आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी न केल्यास पीएम किसानचा हप्ता अडकणार!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. १४ :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेचा लाभ घेणाऱ्या पात्र शेतकऱ्यांसाठी ३० जून २०२६ ही अत्यंत महत्त्वाची अंतिम मुदत ठरणार आहे. केंद्र शासनाने पीएम किसान योजनेअंतर्गत ई-केवायसी आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य केली असून, निर्धारित मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांचा पुढील हप्ता रोखला जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, अनेक लाभार्थी शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण केलेली नाही. त्यामुळे पात्र शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नयेत, यासाठी प्रशासनाने जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. शेतकरी सीएससी केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा पीएम किसान पोर्टलच्या माध्यमातून आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकावर येणाऱ्या ओटीपीद्वारे ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करू शकतात. याशिवाय, शेतकऱ्यांची डिजिटल माहिती संकलित करून भविष्यातील विविध अनुदान व शासकीय योजनांचा लाभ सुलभ करण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणीही बंधनकारक करण्यात आली आहे. वृद्ध, आजारी आणि दिव्यांग शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाकडून विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून गावागावांत जाऊन नोंदणीसाठी मदत केली जात आहे. शेतकऱ्यांनी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता तातडीने ई-केवायसी आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# ४८ कोटींच्या दंडवसुलीचा 'खेळ' उघड?

**जनमाध्यमच्या वृत्तांनंतर महसूल प्रशासनाची धावपळ**

## चांडकांच्या किरकोळ मालमत्तांवरच बोजा, 'क्रीम प्रॉपर्टी' मात्र रहस्यमयरीत्या सुरक्षित

### तहसीलदारांची कारवाई की चौकशीपूर्वीचे 'डॅमेज कंट्रोल'?; एसडीओ-तहसीलदारांच्या भूमिकेवर संशयाची सावली गडद

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील पोपटखेड गट ग्रामपंचायतीतील मौजे गाजीपूर येथील कथित अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणात आकारण्यात आलेल्या तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीपेक्षा आता त्या दंडवसुलीभोवती उभ्या राहिलेल्या संशयांच्या पर्वतानेच महसूल प्रशासनाला घेरले आहे. गेल्या काही दिवसांपासून या प्रकरणातील दंडवसुलीतील विलंब, मुदतबाह्य अपील, कथित प्रशासकीय सवलती आणि संबंधितांवरील कारवाईतील दुहेरी निकष यावर जनमाध्यमने सातत्याने प्रकाशझोत टाकल्यानंतर महसूल यंत्रणा अचानक सक्रिय झाल्याचे दिसत आहे. मात्र या सक्रियतेमागे खरोखर महसूल वसुलीचा हेतू आहे की चौकशी आणि जनक्षोभापासून बचाव करण्यासाठी उभारलेले 'प्रशासकीय नाटक', यावर आता गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

गाजीपूर-रुदाळी खाण फाईल्स

अकोटचे तहसीलदार सुनील चव्हाण यांनी संतोष चांडक यांच्याशी संबंधित काही मालमत्तांच्या सातबाऱ्यावर शासनाच्या दंडाचा बोजा नोंदविल्याची माहिती समोर आली आहे. पहिल्या नजरेत ही कारवाई कठोर वाटत असली तरी महसूल वर्तुळातील सूत्रे आणि स्थानिक नागरिक याकडे वेगळ्याच नजरेने पाहत आहेत. कारण ज्या मालमत्तांवर शासनाचा दावा नोंदविण्यात आला आहे, त्या मालमत्तांचे मूल्य कथितपणे अत्यल्प असून प्रत्यक्ष दंडवसुलीसाठी त्यातून फारसा फायदा होण्याची शक्यता नाही. उलट अधिक मूल्य असलेल्या आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या मालमत्तांना या कारवाईपासून दूर ठेवण्यात आल्याची चर्चा अधिक वेगाने पसरत आहे. त्यामुळे आता प्रश्न दंडवसुलीचा राहिलेला नाही; प्रश्न आहे तो प्रशासनाच्या प्रामाणिकतेचा, निर्णयक्षमतेचा आणि निष्पक्षतेचा.

हा तपासाचा विषय असला तरी प्रशासनाच्या निर्णयांमुळेच अशा चर्चांना खतपाणी मिळाल्याचे स्पष्ट दिसत आहे. सरकारी यंत्रणांवरील विश्वास टिकवायचा असेल तर केवळ कारवाई झाली असे सांगून भागणार नाही; ती निष्पक्ष, पारदर्शक आणि परिणामकारक असल्याचेही दिसले पाहिजे, अशी प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

#### एसडीओंच्या निर्णयांवरही प्रश्न

#### चौकशी, अधिवेशनापूर्वीचे 'डॅमेज कंट्रोल'?

राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात सध्या सर्वाधिक चर्चिला जाणारा मुद्दा म्हणजे या कारवाईमागील वेळ. जिल्हाधिकाऱ्यांची चौकशी सुरू आहे. दुसरीकडे पावसाळी अधिवेशन तोंडावर आले आहे. विरोधी पक्षांकडून हा विषय उपस्थित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा वेळी महसूल प्रशासनाने अचानक केलेली कारवाई अनेकांच्या भुवया उंचावणारी ठरली आहे. कारण उद्या चौकशीदरम्यान किंवा अधिवेशनात प्रश्न उपस्थित झाल्यास 'आम्ही कारवाई केली होती' असे सांगण्यासाठी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवण्याचा हा प्रयत्न तर नाही ना, अशी चर्चा रंगू लागली आहे. महसूल विभागातील निवृत्त अधिकाऱ्यांच्या मते, प्रत्यक्ष वसुली करायची असेल तर महसूल संहितेनुसार अधिक कठोर उपाययोजना उपलब्ध आहेत. मालमत्ता जप्ती, आर्थिक व्यवहारांवरील निर्बंध, व्यवसायांवरील कारवाई, गहाण हक्कांची नोंद, वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणी अशा अनेक पायऱ्या आहेत. मात्र त्या दिशेने ठोस हालचाल झालेली दिसत नाही.

#### जिल्हाधिकाऱ्यांसमोर विश्वासार्हतेची परीक्षा

या प्रकरणात आता सर्वात मोठी जबाबदारी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्यावर आहे. त्यांनी दिलेल्या चौकशी आदेशानंतर सादर होणारा अहवाल निर्णायक ठरणार आहे. मात्र ज्या अधिकाऱ्यांवरच सौम्य भूमिका घेतल्याचे आरोप आहेत, त्यांच्याकडूनच चौकशी होत असल्याने निष्पक्षतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे महसूल विभागाबाहेरील वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्वतंत्र विशेष चौकशी समिती स्थापन करण्याची मागणी वेगाने पुढे येत आहे.

तहसीलदार-चांडक संबंधांबाबत गावोगावी चर्चा-

किरकोळ मालमत्तांवर कारवाई आणि मौल्यवान मालमत्तांना कथित संरक्षण या पार्श्वभूमीवर अकोट तालुक्यात विविध चर्चांना उधाण आले आहे. अनेक ठिकाणी महसूल प्रशासन




आणि संबंधितांमधील कथित साटेलोटे, समन्वय किंवा हितसंबंधांबाबत चर्चा रंगत आहे. या चर्चांमध्ये किती तथ्य आहे,

#### ■ उद्याच्या अंकात... 'संपत्तीचा दुसरा अध्याय' : आणखी गट क्रमांक, आणखी मालमत्ता!

जनमाध्यमच्या तपासमालिकेच्या पुढील भागात संतोष चांडक व कुटुंबीयांशी संबंधित असल्याचा दावा केल्या जाणाऱ्या आणखी काही मालमत्ता, व्यावसायिक जागा, जमिनींचे गट क्रमांक आणि त्याविषयीची कागदोपत्री माहिती उघड करण्यात येणार आहे. महसूल प्रशासनाच्या कारवाईच्या कक्षेबाहेर राहिलेल्या या मालमत्तांमुळे ४८ कोटींच्या दंडवसुलीच्या प्रकरणात नवे प्रश्न उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### ■ जनमाध्यमच्या वृत्तांमुळेच प्रशासनाला जाग आली का?

गेल्या काही महिन्यांपासून गाजीपूर उत्खनन प्रकरण शांतपणे फाईलींमध्ये फिरत असल्याचे चित्र होते. दंड आकारला गेला, न्यायालयीन प्रक्रिया झाली, नोटिसा निघाल्या; परंतु प्रत्यक्ष वसुलीच्या बाबतीत फारशी हालचाल दिसत नव्हती. मात्र जनमाध्यमने या प्रकरणातील एकामागोमाग एक धक्कादायक बाबी समोर आणण्यास सुरुवात केली. अवैध उत्खननामुळे पर्यावरणीय हानी, आदिवासी जमिनींचा वापर, धरण सुरक्षेवरील परिणाम, ईटीएस अहवालातील निष्कर्ष, दंडवसुलीतील दिरंगाई, मुदतबाह्य अपील याचिका, तसेच प्रशासनाची कथित सौम्य भूमिका या सर्व मुद्द्यांवर सातत्याने प्रश्न उपस्थित करण्यात आले. या वृत्तांची दखल घेत जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी चौकशीचे आदेश दिले आणि त्यानंतरच महसूल विभाग अचानक सक्रिय झाल्याचे दिसून आले. त्यामुळे या कारवाईचा वेळ आणि हेतू याबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक असल्याचे जाणकारांचे मत आहे.

#### ■ 'क्रीम प्रॉपर्टी'ना अभय, किरकोळ मालमत्तांवर बोजा!

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात गंभीर आरोप म्हणजे कारवाईची निवडक पद्धत. स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेल्या विविध नोंदी, महसुली अभिलेख आणि चर्चांनुसार संबंधितांशी निगडित अनेक मौल्यवान मालमत्ता अस्तित्वात असल्याचे सांगितले जाते. मात्र शासनाचा दावा नोंदविताना या मालमत्तांचा विचार झाल्याचे दिसून येत नाही. याउलट ज्या मालमत्तांवर बोजा नोंदविण्यात आला आहे, त्यांचे आर्थिक मूल्य तुलनेने कमी असल्याचे बोलले जात आहे. महसूल विभागाकडे संगणकीकृत जमीन अभिलेख, ई-नोंदणी माहिती, बँक गहाण नोंदी, उद्योग विभागाची माहिती, कर नोंदी आणि इतर अनेक साधने उपलब्ध असताना महत्त्वाच्या मालमत्ता प्रशासनाच्या नजरेतून कशा सुटल्या, हा प्रश्न अधिकच गडद होत आहे. काही नागरिक तर थेट आरोप करीत आहेत की, 'दंडवसुली व्हावी अशी इच्छा असती तर प्रशासनाने आधी मोठ्या मालमत्तांवर टाच आणली असती. किरकोळ मालमत्तांवर बोजा चढवून केवळ कारवाईचा देखावा उभा करण्यात आला.'

**कायम-**

या प्रकरणातील आणखी एक वादग्रस्त मुद्दा म्हणजे अपील याचिका. आरोप असे आहेत की, नियोजित मुदत संपल्यानंतरही अपील याचिका स्वीकारण्यात आली. दंडाच्या रकमेसंदर्भातील अटींचे पालन झाले होते का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. जर या आरोपांमध्ये तथ्य आढळले तर ही बाब केवळ प्रक्रियात्मक त्रुटी म्हणून पाहता येणार नाही. उलट विशिष्ट व्यक्तींना लाभ मिळावा म्हणून नियमांना वाकविण्यात आले का, याची चौकशी करावी लागेल. यामुळेच अपील प्रक्रिया हाताळणाऱ्या एसडीओंच्या भूमिकेवरही संशयाची सावली कायम आहे.

#### 'बोजा' की 'बचाव कवच'?

महसूल विभागाने केलेल्या ताज्या कारवाईकडे अनेक जण प्रत्यक्ष वसुलीची सुरुवात म्हणून नव्हे, तर चौकशी आणि संभाव्य राजकीय दबावापासून बचावासाठी उभारलेल्या 'बचाव कवच'च्या स्वरूपात पाहत आहेत. कारण ज्या मालमत्तांवर शासनाचा दावा नोंदविला गेला, त्यातून ४८ कोटींच्या दंडवसुलीचा प्रश्न सुटण्याची शक्यता अत्यल्प असल्याची चर्चा आहे.

#### स्वतंत्र चौकशीशिवाय संशय दूर होणार?

तहसीलदारांची कारवाई, एसडीओंकडील अपील प्रक्रिया, दंडवसुलीतील विलंब आणि मालमत्तांच्या निवडीतील कथित विसंगती या सर्व बाबींची स्वतंत्र चौकशी झाल्याशिवाय या प्रकरणातील संशय दूर होणार नाही, असे मत कायदेविषयक जाणकार आणि नागरिक व्यक्त करीत आहेत. त्यामुळे आता जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष चौकशी समिती नेमून संपूर्ण प्रकरणाची फेरतपासणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

---

# वृद्ध शेतकऱ्याचे हातपाय बांधून जबरदस्तीने विष पाजले

## विहीगाव येथे थरारक प्रकार, जुन्या वादातून घडली घटना

### रहिमापूर पोलिसांकडून तपास सुरु

**खल्लार/प्रतिनिधीः-**

रहिमापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विहीगाव येथे मानवी संवेदनांना हादरवून सोडणारी एक गंभीर घटना घडली आहे. शेतात काम करत असताना एका वृद्ध शेतकऱ्याचे हातपाय बांधून जबरदस्तीने विष पाजल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून कायदा व सुव्यवस्थेबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

विहीगाव येथील वृद्ध शेतकरी दादाराव भगाजी अभ्यंकर (वय ६७)हे आपल्या शेतात पत्नी शोभा अभ्यंकर सह काम करीत असतांना गावातील गुंड प्रवृत्तीचे निखिल गणेशे व त्याच्यासोबतच्या तीन जणांनी दादाराव अभ्यंकर यांच्यावर हल्ला करुन संबंधितांनी वृद्धाचे हातपाय बांधून त्यांना जबरदस्तीने विष पाजले. याबाबतची तक्रार रहीमापूर पोलिसात मिलिंद दादराव अभ्यंकर (वय ३३) यांनी दाखल केली आहे.

माहितीनुसार आरोपी आणि पिडित यांच्यातील जुना वाद या घटनेमागे कारणीभूत ☞(पान २ वर)

> दादाराव अभ्यंकर यांच्या मुलाने दिलेल्या तक्रारीवरुन या घटनेतील आरोपी निखिल गणेशे व अन्य तिघांविरुध्द कलम ११८(१), ३(५) बिएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
>
> **-प्रशांत देशमुख, ठाणेदार, रहीमापूर**


---

# मध्यप्रदेशातून दुचाकीवर गुटख्याची तस्करी

## २.२६ लाखांचा मुद्देमाल जप्त

### -एलसीबीच्या कारवाईत दोघे जाळ्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रतिबंधित गुटख्याची तस्करी रोखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) राबविलेल्या विशेष मोहिमेत मोठे यश मिळाले आहे. मध्यप्रदेशातून दुचाकीवरून अमरावती जिल्ह्यात गुटखा आणणाऱ्या दोन तस्करांना अवघ्या एका तासाच्या अंतराने अटक करण्यात आली. बुरडघाट येथील आरटीओ तपासणी नाक्याजवळ झालेल्या या सलग दोन कारवायांत गुटखा, दुचाकी आणि अन्य साहित्य असा एकूण २



लाख २६ हजार ४८४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार यांच्या पथकाला मध्यप्रदेशातील खामला परिसरातून मोठ्या प्रमाणात गुटखा आणला जात असल्याची गोपनीय माहिती ☞(पान २ वर)

---

# बालाजी प्लॉट परिसरातील पडलेले झाड हायड्राच्या मदतीने हटविले



**अमरावती/प्रतिनिधीः-** सिताराम बाबा मंदिर, बालाजी प्लॉट परिसरात वादळी वाऱ्यामुळे एक मोठे झाड पडल्याची माहिती प्राप्त होताच अमरावती महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत ☞(पान २ वर)

---

# नागरवाडी परिसरात गोवंश वाहतुकीचा पर्दाफाश

## १३ जनावरे ताब्यात, धारणीत गोवंश कत्तल उघड

### १.०५ लाखांचा मुद्देमाल जप्त, दोघांविरुद्ध गुन्हा

अमरावती/प्रतिनिधीः-

गोवंश जनावरांची अवैध कत्तल करून मांस विक्री करणाऱ्यांविरुद्ध धारणी पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत गोवंशाचे १९० किलो मांस, कत्तलीसाठी वापरण्यात



कदम यांनी अवैध वध तसेच गोवंश जातीच्या जनावरांची बेकायदेशीर कत्तल व मांस विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार धारणी येथील कुरेशी मोहल्ल्यात शनिवारी (१३ जून) छापा टाकण्यात आला. पोलीस पथकाने शेख समीर शेख कबीर (वय २५) यांच्या घरी धाड टाकली असता तेथे शेख नसीम शेख सुलतान (वय ३५) उपस्थित आढळून आले. घराची पंचासमक्ष झडती घेतली असता घरासमोरील मोकळ्या जागेत आणि घराच्या☞(पान २ वर)

---

# सरसकट वीज पुरवठा बंद न करता पथदिव्यांचा बंद करा

## अमरावतीकर नागरिकांची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-**

दरवर्षीच उन्हाळ्यात विजेची मागणी वाढते हे माहीत असताना वीज मिळत नाही आणि खंडित वीज पुरवठ्याला नागरिकांना सामोरे जावे लागते. दुसरीकडे वीज वहन खर्च मात्र नागरिकांकडून वसूल करण्यात येत आहे. असे अनेक खर्च वसूल केले जात असताना त्याप्रमाणात सेवा मात्र मिळत नाहीत. आणखी विशेष म्हणजे पावसाळ्याच्या दिवसात थोड्याच हवेने वीज पुरवठा लागलीच बंद करण्यात येतो आणि वातावरण निवळल्यानंतर सुध्दा वीज पुरवठा सुरू केला जात नाही. वारा, विजांचा कडकडाट अशी कारणे सांगितली जातात. नाईलाजास्तव मोबाईलच्या टॉर्च अथवा मोमबत्तीच्या प्रकाशात गृहिणींना कामे उरकावे ☞(पान २ वर)

---

# 'तक्रार निवारण दिनाला' नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## एकाच दिवशी २१० तक्रारींचे निराकरण

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागरिकांच्या समस्या व तक्रारींचे त्वरित निराकरण व्हावे, पोलीस प्रशासनाविषयी विश्वास वाढावा आणि सर्वसामान्यांना न्याय मिळावा या उद्देशाने अमरावती ग्रामीण पोलीस दलात प्रत्येक शनिवारी 'तक्रार निवारण दिन' राबविण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून शनिवारी (दि. १३ जून) जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये प्राप्त झालेल्या तब्बल २१० तक्रारींचे निराकरण करण्यात आले.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये नागरिकांच्या तक्रारी प्रत्यक्ष ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश सर्व ठाणेदारांना देण्यात आले आहेत. तक्रार निवारण दिनानिमित्त पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी स्वतः चांदूर बाजार पोलीस ठाण्यात उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. तर अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांनी दर्यापूर पोलीस ठाण्यात उपस्थित राहून तक्रारींचा☞(पान २ वर)